सत्यमेव जयते

अनुसूचित जमाती कल्याण समिती

(२०१७ -२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

ठाणे येथील जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. ठाणे महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व भिवंडी-निजामपूर महानगरपालिका या कार्यालयांतील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणा-या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबतचा

दहावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक जून, २०१९ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
जून, २०१९

अनुसूचित जमाती कल्याण समिती

(२०१७ -२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

ठाणे येथील जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. ठाणे महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका, नवी-मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, व भिवंडी-निजामपूर महानगरपालिका या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणा-या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबतचा

दहावा अहवाल

एचबी ३७०—१

अनुसूचित जमाती कल्याण समिती
(२०१७-२०१८)

समिती प्रमुख :

*(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(४) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(५) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.
(६) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
(७) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.
(८) श्री. अमित घोडा, वि.स.स.
(९) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.
(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.
(१२) श्री. गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स
(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१४) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
(१५) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.).
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव.
(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती).
(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

*प्रा. डॉ. अशोक उईके, समिती प्रमुख, यांची दिनांक १६ जून २०१९ रोजी मंत्रीमंडळात “मंत्री” म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

अनुसूचित जमाती कल्याण समिती
(२०१५-२०१६)

समिती प्रमुख :

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स.

सदस्य :

(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(४) श्री. नारायण कुचे, वि.स.स.
(५) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(६) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(७) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(८) प्रा. चंद्रकात सोनवणे, वि.स.स.
(९) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.
* (१२) श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स.
(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१४) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स
(१५) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. ना.रा. थिटे, उप सचिव.
(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती).
(४) श्री. आनंद रहाटे, कक्ष अधिकारी.

* (१) मा. सभापती यांनी श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांची मुदत दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी संपुष्टात आल्याने व ते पुन्हा विधानपरिषदेवर निवडून आल्याने दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी त्यांची पुन्हा समितीवर समिती सदस्य म्हणून फेरनियुक्ती केली आहे.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक	विषय		पृष्ठ क्रमांक
(१)	(२)		(३)
	प्रस्तावना		सात
(१)	जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे	. .	१
(२)	जिल्हा परिषद, ठाणे	. .	११
(३)	जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., ठाणे	. .	३१
(४)	ठाणे महानगरपालिका, जिल्हा ठाणे	. .	३६
(५)	मिरा-भाईंदर महानगरपालिका, जिल्हा ठाणे	. .	४३
(६)	नवी मुंबई महानगरपालिका, जिल्हा ठाणे	. .	४५
(७)	कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, जिल्हा ठाणे	. .	४९
(८)	भिवंडी-निजामपूर महानगरपालिका, जिल्हा ठाणे	. .	५३
(९)	बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त	. .	५९

प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा दहावा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ या कालावधीतील अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १७ ते २० नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत ठाणे जिल्ह्यास भेट देऊन बैठका घेतल्या होत्या. उक्त बैठकींत जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद तसेच ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. ठाणे व ठाणे जिल्ह्यातील ठाणे महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका, नवी-मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, भिवंडी - निजामपूर महानगरपालिका, या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी वर्गाची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच शासकीय व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रातंर्गत अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांना भेट देऊन पाहणी केली. उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्यांच्या अनुषंगाने समितीने दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ व दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी उक्त आस्थापनासंदर्भात संबंधित मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचार विनिमय करून त्यासंदर्भात नोंदविलेले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

मंत्रालयीन विभागीय सचिवांनी तसेच संबंधित अधिका-यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने दिनांक ११ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक : ११ जून, २०१९.

प्रा. डॉ. अशोक उईके,
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

अहवाल

जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १७ ते २० नोव्हेंबर २०१६ या कालावधीत ठाणे जिल्ह्याचा अभ्यास दौरा आयोजित केला होता. सदर दौ-यात समितीने, दिनांक १७ नोव्हेंबर २०१६ रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देऊन बैठक घेतली होती. सदर बैठकीत समितीने अनुसूचित जमाती प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील भरती, बढती, आरक्षण व अनुशेष :—

समितीने, जिल्हाधिकारी कार्यालयात " अव्वल कारकून " या संवर्गातील अनुसूचित जमाती प्रवर्गातून पदोन्नतीने भरण्यात आलेली पदे जिल्ह्याचे विभाजन होण्यापूर्वी भरण्यात आलेली आहेत काय, तसेच जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर पालघर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत होणेबाबत अनुसूचित जमातीच्या किती कर्मचा-यांनी निवेदने दिली आहेत त्याबाबत माहिती देण्यास सांगितले असता जिल्हाधिका-यांनी विदित केले की, जिल्हाधिकारी कार्यालयात " अव्वल कारकून " ची १५२ पदे आहेत, त्यापैकी शासन निर्णयानुसार, ७ टक्के आरक्षणानुसार १० पदे होत असून प्रशासनाने ३० पदे जिल्हा विभाजनापूर्वीच भरलेली आहेत. पालघर जिल्ह्यातील ठाणे येथे असलेल्या पाच कर्मचा-यांनी जिल्हा बदलीसाठी अर्ज केलेले होते त्यांची सेवा पालघर येथे वर्ग केलेली आहे. तसेच वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये ४४ कर्मचा-यांना पदोन्नती दिली असून त्यांचेकडून जातप्रमाणपत्र प्राप्त करून घेतलेले आहे.

समितीने, सन २०१४-२०१५ ते २०१५-२०१६ या वर्षात संवर्गनिहाय पदोन्नतीने एकूण ६४ पदे भरण्यात आली आहेत. पदोन्नती देण्यापूर्वी कर्मचा-यांकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आली आहेत काय अशी विचारणा केली असता जिल्हाधिका-यांनी विदित केले की, २० कर्मचा-यांपैकी १० कर्मचा-यांनी नियुक्ती देण्यापूर्वी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेली आहेत. सरळसेवेने ८ पदे भरलेली असून त्यांची जात प्रमाणपत्र आहेत. सह आयुक्त, जात पडताळणी समिती, कोकण विभाग यांनी पुढे विदित केले की, जिल्हाधिकारी कार्यालयातील श्री. गजानन शामराव चंडोल यांचे एक प्रकरण प्रलंबित असून जिल्हाधिकारी कार्यालयातील ३७ प्रकरणांपैकी ३३ प्रकरणे वैध असून ३ प्रकरणे अवैध आहेत. आतापर्यंत एकूण ३६ प्रकरणे निकाली काढलेली आहेत. सन २०१६ मधील श्री.गायकवाड यांचे तसेच सन २०१३ मधील श्रीमती दिव्यता संजय गायकवाड यांचे प्रकरण प्रलंबित आहे.

यावर समितीने, दिनांक १८ मे २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीतील कर्मचा-यांना नियुक्ती देता येते, परंतु त्यांनी विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास पुढील कारवाई करण्याचे आदेश आहेत. दिनांक १८ मे २०१३ रोजीच्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष प्रवर्ग अधिनियमातील कलम ८ नुसार जात सिद्ध करण्याची जबाबदारी संबंधित मागासवर्गीय कर्मचा-यांची आहे. या शासन निर्णयामध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या पुर्ततेचा कालावधी दिलेला आहे. या कर्मचा-यांनी आवश्यक ती कागदपत्रे सादर केली नाही तर कलम १० नुसार त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल अशी तरतूद आहे. अनुसूचित जमातीच्या संवर्गातील कर्मचा-यांची नियुक्ती शासन निर्णयाप्रमाणे केली पाहिजे. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता दिनांक ११ नोव्हेंबर, २०१६ रोजी त्यांना ''कारणे दाखवा नोटीस'' दिलेली आहे. समितीने निर्देशित केल्याप्रमाणे त्यांना नोटीस देऊन कमी करण्यात येईल. श्रीमती दिव्यता संजय गायकवाड यांची नियुक्ती दिनांक २८ ऑगस्ट, २०१४ रोजी झाली असून त्याचा जातपडताळणीचा प्रस्ताव दिनांक ७ एप्रिल, २०१६ रोजी कोकण विभागीय जात पडताळणी समितीस सादर झाला आहे. श्री. किरणकुमार भगवान सुरडकर यांची नियुक्ती दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ रोजीची असून त्यांचा जात वैधता प्रमाणपत्र प्रस्ताव औरंगाबाद समितीकडे दिनांक १ डिसेंबर, २०१५ पासून प्रलंबित आहे. तसेच श्रीमती जयमाला चंडोल यांचाही प्रस्ताव प्रलंबित आहे. जात पडताळणी समितीकडे पाठविलेल्या १० प्रकरणांचा पाठपुरावा करून उमेदवारांवर उचित कारवाई करण्यात येईल असे समितीस सुचित केले.

समितीने, उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांच्या कार्यालयाबाबत विचारणा केली असता उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर अंतर्गत वर्ग-३ मधील तलाठी संवर्गात ३० मंजूर पदांपैकी अनुसूचित जमातीची ७ पदे भरलेली आहेत. सरळसेवेमध्ये वर्ग-४ ची १३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १ पद रिक्त आहे. २०११ मध्ये त्या पदावरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यामुळे अनुशेष दिसत आहे. पदोन्नतीमध्ये ३ पदे मंजूर असून २ पदे भरलेली आहेत असे समितीस विदित केले.

यावर बिंदूनामावली नोंदवह्या अद्यावत असत्या तर पदे भरता आली असती शासनाचा दिनांक २३ मार्च, १९९४ रोजीच्या शासन निर्णयानुसार विविध मागासवर्गीय प्रवर्गातील विहीत करण्यात आलेल्या आरक्षणाप्रमाणे पदे भरली न गेल्यास, न भरलेली पदे सरळसेवा भरतीने सलग पाच वर्षे अनुशेष म्हणून पुढे भरण्याची तरतूद आहे. सदरील पदे भरण्याकरिता सतत पाच वर्षे भरती प्रक्रियेद्वारे प्रयत्न करणे आवश्यक आहे. या शासन निर्णयानुसार तेथे रिक्त पदे राहू नयेत व त्या संवर्गातील उमेदवारांना न्याय मिळावा हा उद्देश आहे. एका बाजूला कर्मचारी संख्या कमी असताना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रभावीपणे भरती प्रक्रिया राबविली जात नाही असे मत समितीने व्यक्त केले.

सार्वजनिक बांधकाम विभाग :—

समितीने, सार्वजनिक बांधकाम विभागास गत तीन वर्षात प्राप्त झालेला निधी, योजनानिहाय करण्यात आलेला खर्च याची माहिती देण्यास सांगितली असता कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. यांनी ५०५४ योजनेत जिल्हा व इतर मार्ग याकरिता २०१४-२०१५ मध्ये १६५ कामे मंजूर झालेली असून याकरिता ४७ कोटी ९७ लक्ष रुपये मंजूर होते. यातून २० कोटी ६५ लक्ष रुपये खर्च झाला आहे. २०१४-२०१५ मध्ये किमान गरजा कार्यक्रमांतर्गत १५५ लक्ष रुपयांची १६ कामे मंजूर होती पण १६५ लक्ष रुपये खर्च झालेला आहे यात मागील वर्षीची काही रक्कम शिल्लक होती. सन २०१४-२०१५ मध्ये साकावा येथील ७ लक्ष रुपयांचे एक काम मंजूर होते. वितरीत तरतूद २ लाख ६६ हजार होती. सदर रक्कम खर्च झाली आहे. सन २०१५-२०१६ मध्ये ५०५४ अन्वये जिल्हा व इतर मार्गामध्ये १५६ कामे मंजूर झालेली आहेत. मंजूर कामांची किंमत ४५ कोटी ३९ लक्ष रुपये होती. प्रत्यक्षात २३ कोटी ६ लक्ष रुपये खर्च झालेला आहे. सन २०१६-१७ मध्ये ३५८ कामे मंजूर झाली होती, त्यांची किंमत ८१ कोटी रुपये आहे अशी माहिती दिली.

यावर समितीने, विशेष प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांच्याकडील वाडा व भिवंडी तालुक्यातील हाती घेतलेल्या सर्व रस्त्यांची कामे पूर्ण करून या कामांची सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात यावी असे निदेशित केले.

वन विभाग :—

समितीने, मागील तीन वर्षात वन विभागासाठी योजनानिहाय किती निधी प्राप्त झाला, किती खर्च झाला तसेच तीन वर्षात किती वृक्षारोपण केले याबाबत माहिती देण्यास सांगितले असता उप वनाधिका-यांनी नमूद केले की, ठाणे आणि शहापूर तालुक्यासाठी पाच वर्षात २६ कोटी १७ लाख रुपये मिळाले होते. यावर्षी २४ कोटी ७७ लाख रुपये वनीकरणाच्या कामासाठी मिळाले आहेत. दोन्ही विभाग मिळून असून दोन्ही विभागात २५९८ हेक्टर्स जमिनीवर वनीकरण केलेले आहे. नैसर्गिक पर्यटनासाठी १८ लाख रुपये मिळाले आहेत. पहिल्या वर्षी वृक्षांची लागवड केली त्यावेळेस ८५ हेक्टर्स क्षेत्र होते. त्यातील जिवंत रोपांची टक्केवारी ९० टक्के होती. सन २०१५ च्या पावसाळ्यात वृक्षांची लागवड केली त्यामुळे ८० टक्के झाडे पाच वर्षात जगली आहेत. झाडे जगण्याचे प्रमाण ७५ टक्क्यांच्या वर आहे. वृक्ष लागवड टोकावडे, शहापूर व इतर ठिकाणी केलेली आहे तसेच दुतर्फा वृक्ष लागवड केलेली आहे. सुमारे १८ हेक्टर्स क्षेत्रावर साफसफाई करून लोकांना फिरण्यासाठी नैसर्गिक पर्यटन तयार केलेले आहे. ठाणे व शहापूर मिळून एकूण २७४ वन समित्या आहेत. त्यापैकी शहापूर तालुक्यात १३९ वन समित्या आहेत. या समित्यांमार्फत वनाचे संरक्षण केले जाते. ठाणे जिल्ह्यात संयुक्त वन समितीचे काम खूप चांगले असून वन हक्क समित्या सर्व गावांमध्ये स्थापन झालेल्या आहेत.

गॅस वाटपाबाबत माहिती देताना असेही नमूद केले की, शहापूर व ठाणे विभागात ३०६५ लाभार्थ्यांना गॅसचे वाटप केलेले आहे. याकरिता प्रती व्यक्ती ६८०० रुपये निधी येतो. पहिल्या वर्षी १२, दुस-या वर्षी ८, तिस-या वर्षी ६, चौथ्या वर्षी ४ गॅस सिलेंडरचा पुरवठा केला जातो. सन २०१२-२०१३ मध्ये ३६५ कनेक्शन, सन २०१३-२०१४ मध्ये ५८२, सन २०१४-१५ मध्ये ९१० व सन २०१५-२०१६ मध्ये १२०८ गॅसचे वाटप झालेले आहे. यासाठी असणारे निकष म्हणजे लाभार्थी आदिवासी असल्याच्या दाखला पाहिजे. लाभार्थी संबंधित गावातील रहिवासी पाहिजे.

समितीने, आदिवासींना वन पट्टयाचे वाटप किंवा वन हक्क समितीकडून किती लाभार्थ्यांना प्लॉट दिलेले आहेत. याबाबत माहिती विचारली असता वनाधिका-यांनी सांगितले की, ७ तालुक्यांमध्ये ५४६० वनदावे मंजूर असून ६५८८ एकर जागा दिलेली आहे. ठाणे जिल्ह्यात मोठया प्रमाणावर काम केलेले आहे. सामुहिक वन हक्क दाव्याद्वारे २९१ गावांमध्ये २३७५७ एकर जमीन वाटप केली आहे. या वन पट्टयांची नोंदणी करून ताबाही दिलेला आहे. विभागाने उप विभागीय अधिकारी, तहसीलदार व गट विकास अधिकारी यांच्या स्तरावरुन महात्मा गांधी यांच्या नावाने असलेल्या नरेगा योजनेमध्ये विहीरी देण्याकरिता प्रकल्प अधिका-याच्या माध्यमातून या क्षेत्रात योजना राबविण्याबाबत सांगण्यात आले आहे. याबाबत प्रकल्प अधिकारी यांनी पुढे सांगितले की, मागील दोन वर्षात संशोधन निधी आलेला नाही. सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ मध्ये आलेल्या निधीतून विहीरीचे वाटप करण्यात आलेले आहे. न्युक्लीअस बजेटमध्ये आपण लाभार्थ्यांना शेती विकासाकरिता काही योजना देऊ शकतो.

समितीने, तानसा अभयारण्यामध्ये स्थानिक आदिवासींना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी व पर्यटनास चालना मिळण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडून मिळालेल्या ७१ लाख रुपये निधीतून कोणकोणती कामे केलेली आहेत तसेच सध्या तेथे कोणते वन्य प्राणी आहेत असा प्रश्न केला असता वनाधिका-यांनी विदित केले की, तानसा अभयारण्यामध्ये ग्रामीण विकास समित्या स्थापन करण्यात आल्या असून नाविण्यपूर्ण योजनेतून प्राप्त झालेल्या निधीतून समितीच्या खात्यामध्ये रक्कम वर्ग केलेली आहे. बोटींगकरीता २० लाख २९ हजारांची बोट खरेदी केलेली आहे. जेटीचे बांधकाम केलेले आहे. बोराळा निसर्ग माहिती केंद्राच्या ठिकाणी पाईपलाईनचे काम केलेले आहे. पर्यटकांच्या चहापानाकरिता किचन शेड, बाथरुम, तसेच जुन्या झोपड्यांचे नुतनीकरण केले असून माहिती फलक लावले आहेत व निसर्ग वाटा तयार केल्या आहेत. ठाणे वन विभागात तानसा, शहापूर रेंज-२ तसेच वाडा तालुक्यातील काही भागात सांबर, पँथर इत्यादी वन्यजीव आहेत. येथील वन्यजीवांच्या सोयीसाठी एक योजना तयार आहे. केंद्र शासनाच्या मंजुरीप्रमाणे सदर काम केले जाते. उन्हाळयामध्ये वन्य प्राण्यांना पिण्याच्या पाण्यासाठी पाणवठे तयार केले आहेत. गॅबीयन स्ट्रक्चरचे बंधारे बांधले आहेत. तानसा येथे अतिशय चांगले जंगल असून जवळच कर्नाळा पक्षी अभयारण्य आहे. शहापूर तालुक्यामध्ये तानसा व खर्डी

अभयारण्य आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणा-या तानसा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात विकासाची कामे केली आहेत. सावरपाडा, वारीवाडा येथे सौरउर्जेचे पॅनल दिलेले आहेत. नवीन बायो डायव्हर्सिटी पार्क शहापूर येथे तयार करण्याचे काम सुरू आहे. शहापूरकरिता प्रस्तावित निधीपैकी ६० टक्के निधी मिळाला आहे. या वर्षीचा निधी संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाला हस्तांतरीत केलेला आहे.

कृषी विभाग :—

समितीने, कृषी विभागाने त्यांच्या केलेल्या कामांची माहिती देण्यास सांगितले असता जिल्हा कृषी अधिकारी यांनी सन २०१४-२०१५ मध्ये पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त झालेल्या २ कोटी ९३ लाख रुपये मधून ६ वॉटरशेडचे काम झालेले आहे. सन २०१५-२०१६ मध्ये २ कोटी २३ लाखाचा कार्यक्रम दिला होता यातून ३ वॉटरशेडचे काम झालेले आहे. यामुळे पाणलोट क्षेत्र अधिक प्रमाणात निर्माण झाले आहे. मजगी व जुनी भात शेती, माती नाला, व शिवूर नाला, सिरसी अशी कामे झालेली आहेत. शहापूर तालुक्यात कामांचे प्रमाण जास्त आहे तसेच मुरबाड तालुक्यातील दोन गावांमध्ये कामे झाली आहेत. ज्या शेतक-यांना वनपट्टे दिलेले आहेत. त्यांना भेटून त्यांची गरज जाणून घेतली आहे. प्राधान्याने त्यांच्याकरिता आम्ही काम करीत आहोत. मजगी तयार करून दिले तर भात खाचर चांगले तयार होते.

जिल्हा क्रीडा अधिकारी :—

समितीने, क्रीडा अधिका-यांनी अहवाल वर्षात कोणकोणत्या योजना, त्यासाठी प्राप्त झालेला निधी व साहित्य वाटप याची माहिती देण्यास सांगितले असता क्रीडा अधिका-यांनी अंबरनाथ व कल्याण येथे क्रीडा संकुले कार्यरत आहेत, तर शहापूर (खर्डी) येथे क्रीडा संकुल मंजूर आहे, क्रीडा संकुल विकसित करण्यासाठी शासनाकडून १ कोटी रुपये निधी मंजूर केलेला आहे. यासर्व कामांसाठी स्थानिक आमदारांच्या अध्यक्षतेखाली क्रीडा समिती आहे. व्यायाम शाळेसाठी सन २०१४-१५ मध्ये ८ लाख रुपये रक्कम शहापूर तालुक्यातील ९ ग्रामपंचायतींना वाटप करण्यात आली आहे. ई-टेंडर करून साहित्य खरेदी करण्यात येत असते. जिल्हा परिषदेकडील ७ लाख रुपयांचा हिस्सा ग्रामपंचायतींना दिलेला आहे. खाजगी व नोंदणीकृत संस्था १० टक्के स्वहिस्सा टाकतात व उर्वरित रक्कम त्यांना शासनाकडून देण्यात येते. आदिवासी विकास विभागाने जे अनुदान दिले त्यातून साहित्य खरेदी करून ते संबंधितांपर्यंत पोहचले आहे. ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथे तालुका क्रीडा अधिकारी पद भरले आहे. इतर ठिकाणची पदे मंजूर नसल्याने पद भरण्यात आलेली नाहीत. क्रीडा अधिका-यांकडून खर्च करावयाच्या निधी पैकी डोळखांब येथील आश्रमशाळेसाठी ७ लाख रुपये मंजूर होते. त्यापैकी साडेतीन लाख रुपयांचा प्रथम हप्ता दिलेला आहे. डोळखांब येथे प्रसाधन गृहाचे काम पूर्ण झाले आहे. त्या ठिकाणी जमीन सपाटीकरणाचे काम प्रगतीपथावर असल्याबाबतची माहिती दिली.

यावर, आदिवासी विकास विभागाकडून व्यायाम शाळेसाठी अनुदान दिले जाते. तरी आश्रमशाळांना आवश्यक ते साहित्य मिळत नाही. याबाबत तपासणी करण्यात यावी. ज्या लाभार्थ्यांसाठी साहित्य आहे त्यांच्यापर्यंत ते पोहचत नाही. तालुका क्रीडा अधिकारी यांनी त्यांची जबाबदारी व्यवस्थित रित्या पार पाडावी, असे समितीने सूचित केले.

जिल्हा पुरवठा अधिकारी :–

समितीने, ठाणे जिल्ह्यात एकूण स्वस्त धान्य दुकाने किती आहेत, त्यापैकी किती सुरू आहेत व त्याअंतर्गत कोणत्या योजना राबविण्यात येतात अशी विचारणा केली असता जिल्हा पुरवठा अधिका-यांनी नमूद केले की, ठाणे जिल्ह्यात एकूण ५९३ स्वस्त धान्य दुकाने आहेत. ५९३ पैकी आदिवासी उप योजनेतून ३७८ दुकाने घेण्यात आली आहेत. शहापूर तालुक्यात २२८ गावे आहेत, मुरबाड येथे १७७ गावे आहेत, भिवंडी तालुक्यात ७३ गावे आहेत. जिल्हा पुरवठा कार्यालयामार्फत या योजना राबविण्यात येतात. स्वस्त धान्य दुकानांमार्फत अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब योजना, कल्याणकारी संस्था, अंगणवाडी, अन्नपूर्णा, एनपीएच योजना, त्याचप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील कार्डधारकांसाठी तुरडाळ व साखर वाटप करण्यात येते. अशा अनेक योजना राबविण्यात येत आहेत. ठाणे जिल्ह्यात आदिवासी उप योजनेमार्फत ११६ स्वस्त धान्य दुकाने कार्यरत आहेत. ज्या गावात दुकाने नाहीत ती गावे इतर गावातील दुकानांना जोडण्यात आली आहेत. आता सर्व ठिकाणी स्वस्त धान्य पुरवठा होत आहे. ज्या ठिकाणी वाहन जात नाही, अशा अतिदुर्गम भागात १६ केंद्रे आहेत. त्यामुळे त्या गावांसाठी एक तारीख निश्चित करून स्वस्त धान्याचे वाटप समक्ष जाऊन करण्यात येते तसेच द्वारवितरण व्यवस्था सुद्धा सुरू आहे.

जिल्हा पशु संवर्धन विभाग :–

समितीने, अहवाल वर्षात किती गाई-म्हशी, शेळी मेंढ्या यांचे वाटप करण्यात आले आहे. असे विचारले असता जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यांनी माहिती दिली की, सन २०१४-२०१५ मध्ये ९ लाभार्थ्यांना शेळीगट, कुक्कुटपालन व जनावरे यांचे वाटप करण्यात आले होते. दुभती जनावरे जसे गाई-म्हशी देण्यात आल्या होत्या. यासाठी ७५ टक्के अनुदान देण्यात येते. पशुसंवर्धन विकास अधिकारी यांच्याकडून अर्ज गोळा केले जातात. शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. यासाठी एक समिती असते त्या समितीसमोर अर्ज सादर करण्यात येतात. सदर समितीमध्ये आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी असतात, ही समिती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असते. जास्त अर्ज आल्यास सोडत पद्धतीने लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. जनावरांचे वाटप केल्यावर लाभार्थ्यांना ३ वर्षापर्यंत जनावर सांभाळावे लागते शेळी पालनासाठी १० शेळ्या व एक बोकड असा शेळी गट देण्यात येतो.

विभागीय सचिवांची साक्ष :—

कर्मचा-यांच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत :—

दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळेस ठाणे जिल्हाधिकारी आस्थापनेवरील १० कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्रे न दिल्याने कारवाई का करण्यात आली नाही असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता जिल्हाधिका-यांनी नमूद केले की, उक्त १० कर्मचा-यांपैकी श्रीमती दिव्यता गायकवाड, लिपिक-टंकलेखक यांचे जात वैधता प्रमाणपत्र दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी प्राप्त झाले असून उर्वरित ९ कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे त्यांना शासकीय सेवेतून कमी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने निर्गमित केले होते व त्यांना सेवेतून कमी करण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले. उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी यांचे आदेश रद्द करून त्यांना जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा निर्णय येईपर्यंत कामावर ठेवण्याचे आदेश दिले म्हणून त्यांना पुनःर्स्थापित करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठपुरावा केला व जात वैधता समितीने ९ कर्मचा-यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले. त्यानंतर या ९ कर्मचा-यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे पुन्हा दाद मागितली. औरंगाबाद खंडपीठाने समितीच्या निर्णयाला स्थगिती देऊन त्यांच्या विरोधात कारवाई करण्यात येऊ नये असे आदेश दिले. या ९ प्रकरणांची सुनावणी औरंगाबाद खंडपीठाकडे सुरू आहे. दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ ते १० जानेवारी २०१९ या कालावधीत त्या सुनावण्या प्रलंबित आहेत. यामध्ये सर्व ९ कर्मचा-यांच्या नियुक्त्या सन २०१३ नंतर झालेल्या आहेत.

समितीने यावर, जात वैधता प्रमाणपत्राच्या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्देश येतात. जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक १८ मे २०१३ च्या शासन निर्णयानुसार नियुक्ती पत्र देतांना या शासन निर्णयाचा उल्लेख त्यात केला होता काय ? दिनांक १८ मे २०१३ च्या शासन निर्णयाच्या अधीन राहून नियुक्तीचा आदेश देण्यात येत आहे अन्यथा जात वैधता प्रमाणपत्र ६ महिन्याच्या आत सादर केले नाही तर आपण कारवाईस पात्र राहाल व आपली सेवा खंडीत होईल असे नियुक्ती आदेशात नमूद केले आहे काय अशी विचारणा केली असता जिल्हाधिका-यांनी विदित केले की, त्या कर्मचा-यांना दिनांक ३० जून २०१७ रोजी सेवेतून बडतर्फ केले. ही ९ कर्मचा-यांची बडतर्फी मुंबई उच्च न्यायालयाने त्यांचे दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ च्या आदेशान्वये रद्द करून सेवेत पुर्नस्थापित करण्यात यावे असे म्हटले आहे. दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी त्यांना अवैध ठरविण्यात आले आहे. दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आल्यावर १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी तातडीने औरंगाबाद खंडपीठाने स्थगिती

दिली. औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशात असे नमूद केले आहे की, " The High Court Bench at Aurangabad issued notice to respondent standover to April, 2018 till then the Respondent employer shall not take adverse action against the Petitioner only on the ground that his tribe claim is invalidated. " सुनावणीच्या पुढील तारखा रेकॉर्डवर आहेत.

अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना आरक्षित पदावर नियुक्तीपत्र देताना त्यामध्ये शासनाच्या दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूद क्रमांक ८ व १० च्या अनुषंगाने अटी व शर्ती नियुक्ती अधिकारी यांनी नमूद केल्या पाहिजे. सदरहू तरतुदीनुसार सेवेत रुजू झालेल्या उमेदवाराची जबाबदारी आहे की, त्याने ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले पाहिजे. उक्त कालावधीत संबंधित उमेदवाराने सदरहू प्रमाणपत्र सादर केले नसल्यास शासन निर्णयातील तरतुदीनुसार कारवाई करणे आवश्यक आहे. परंतु जिल्हाधिकारी कार्यालयातील नियुक्ती अधिकारी किंवा निवड समितीच्या अधिका-यांनी सेवेत आरक्षित पदावर रुजू झालेल्या कर्मचारी यांनी जात प्रमाणपत्र ६ महिन्यांत सादर केलेले नसल्याने त्यांच्यावर कारवाई न करता त्यांना संरक्षण दिले आहे. परिणामी उक्त प्रवर्गातील पात्र उमेदवारांवर व त्यांच्या कुटुंबियांवर अन्याय झालेला आहे. उक्त कर्मचारी यांना दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ रोजी सेवेत पुर्नर्नियुक्ती देण्यात आली आहे. त्यांना दिनांक ३० जून, २०१७ रोजी पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत देण्यात आली होती. परंतु या कर्मचारी अवैध जात प्रमाणपत्र धारक असून त्यांनी सेवेतून कमी केल्याच्या आदेशाविरुद्ध माननीय उच्च न्यायालयात याचिका दाखल करून उक्त आदेश रद्द करून घेतले आहेत. सदरहू प्रकरणी चौकशी करून उक्त कर्मचा-यांवर विहीत कालावधीत दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानंतर अनुसूचित जमातीच्या आरक्षित पदावर रुजू झालेले कर्मचारी यांनी ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यांच्यावर उक्त कालावधीत कारवाई न करणा-या जबाबदार अधिकारी यांचेविरुद्ध कारवाई करून समितीला अहवाल सादर करण्याची कार्यवाही करण्यात येईल काय अशी ही समितीतर्फे विचारणा करण्यात आली.

समितीने शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून सातत्याने सांगण्यात येत आहे की, राज्यातील विविध कार्यालयामध्ये २० हजार बोगस कर्मचारी आहेत. उक्त माहिती नागपूर खंडपीठास देण्यात आली आहे. सदरहू कर्मचारी यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले असूनही ते सेवेत कार्यरत आहेत. त्यामुळे जे खरोखर आदिवासी उमेदवार आहेत त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबियांवर अन्याय झाला आहे व होत आहे. सदरहू बाब गांभीर्याने लक्षात घेऊन समिती या प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करते.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अनुसूचित जमाती प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांना दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ रोजी नियुक्ती दिलेली आहे. त्यांनी ६ महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत

लिहून दिलेले आहे. उक्त मुदत दिनांक २० एप्रिल, २०१६ रोजी संपली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्त जबाबदार अधिकारी यांनी उक्त बाब जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक होते .

समितीने, शहापूर तालुक्यात सुरू असलेल्या प्रशासकीय इमारतीच्या जागेच्या बाबतीतील अडचणी तसेच तालुक्यातील २८५ गावे टंचाईमध्ये असतात म्हणून बाहुली योजना प्रस्तावित केली आहे . या योजनेसाठी लागणारा निधी राष्ट्रीय पेयजल योजनेतून देण्याचे शासनाने मान्य केलेले असूनही या संदर्भात प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नाही असे निदर्शनास आणले असता ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे होती, त्यांनी ही योजना मान्य केली आहे याबाबत पाठपुरावा करण्यात येईल असे जिल्हाधिका-यांनी स्पष्ट केले.

समितीने, जिल्ह्यामध्ये पर्यटन स्थळ विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून करण्यात येणा-या प्रयत्नांबाबत माहिती देण्यास सांगितले असता जिल्हाधिका-यांनी विदित केले की, जिल्ह्यामध्ये पर्यटनाचा विकास करण्यास खुप वाव आहे. माळशेज घाटामध्ये बहूसंख्य पर्यटक येतात. त्याठिकाणी आधीच एमटीडीसीचे रेस्ट हाऊस आहे. त्याच्या पायथ्याशी थिजबी नावाचे ठिकाण आहे ते आपण वन विभागाच्या माध्यमातून विकसित करीत आहेत तसेच तेथे काळु नदीच्या काठावर कॉटेजस् बांधलेले आहेत. जिपलाईन, रिव्हर क्रॉसिंग, बर्मा ब्रिज अशा विविध सुविधा लवकरच सुरू होतील. याशिवाय तेथे प्रस्तावित ५ एअर कंडीशन कॉटेज आणि ३ टेंटस उपलब्ध आहेत. यासाठी तेथील स्थानिक युवकांना प्रशिक्षित करण्यासाठी एजन्सी नेमली आहे. या एजन्सीला ५ वर्षाचा कालावधी दिलेला असून त्या काळात एजन्सीने त्यांना प्रशिक्षित करावे. तसेच थिजबीमधील आदिवासींच्या गावठणामध्ये होमस्टे सारखी घरांमध्ये सुधारणा करून तिथे पर्यटकांची व्यवस्था करण्यात येईल.

समितीने यावर, शहापूर तालुक्यामध्ये एक आजोबा पर्वत आणि माऊली किल्ला ही दोन ऐतिहासिक ठिकाणे आहेत. या दोन्ही स्थळांना कोकण पर्यटक विकासामधून निधी उपलब्ध झाला असून या दोन्ही ठिकाणांना 'ब' वर्गामध्ये करावे. अशा प्रस्तावास मान्यता मिळवून घेतली तर चांगल्या प्रकारे विकास होऊ शकेल असे निदर्शनास आणले.

अभिप्राय व शिफारशी :—

(१) समितीने, दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयांसदर्भात झालेल्या साक्षीच्यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील ९ कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविल्यानंतर त्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाने शासकिय सेवेतून कमी करण्यात आले होते. तथापि, त्यानंतर सदर ९ कर्मचा-यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे याचिका दाखल केल्याने या ९ कर्मचा-यांवर कोणतीही कारवाई करु नये असे आदेश देऊन जिल्हाधिका-यांचा निर्णय रद्द केला होता. न्यायालयाने हे

आदेश देताना असेही म्हटले आहे की, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने या कर्मचा-यांच्या प्रमाणपत्राबाबत ६ महिन्यांच्या आत जे काही उपलब्ध कागदपत्र सादर केले असतील त्यानुसार निर्णय घ्यावा. **मा. उच्च न्यायालयाने प्रलंबित असलेली जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत निकाली काढण्यासाठी दिलेल्या आदेशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित अधिका-यांनी पाठपुरावा करणे आवश्यक होते. परंतु सदर प्रकरणे अजूनही प्रलंबित आहेत. अतः अवैध ठरविलेल्या ९ प्रकरणांचा शासनाने पाठपुरावा करून सदर प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा व त्याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(२) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरविलेल्या ९ कर्मचा-यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करून समितीचे आदेश रद्द करून घेतले आहे. महाराष्ट्र विधानमंडळाची अनुसूचित जमाती कल्याण समिती माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी गेली असता उक्त बाब समितीच्या निदर्शनास आली होती. त्यानंतर आठ महिन्याने म्हणजे दिनांक ३० जून, २०१७ रोजी उक्त कर्मचा-यांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार सेवेतून कमी करण्यात आले होते. त्यानंतर प्रकरण न्यायालयामध्ये गेले. दरम्यानच्या कालावधीत म्हणजेच दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ ते ३० जून, २०१७ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयाने उक्त कर्मचा-यांवर कारवाई करणे अपेक्षित होते. सदर प्रकरणी दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीच्या आरक्षित पदावर रुजू झालेल्या कर्मचा-यांनी सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्याच्यावर योग्य ती कारवाई करणे अनिवार्य आहे असे असताना जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित अधिका-यांनी कर्तव्यात कसूर केलेली आहे. **सबब, उक्त ९ कर्मचा-यांवर दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार विहित कालावधीत कारवाई न करणा-या जबाबदार अधिका-यांविरुद्ध कारवाई करून समितीला तीन महिन्यांत अहवाल सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

(३) आदिवासी विकास विभागाकडून ठाणे जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळा व ग्रामपंचायतीच्या व्यायामशाळांना क्रिडा साहित्य पुरविण्यात येते. त्यासाठी तरतूद केलेला निधी व आवश्यक साहित्य संबंधित ग्रामपंचायतीच्या व आश्रमशाळांना वेळेवर मिळत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. आदिवासी विकास विभागाकडून व्यायाम शाळेसाठी अनुदान दिले जाते. तरी आश्रमशाळांना आवश्यक ते साहित्य मिळत नाही. **यावर नियंत्रण ठेवण्यासाठी लागणा-या जिल्हा व तालुका क्रीडा अधिकारी यांची पदे रिक्त असल्याचेही समितीस आढळून आले आहे. अतः क्रिडा विभागातील रिक्त असलेली पदे त्वरित भरुन त्यावर केलेल्या कारवाईची माहिती तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

जिल्हा परिषद ठाणे

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी ठाणे जिल्हा परिषदेस भेट देऊन तेथे बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेकडून खालील प्रमाणे माहिती घेतली.

पेसा कायद्यांतर्गत करावयाची भरती :—

समितीने, एकत्रित ठाणे जिल्ह्यात पेसा गावे किती व आता पालघर जिल्ह्यात पेसा गावे किती आहेत. तसेच पेसा गावांत शिक्षकांची १०० टक्के पदे पेसा अंतर्गत भरण्यात आली आहेत काय, जिल्हा विभाजन झाल्यानंतर १०० टक्के पदे भरण्यात आली आहेत काय याची माहिती विचारली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, पालघर जिल्ह्यात जवळपास १०० टक्के गावे पेसाची आहेत. काही तालुक्यात ९५ टक्के गावे पेसाची आहेत. ठाणे जिल्ह्यात ३५६ ग्रामपंचायती असून त्यापैकी २०४ पेसा ग्रामपंचायती आहेत. महसुली गावे ४०० आहेत. वाडे व वस्त्या ६६० आहेत. विभाजनाअगोदर ठाणे जिल्ह्यातील शिक्षकांची एकूण पदे १०६१३ होती, त्यापैकी ३९०३ पदे ठाणे जिल्ह्यात असून पालघर जिल्ह्यात ६७१० शिक्षकांची पदे आहेत. दिनांक २२ जुलै २०१६ च्या शासन निर्णयानुसार सेवा ज्येष्ठता क्रमानुसार समायोजन करण्यात येणार आहे. ठाणे जिल्ह्यातील ३९०३ पदे मंजूर आहेत. या पदांची टक्केवारी ४५.८४ आहे. पालघर मध्ये ६७१० पदे असून विभाजनानंतर ही पदे ५१७२ होणार आहेत. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील रिक्त पदे राहणार नाहीत. यापुढे शिक्षक पदांची भरती सीईटी मार्फत होणार असून संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी ऑनलाईन परीक्षा होणार आहे, त्यामुळे पदभरती होईल अनुसूचित जमातीची २५ पदे मंजूर असून भरलेली पदे १९ आणि ६ पदे रिक्त आहेत. समायोजन प्रक्रिया पूर्ण झाल्यावर जाहिरात देऊन सरळसेवेने ती पदे भरण्यात येतील. बिंदूनामावलीनुसार समायोजनाची प्रक्रिया होणार असल्यामुळे पालघर येथे जे शिक्षक लागतील त्यांना पेसा अंतर्गत नेमणूक देण्यात येईल.

जात वैधता प्रमाणपत्राबाबत :—

समितीने, अनुसूचित जमातीची सरळसेवेने व पदोन्नतीद्वारे वर्ग ३ व ४ मधील एकूण ५३९ पदे भरण्यात आली. भरण्यात आलेल्या एकूण कर्मचा-यांमध्ये सन १९९५ व सन १९९५ नंतरचे किती कर्मचारी आहेत. त्यापैकी किती कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे, याबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विदित केले की, सन १९९५ पूर्वीची सरळसेवेची अनुसूचित जमातीची ३३८ पदे भरलेली असून सन १९९५ नंतर ५०२ पदे, अशी एकूण ८४० पदे भरलेली आहेत. या ८४० कर्मचा-यांपैकी ८११ कर्मचा-यांनी जातीचे प्रमाणपत्र दिलेले आहे. तर २९ कर्मचा-यांनी जातप्रमाणपत्र सादर केलेले नाही. सन १९९५ नंतर सेवेत रुजू झालेल्या ज्या कर्मचा-यांनी जातपडताळणी प्रमाणपत्रे सादर केली नसली तरी त्यांना शासन निर्णयानुसार सेवेतून कमी करता येत नाही. परंतू ते कर्मचारी ज्या जातीत

असतील त्यात त्यांना दाखवून अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करण्यात यावा. अनुसूचित जमातींच्या ३२९ कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेली असून ९ कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेली नाही. यामध्ये श्रीमती व्ही.एस. मुगलकर, श्रीमती एस.पी. खडसे, श्रीमती व्ही.पी. शिंदे, श्रीमती जे.आर. शिंदे, श्री.जे.एन. गहाणे, श्री.एस.एस. संत, श्री.नारायण नामदेव मोरे, श्री.कमळू राघो गावंडा, श्री.दत्तात्रय शिदू वाघ, श्री.विजय सिंग नंदाभाई पाडवी, श्री.दिनेश भागवत तावडे, श्री.रवींद्र वसंत तायडे , श्री.विजयकुमार बाबुराव बोयने, श्री.वासूदेव एकनाथ ठाकूर, यांची प्रकरणे वेगवेगळया जातपडताळणी समित्याकडे प्रलंबित आहेत. यापैकी ३ प्रकरणे अमरावतीकडे, नागपूर समितीकडे २ प्रकरणे, नंदूरबार ४ प्रकरणे, औरंगाबाद समितीकडे २ प्रकरणे प्रलंबित आहेत.

समितीने, यावर विलंब करणा-या जबाबदार अधिका-यांवरही कारवाई करण्यात यावी. दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही होणे अपेक्षित होते. परंतू ठाणे जिल्हा परिषदेमध्ये बोगस प्रमाणपत्र धारकांवर कोणतीही कारवाई होताना दिसत नाही ही खेदाची बाब आहे. अवैध प्रमाणपत्राद्वारे सन १९९६ पासून आतापर्यंत म्हणजे २० वर्षे सेवा झालेले हे उमेदवार आहेत. अवैध प्रमाणपत्र सादर करून एखाद्या आस्थापनेवर २० वर्ष सेवा करणे ही गंभीर बाब असून जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी व अवैध प्रमाणपत्र धारक अधिकारी/कर्मचारी यांना तातडीने निलंबित करून अनुसूचित जमातीचे बिंदू रिक्त करावेत असे निर्देशित केले.

समितीने, जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील श्रीमती ज्योती शिंदे यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र नसताना सुद्धा पदोन्नती दिल्याने संबंधित कर्मचारी व त्यांना पदोन्नती देणारे जबाबदार अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे आदेश दिले.

यानंतर शिक्षणाधिका-यांनी नमूद केले की, शिक्षक कर्मचा-यांच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत समितीने विचारणा केली असता शिक्षक कर्मचा-यांनी कागदपत्रे सादर केली आहेत, काही कर्मचारी न्यायालयात गेले आहेत, त्यांच्याबाबत न्यायालयाने स्थगिती आदेश दिले आहेत. त्यामुळे त्यांना सेवेतून कमी करावे किंवा करु नये असा संभ्रम निर्माण झाला आहे. ठाणे जिल्ह्यातील १३ प्रकरणे न्यायालयात सादर करण्यात आली आहेत. त्यांना सेवा समाप्तीची नोटीस दिली होती परंतू त्याबाबत न्यायालयाने स्थगिती दिली आहे. सन २०१४ मध्ये शिक्षण विभागाने शून्य बिंदूवर भरती केलेली आहे.

समितीने, यावर जिल्हा परिषदेचा हा हलगर्जीपणा आहे, त्यांच्यावर वेळेत कारवाई झाली असती तर त्या कर्मचा-यांना न्यायालयात जाण्याची संधी मिळाली नसती. दिनांक १८ मे २०१३ च्या शासन निर्णयानुसार कारवाई झाली असती तर सन २०१५ चा शासन निर्णय त्यांना लागू झाला नसता. या कामास ज्या अधिका-यांनी विलंब केला आहे त्यांच्यावर कारवाई करावी असे समितीने निदेशित केले.

आदिवासी उपयोजनाक्षेत्रात राबवावयाच्या योजना :—

कृषी विभाग :—

समितीने, आदिवासी उपयोजनाक्षेत्रात तालुकानिहाय कोण-कोणत्या योजना राबविण्यात आल्या आहेत व योजनेचे निकष काय आहेत. सन २०१२-२०१३ ते २०१४-२०१५ या कालावधीत किती योजना राबविण्यात आल्या व त्यावर किती खर्च करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे वैयक्तिक लाभाच्या कोणत्या योजना राबविण्यात आल्या आहेत, याची सविस्तर माहिती देण्यास सांगितले असता कृषी अधिका-यांनी विदित केले की, राज्य शासनामार्फत आदिवासी उपयोजनेतंर्गत दारिद्रयरेषेखालील आदिवासी शेतक-यांना कृषी विकासासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना आदिवासी उपयोजना व बाहयक्षेत्रात राबविण्यात येतात. यामध्ये जमीन सुधारणा, निविष्ठा वाटप, पीक संरक्षण, शेतीची सुधारीत अवजारे, बैलजोडी, रेडेजोडी, जुनी विहिर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, पाईपलाईन, पंपसंच, नवीन विहिर, शेततळे, परसबाग कार्यक्रम, तुषार/ठिंबक सिंचन पुरवठा इ. योजना राबविण्यात येत असून या योजनांना १०० टक्के अनुदान वाटप करण्यात आले आहे. ज्या शेतक-यांकडे त्यांच्या स्वतःच्या नावे ६ हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जमीन असेल व ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. २५,०००/- पर्यंत आहे असे दारिद्रय रेषेखालील शेतकरी लाभार्थी म्हणून निवडीस पात्र असतात. उपयोजना क्षेत्रातील शहापूर, मुरबाड, भिवंडी या तालुक्यांत सन २०१४-२०१५ मध्ये १३ कोटी १८ लाख रुपये खर्च करण्यात आलेला आहे. हा खर्च एकत्रित ठाणे जिल्ह्यात करण्यात आलेला आहे. सन २०१५-२०१६ या वर्षात १ कोटी ४३ लक्ष रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्यानंतर ३ कोटी ७५ लाख रुपये १५ बाबींवर खर्च करण्यात आले आहेत. उपयोजनाबाह्य क्षेत्रात मुरबाड, भिवंडी, अंबरनाथ, कल्याण या शहरात सन २०१४-१५ मध्ये २ कोटी रुपयांची तरतूद होती, त्यापैकी ठाणे जिल्ह्यात ९५ लाख रुपये खर्च करण्यात आले व १ कोटी रुपये जिल्हाधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहेत. सन २०१५-१६ मध्ये ५० लाख रुपयांची तरतूद होती त्यापैकी ३२ लाख रुपये खर्च झाले आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये १६१ लाभार्थी होते. त्यापैकी ७६ लाभार्थ्यांची निवड पूर्ण झाली आहे. आदिवासी लोकांना अवजारे, खते, किटक नाशके, विळे, नांगर, मळणी यंत्र, जमीन सुधारणा अशा प्रकारे लाभ देण्यात आलेला आहे, प्रत्येक लाभार्थ्यांना ५० हजार रुपये देण्यात आले आहेत. लाभार्थ्यांना राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून विहिर देण्यात आली आहे, अशा प्रकारच्या योजना राबविण्यात आल्या आहेत.

लघुपाटबंधारे विभाग :—

समितीने, या यंत्रणेतंर्गत आदिवासी उपयोजनाक्षेत्रात तालुका निहाय कोण-कोणत्या योजना राबविण्यात आल्या आहेत व योजनेचे निकष काय आहेत. तसेच सन २०१४-१५ मध्ये प्राप्त झालेली रुपये ७,०९,०३६ रक्कम कोणत्या कामांवर खर्च करण्यात आली होती त्या कामांची माहिती समितीला सादर करण्यास

सांगितले असता कार्यकारी अभियंत्यांनी विदित केले की, १०० हेक्टर क्षेत्रापर्यंतच्या सिंचन क्षमतेच्या लघुपाटबंधारे योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत आहेत. पाझर तलाव सिंचन योजना, वळण बंधारा, उपसा सिंचन योजना राबविण्यात आल्या आहेत, लोकसंख्येच्या निकषानुसार गाव व पाड्यांची एकूण आदिवासी लोकसंख्या ८० टक्के पेक्षा अधिक असणे आवश्यक आहे, त्यानुसार योजना राबविण्यात येत आहेत. सन २०१४-२०१५ मध्ये ७८२ लक्ष रुपये उपलब्ध झाले होते त्यापैकी ७८० लक्ष रुपये खर्च करण्यात आले आहेत. योजना निहाय खर्च करण्यात आलेला असून पालघर जिल्ह्यात ६३७ लक्ष रुपये वर्ग करण्यात आले आहेत. ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर सन २०१५-१६ मध्ये ९७.३२ लक्ष रुपये उपलब्ध झाले होते ती संपूर्ण रक्कम खर्च झाली आहे. सन २०१६-१७ चा निधी प्राप्त झालेला नाही. सन २०१५-१६ मध्ये निधी कमी प्राप्त झाला होता. त्या रकमेत चार कामे पूर्ण झाली असून एक काम प्रगतीपथावर आहे.

सन २०१४-१५ मध्ये मुरबाड साठवण बंधारा तयार करण्यात आला व त्यावर ११.२४ लक्ष रुपये खर्च करण्यात आले असून सदर काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर बंधा-यात पाण्याचा साठा झालेला आहे. तसेच येथे दगडी बंधारेही बांधले आहेत, सिसेवाडी येथे वळण बंधारा बांधण्यासाठी २४ लक्ष रुपयांची तरतूद होती. हा वळण बंधारा बांधण्यासाठी १४.१८ लक्ष रुपये खर्च करण्यात आले आहे. सन २०१४-२०१५ मध्ये पाटबंधा-यांच्या कामांसाठी ३ कोटी ८५ लाख रुपये प्राप्त झाले. पैकी ९५ लाख ६३ हजार रुपये खर्च केले आणि २ कोटी ८९ लाख रुपये शिल्लक राहिले. त्यापैकी पालघर जिल्ह्यांसाठी २ कोटी ७४ लाख रुपये रक्कम वर्ग केली. यातील १.३६ कोटी रुपये खर्च केले आणि १ कोटी ४९ लाख रुपये शिल्लक राहिले. शहापूर वांद्रे येथे के.टी.वेअर बंधारे बांधले आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये ५ कामे घेतली होती. कारपाडवाडी १२.८७ लाख, शहापूर येथील तारणे फणवाडी ११.४५ लाख आणि भिवंडी येथे ८.७३ लाख रुपयांचा काँक्रिट बंधारा, अशी कामे हाती घेतली होती. लोकप्रतिनिधींकडून सूचविण्यात आलेली कामे एकत्रित करून त्यानुसार वार्षिक आराखडे तयार केले जातात. यावर्षी सर्वात जास्त निधी शहापुरला दिलेला आहे. दोन के.टी. बंधारे शहापुर तालुक्यात घेतले आहेत. सन २०१६-२०१७ मध्ये शहापूर तालुक्यात ८ कामे हाती घेतलेली आहेत.

आरोग्य विभाग :—

समितीने, अंगणवाडीमध्ये पुरविण्यात येणारे अंडी व केळी यांच्या दराबाबत विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार या योजनेचा पहिला टप्पा सुरू झाला आहे. याकरिता १ कोटी १५ लाख रुपये ठेव ठेवलेली आहे. शासनाकडून ५ रुपये प्रती अंडे प्रमाणे आठवड्यातून ४ दिवस दिले जातात. अंड्याची ठोक खरेदी केल्यावर ४ ते ५ रुपयास मिळते. अंडी शिजवण्यासाठी इंधन लागते. याबाबतचे निकष ठरविताना आम्ही

या कामाकरिता रुपये ६ प्रमाणे मागणी केली आहे. यामध्ये वाहतुक खर्चही करावा लागतो. रुपये ५ दराप्रमाणे परवडत नाही व पैसे वाढवून देण्याबाबतही सांगितले होते. डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम योजनेमध्ये स्तनदा मातांना चौरस आहार द्यावा असे अपेक्षीत आहे. त्याकरिता २५ रुपये दिले जातात हे पुरेसे नाही. यामध्ये लाडू, केळी, अंडी देणे अपेक्षीत आहे. यामुळे योजनेची अंमलबजावणी करताना अडचणी निर्माण होतात. ठाणे जिल्ह्यातील ६ प्रकल्पामध्ये ७२० मूळ अंगणवाड्या व १६७ मिनी अंगणवाड्या अशा एकूण ८७७ अंगणवाड्या आहेत. येथे एकूण ६५२४ स्तनदा माता आहेत. या खात्याकडून सीडीपीओकडे निधी वर्ग करतो. सीडीपीओ व अंगणवाडी यांचे संयुक्त खाते आहे. यामध्ये आदिवासी समाजाचा प्रतिनिधीसुद्धा असतो. प्रती मातेवर रु. २५ प्रमाणे खर्च केला जातो. गावामध्ये याबाबत जनजागृती करण्याचे काम सुरू असल्याने ही योजना व्यवस्थित चालू आहे. यावर समितीने, गरीबांना पोषण आहार मिळावा यासाठी अंगणवाड्यांमध्ये पुरविल्या जाणा-या अन्यधान्यासाठी अनुदान वाढविण्याबाबत शिफारस करण्यात येईल असे आश्वासित केले.

ठाणे जिल्ह्यातील तालुकानिहाय सॅम व मॅम मधील बालकांची माहिती देताना नमूद केले की, १३५ बालके सॅममध्ये आहेत. यातील अंबरनाथ ०, भिवंडी २६, कल्याण ६, मुरबाड ३९, कल्याण ६, शहापूर ६४ आहेत. मॅम मध्ये ८११ बालके असून भिवंडी १७०, कल्याण ४२, मुरबाड २१५, शहापूर ३७७ अशी तालुकानिहाय बालके आहेत. शासनाने व्हीसीडीसी योजना बंद केल्याने जिल्हाधिका-यांनी नावीण्यपूर्ण योजनेतून ९ लाख ६० हजार रुपये उपलब्ध करून दिले होते. ही रक्कम केवळ आदिवासी विभागातील कुपोषित बालकांसाठी होती. सद्यस्थितीत सॅमची ६४ बालके व मॅमची ३७७ बालके रुग्णालयात दाखल असून बालकांमध्ये सुधारणा होत आहे.

ग्रामीण पाणीपुरवठा योजना :—

समितीने, ग्रामीण पाणी पुरवठ्याची समितीला माहिती देण्यास सांगितले असता कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेमध्ये ५०-५० टक्के सहभाग आहे. आदिवासी भागातील क्षेत्रामध्ये आदिवासींची लोकसंख्या ५० टक्के असावी तसेच ६० टक्के हगणदारीमुक्त गाव असणे आवश्यक आहे. या योजनेंतर्गत सन २०१४-२०१५ मध्ये ३३ कामे हाती घेतली होती, यापैकी १४ ठिकाणी पाणीपुरवठा सुरू झालेला आहे. त्यासाठी ५३ टक्के निधी खर्च झाला आहे. सन २०१५-१६ मध्ये १४ कामापैकी २ कामे पूर्ण झाली आहेत. पाण्याच्या कमतरतेमुळे एक योजना रद्द झाली असून सहा योजनांचे काम प्रगतीपथावर आहेत. मुरबाड तालुक्यात मासलेपाडा येथे विहीर घेण्यात आली होती. निकषाप्रमाणे भुजल खात्याचा दाखलाही घेतला होता. परंतु त्या जागेवर पुरेसे पाणी लागले नाही त्यामुळे तेथील काम रद्द करावे लागले. शहापूर तालुक्यातील काही गावे अतिशय उंच ठिकाणावर असल्यामुळे तेथे पाण्याचा सोर्स नाही, त्यामुळे त्या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत होता. तालुक्यातील

१२२ गावे टँकर मुक्त करण्यात आली आहेत. शहापूर तालुका टँकर मुक्त करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी प्रयत्न करीत आहेत. योजनांचा आराखडा तयार करून टंचाईग्रस्त भागात बोअरवेल घेण्यात आल्या आहेत, एकूण ८५ बोअरवेल घेण्यात आल्या आहेत.

समितीने यावर, शहापूर तालुक्यात जी धरणे आहेत त्यातून मुंबईला १०० टक्के पाणीपुरवठा करण्यात येतो. परंतु शहापूर तालुक्यातील अनेक गावांना पाणीपुरवठा होत नाही. स्टेम कंपनीशी याबाबत २०० कोटी रुपयांचा करार केलेला आहे. या योजनेसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्यात यावा व आदिवासी उपयोजनेचा पैसा गावांसाठी खर्च करावा असे समितीने निदेशित केले.

ग्रामपंचायत विभाग :–

समितीने, ग्राम पंचायत यंत्रणेअंतर्गत आदिवासी उपयोजनाक्षेत्रात तालुकानिहाय कोण-कोणत्या योजना राबविण्यात आल्या आहेत व योजनेचे निकष काय आहेत. त्याचप्रमाणे जिल्हास्तरावर पेसा समिती स्थापन झाली आहे काय अशी विचारणा केली असता अतिरिक्त कार्यकारी अधिका-यांनी विदित केले की, आदिवासी विकास विभागाकडील २१ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयानुसार योजनानिहाय खर्च करण्यात आलेला आहे. यामध्ये खर्चाचे नियोजन करण्यात आले असून पायाभूत सुविधा, वन हक्क अधिनियम व पेसा कायद्याची अंमलबजावणी, आरोग्य स्वच्छता, शिक्षण, वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वनावर आधारीत उपजिविका या योजना राबविण्यात आल्या आहेत. सन २०१५-१६ मध्ये १२ कोटी ६४ लाख रुपये मिळाले आहेत, मुरबाड, शहापूर व भिवंडी या तालुक्यात ५ कोटी २६ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. यामध्ये सौर दिवे लावणे, शाळा डिजिटल करणे, बोअरवेल, नळ पाणीपुरवठा योजना, स्मार्ट अंगणवाडी या कामांसाठी शहापूर येथे पेसा कायद्याअंतर्गत निधी देण्यात आलेला आहे.

समितीने, आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ग्रामपंचायती मध्ये ज्या इमारती आहेत, त्यांची काय परिस्थिती आहे याबाबत विचारणा केली असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विदित केले की, आमच्याकडे एकूण ६६० गावे पाडे आहेत. ६६० गावे-पाड्यांपैकी ५३३ गावांना पेसा क्षेत्रात घोषित केले आहे. भिवंडी तालुक्यातील १२० ग्रामपंचायतीपैकी ३९ ग्रामपंचायती पेसा क्षेत्रातील आहेत. जन सुविधा योजनेत सर्व ग्रामपंचायतीच्या इमारती पूर्ण झालेल्या आहेत. जन सुविधा योजनेत ग्रामपंचायतीचे विस्तारीकरण ही मंजूर करता येते. ठक्कर बापा योजनेत १४ कामे घेतलेली आहेत. जन सुविधेच्या धर्तीवर ठक्कर बापा योजनेत काम घेता यावे, असा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे. सध्या ग्रामपंचायत कार्यालयाचे नुतनीकरण, सुशोभिकरण अशा दोन प्रकारची कामे घेता येतात. यासाठी १२ लाख रुपयांची मर्यादा आहे. भिवंडी ३९, शहापूर ११० आणि मुरबाड १५५ ग्रामपंचायती या आदिवासी उप योजना क्षेत्रात येतात.

समितीने, शाळा इमारतीच्या दुरुस्तींसाठी जिल्हा परिषदांकडे किती निधी प्राप्त झाला आणि त्यातील शाळांच्या दुरुस्तीसाठी किती खर्च केला अशी विचारणा केली असता शिक्षणाधिका-यांनी नमूद केले की, जिल्हा परिषदांच्या शाळांसाठी १७ कोटी रुपये मंजूर आहेत. चालू वर्षी ६ कोटी रुपये नवीन वर्गखोल्या बांधण्यासाठी मंजूर केले आहेत. शाळांच्या दुरुस्तीसाठी ४ कोटी रुपये मंजूर आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील ३२३ वर्ग खोल्या धोकादायक असल्याबाबत अहवाल त्या शाळांच्या मुख्याध्यापकांकडून आलेला आहे. त्यापैकी २०७ वर्गखोल्या पाडण्याची परवानगी दिलेली आहे. काही शाळांना दुरुस्तीची गरज होती म्हणून दुरुस्तीचा प्रस्ताव तयार केलेला असून त्याला मंजुरी दिलेली आहे..

स्वच्छ भारत अभियान :—

जिल्हा परिषदेतर्फे राबविण्यात येणा-या स्वच्छ भारत अभियानाबाबत जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिका-यांनी नमूद केले की, स्वच्छ भारत अभियानामध्ये पायाभूत सर्वेक्षण सन २०१२ च्या यादीतील दारिद्र्य रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील लाभार्थी कुटुंबांना १२ हजार रुपये प्रोत्साहन अनुदान देण्यात येते. ठाणे जिल्ह्यात सन २०१४ -२०१५ मध्ये आदिवासीकरिता १३५.७३ कोटी एवढा निधी प्राप्त झाला होता. प्रत्यक्षात ४२५.१० कोटी एवढा खर्च झाला आहे. भौतिक साध्यामध्ये कुटूंबांना अनुदान वितरीत केलेल्यांची संख्या ३९८६ होती. सन २०१५-२०१६ मध्ये राज्य सरकार व केंद्र सरकारकडून ७८१.४९ कोटी एवढा निधी प्राप्त झाला होता. प्रत्यक्षात ९२७.८४ कोटी इतका खर्च झालेला आहे. भौतिक साध्यामध्ये कुटुंबांना अनुदान वितरीत केलेल्यांची संख्या ७७३२ होती. सन २०१६-२०१७ मध्ये ६६४.५६ कोटी निधी मिळाला असून २४४.३२ कोटी खर्च झाला आहे. भौतिक साध्यामध्ये कुटुंबांना अनुदान वितरीत केलेल्या संख्या २०३६ होती. या वर्षीची मंजूर कामे १६८३३ आहेत. त्यापैकी २०३६ साध्य झाली आहेत व १४७९७ बाकी आहेत. पायाभूत सुविधा सर्वेक्षण यादीनुसार ४३० ग्रामपंचायतीपैकी २०१ ग्रामपंचायतीमधील लक्ष पूर्ण झालेले आहे. केंद्र सरकारने घोषित केलेल्या १० जिल्ह्यामध्ये ठाणे जिल्ह्याचा समावेश आहे.

शिक्षण विभाग :—

जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिका-यांनी समितीस शिक्षण विभागासंदर्भात खालील माहिती दिली. शालेय पोषण आहारामध्ये ग्रामीण व शहरी असे दोन भाग आहेत. ग्रामीण भागात तांदूळ, धान्य, मसाले यांचा पुरवठा करण्यात येतो. शहरामध्ये तांदूळ पुरविला जातो व बाकीचे अनुदान त्यांच्या खात्यावर वर्ग केले जाते. शालेय पोषण आहाराकरिता ५ तालुके, ६ महानगरपालिका, १ नगरपालिका व माध्यमिक शिक्षण विभाग असे एकूण १३ गट आहेत. शालेय पोषण आहाराकरिता सन २०१४-२०१५ साठी ८० कोटी १९ लाख रुपये आले होते, त्यापैकी ७४ कोटी १६ लाख रुपये खर्च झालेले आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये ६६ लाख ८५ हजार रुपये आले होते, त्यापैकी ४९ लाख ४७ लाख रुपये खर्च झालेला आहे.

सन २०१६-२०१७ साठी ३१ कोटी ५४ लाख मिळालेले आहेत. त्यापैकी ५ कोटी ३९ लाखांचा आतापर्यंत खर्च झालेला आहे. सर्व शिक्षा अभियान केंद्र व राज्य पुरस्कृत अशी नवीन योजना आहे. यामध्ये नवीन शाळा सुरू केल्यानंतरची एक योजना आहे. दुसरी योजना नवीन शिक्षक/निमशिक्षकांना वेतनाबाबत आहे. यामध्ये सुरू केलेल्या वस्तीशाळेवर नेमलेल्या शिक्षकांना वेतन अनुदान शासन देते. असे ३५८ प्राथमिक शिक्षक व १२ उच्च प्राथमिक शिक्षक कार्यरत आहेत. त्यासाठी सन २०१४-२०१५ मध्ये २०७९.७२ लाख आले असून ४८९ लाख रुपये खर्च झाले होते. उपलब्ध अनुदानाच्या अधीन राहून जिल्हा परिषद सेसमध्ये ही रक्कम वर्ग केली होती. यांचा संपूर्ण पगार जिल्हा परिषद सेस मधून जातो म्हणून आपण वेगळे वेतन शाळांकडे देत नाही. शिक्षक अनुदान ही आपली पुढील योजना आहे. शाळेतील पाहिली ते आठवी शिक्षकांना शैक्षणिक साहित्य तयार करण्याकरिता प्रती शिक्षक ५०० रुपये अनुदान दिले जाते. वर्षभरासाठी बैठक भत्ता ७५ हजार रुपये अनुदान प्रती वर्षी येत असते. सन २०१४-२०१५ मध्ये ३३६.५६ लाख रुपये मंजूर झाले होते. त्यापैकी ३०८.७३ लाख रुपये खर्च झाला आहे. सन २०१६-२०१७ मध्ये सप्टेबर अखेर २६०.६१ लाख रक्कम मंजूर आहे व ८७.७६ लाख रुपये खर्च झाला आहे. समुह साधन केंद्राच्या योजनेत प्रती समुह साधन केंद्रासाठी २२ हजार रुपये अनुदान प्राप्त होते. दुसरी बाब अशी की, पेसा अंतर्गत येणा-या शाळा डिजिटल करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. त्यासाठी १३ व १४ व्या वित्त आयोगाकडून ६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला होता. जिल्हा परिषदेकडून २०० शाळांना सोलर पॅनल बसविण्यात आले आहेत. ठाणे जिल्ह्यातील सर्व शाळा डिजिटल करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

सुवर्ण जयंती महोत्सव शिष्यवृत्ती योजनेबाबत समितीने विचारणा केली असता प्रकल्प संचालकांकडून सांगण्यात आले की, सन २०१५-१६ मध्ये पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे पैसे दिले होते. या वर्षी मार्च महिन्यांत ४ कोटी ८२ लाख रुपये वर्ग करण्यात आले आहेत. ही रक्कम १७ हजार विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आली आहे. प्रकल्प कार्यालय, शहापूर व जिल्हा परिषदेचे लेखा व वित्त अधिकारी यांच्या माध्यमातून पहिली ते चौथी इयत्तेमधील १७०० पालकांच्या खात्यावर ही रक्कम वर्ग करण्यात आली आहे.

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान :—

समितीने, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानासंदर्भातील माहिती देण्यास सांगितले असता शिक्षण धिका-यांनी खालील प्रमाणे सविस्तर माहिती सादर केली. जिल्हास्तरावर ग्रंथ महोत्सव व विज्ञान प्रदर्शन तीन दिवस आयोजित करण्यात आले होते. हा उपक्रम राबविण्यासाठी सन २०१४ ते २०१६-१७ या तीन वर्षासाठी प्रत्येक वर्षाला एक लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही योजना स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत राबविण्यात येते, त्याचप्रमाणे समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद अशा विविध खात्यांमार्फत ६३ शाळांमध्ये ही योजना राबविण्यात येते. ठाणे, नवी मुंबई, भिवंडी, मिरा-भाईंदर महानगरपालिका

यांच्यामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे. नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. यासाठी ९ लाख रुपयांचा निधी देण्यात आला होता. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक परिषदेमार्फत आरटीजीएस करण्यात आले आहे. शाळा व्यवस्थापन सामुग्रीसाठी ५० हजार रुपये देण्यात येतात. ही योजना केंद्र शासनामार्फत राबविण्यात येत असून गेल्या दोन वर्षापासून केंद्र शासनाकडून तरतूद कमी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना व विद्यार्थ्यीनींना स्वसंरक्षणार्थ दोन तासाचे कराटे प्रशिक्षण देण्यात येते. यासाठी दरवर्षी १० हजार रुपये देण्यात येतात. हे सर्व विद्यार्थी ९ ते १२ व १४ ते १८ वयोगटातील आहेत.

समितीने, मागील दोन वर्षात खाजगी अनुदानित शाळांच्या संदर्भात दोन वेळा सुनावणी झाली होती, त्यावेळी अध्यक्ष गैरहजर राहिले होते त्यांना पत्र देण्यात आले होते काय अशी विचारणा केली असता शिक्षणाधिका-यांनी सांगितले की याबाबत आठ सदस्यांची समिती गठित करण्यात आली असून सदर संस्थांना लेखी कळविण्यात आले आहे, आता संबंधित संस्थेवर कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे असे सांगितले.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा :–

समितीने, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत कोण-कोणत्या योजना राबविण्यात आल्या आहेत, अशी विचारणा केली असता प्रकल्प संचालकांनी समितीस विदित केले की, शबरी घरकुल योजना, इंदिरा आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना, या योजना आदिवासी उपयोजनेअंतर्गत राबविण्यात येतात. या योजनेचा संपूर्ण निधी लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येतो. लाभार्थ्यांना हे अनुदान टप्प्या टप्प्याने देण्यात येते. या योजनेमध्ये एक लाख रुपये देण्यात येत असून यापैकी ९५ हजार रुपये शासनाकडून अनुदान देण्यात येते व ५ हजार रुपये स्वहिस्सा असतो. अशा प्रकारे एक लाख रुपयांमध्ये घरकुल योजना राबविण्यात येते. घरकुल योजनेसाठी जमीन उपलब्ध नसल्यास जमीन घेण्यासाठी ५० हजार रुपये देण्यात येतात. तसेच १२ हजार रुपये शौचालय बांधण्यासाठी मिळतात या योजनेतून १ लाख २० हजार रुपये शासनाकडून अनुदान देण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्यात दारिद्र्य रेषेखालील १८ हजार घरकुले ग्रामसभेने मंजूर केली असून ती प्राधान्य यादीत आहेत. अनुसूचित जमातीची ६ हजार घरकुले पात्र झालेली आहेत. त्यापैकी २९०० घरकुलांचा लक्ष्यांक असून १७०० घरकुले मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत. शबरी आदिवासी घरकुल योजनेतंर्गत सन २०१६-२०१७ मध्ये ८५९ घरकुलांचे लक्ष्यांक असून ८९६ घरकुलांना ग्रामसभेने मान्यता दिलेली आहे. या घरकुलांसाठी ग्रामीण क्षेत्रात उत्पन्नाची मर्यादा एक लाख रुपये आणि जातीचा दाखल्याची अट आहे. यावर समितीने घरकुल व शौचालय बांधण्यासाठी प्राप्त झालेल्या निधीचा योग्य प्रकारे विनियोग होतो की नाही, जी शौचालय बांधली आहेत त्या शौचालयाच्या कामाचा दर्जा व त्याचा वापर योग्य रितीने होतो की नाही यांची वारंवार पडताळणी करावी असे सूचित केले.

प्रशासन अधिका-यांनी पुढे विदित केले की, कौशल्य विकास योजनेतंर्गत १८ ते ३५ वयोगटातील लोकांना प्रशिक्षण देण्यासाठी ४ संस्था आहेत. त्यामध्ये एकूण ७९ लोकांना प्रशिक्षण दिले जात असून त्यात १८ व्यक्ती ह्या अनुसूचित जमातीमधील आहेत. त्यातील चार व्यक्तिंना सुरक्षा रक्षकाचे तीन महिन्यांचे प्रशिक्षण दिल्यानंतर त्यांना नेमणूक दिली जाईल.

विभागीय सचिवांची साक्ष :—

समितीने, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी ठाणे जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ व दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी जिल्हा परिषदेसंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

जिल्हा परिषदेमार्फत राबवावयाच्या पाणीपुरवठा व घरकुल योजनांबाबत :—

समितीने, नवीन आराखड्यामध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत शहापूर तालुक्यामधील काही गावांमध्ये योजना मंजूर झालेल्या आहेत. परंतु सध्या तेथे पाण्याचे अतिशय दुर्भिक्ष्य आहे. या संदर्भात तातडीने कामे सुरू करण्यासाठी कोणत्या उपाययोजना घेतल्या आहेत अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विदित केले की, राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत १३३ योजना मंजूर झाल्या होत्या, त्यापैकी १२ योजना रद्द झालेल्या आहेत. उर्वरित १२१ योजनाच्या संदर्भात ८६ ई-निविदा वेबसाईटवर टाकण्यात आलेल्या आहेत. ठाणे जिल्ह्यात राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत सर्वात जास्त योजना मंजूर झालेल्या आहेत.

समितीने, ठाणे जिल्हा परिषदेला शबरी घरकुल योजनेमध्ये प्रथम क्रमांक मिळाल्याची माहिती समितीला दिली. जिल्हा परिषदेअंतर्गत कोणकोणत्या योजनेअंतर्गत घरकुले देण्यात आली व गरजू लाभार्थी असलेल्या किती टक्के लाभार्थ्यांना घरकुले देण्यात आली आहेत असा प्रश्न केला असता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी नमूद केले की, केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणा-या घरकुल योजनांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना व आदिम आवास योजना राबविल्या जात आहेत. घरकुल योजनांच्या संदर्भात जिल्हा परिषदेने ९० टक्के उद्दिष्ट पूर्ण केले असल्यामुळे जिल्हा परिषदेस शबरी आवास योजनेमध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळालेले आहे.

याबाबत प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, यांनी पुढे स्पष्ट केले की, केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना, (ग्रामीण) या योजनेत सन २०१६ ते २०१८ च्या काळात ४६३५ घरकुले मंजूर करण्यात आली होती. त्यामध्ये ३२२३ घरकुले अनुसूचित जमातीकरिता होती. त्यापैकी २६२१ घरकुले पूर्ण झाली असून ५८७ घरकुले प्रगतीपथावर आहेत. सन २०१८-१९ ची घरकुलांची मंजुरी प्रस्तावित आहे. सन २०१६-१७ मध्ये ७७३ घरकुले मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी ६६९ घरकुले पूर्ण झाली असून ४४ घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. काही घरकुल योजनांमध्ये लाभार्थी स्वतः घर बांधत असतात.

सन २०१७-१८ मध्ये विलंबाने घरकुलांना मंजुरी देण्यात आली होती. परंतु लाभाथ्यांनी घरकुल बांधण्यासाठी जास्त वेळ घेतल्यामुळे विलंबाने घरकुले बांधली जात आहेत. सदर घरकुले साधारणतः डिसेंबर अखेर पूर्ण होतील.

समितीने, ठाणे जिल्ह्यातील कु. हनी बरफ या मुलीच्या मोठ्या बहिणीवर सन २०१४ मध्ये वाघाने झडप मारली होती. त्यावेळी हनी बरफ हिने वाघाला काठी आणि दगड मारून आपल्या बहिणीला वाघाच्या तावडीतून सोडविले. हनी बरफ हिला राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार मिळावा राज्य सरकारच्या वतीने शिफारस करण्यात आली. तद्न्नंतर हनी बरफ हिला तत्कालीन पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या हस्ते राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार मिळाला. परंतु मध्यंतरी शासनाला शौर्य पुरस्कार प्राप्त कु. हनी बरफ हिचा विसर पडला. राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार प्राप्त मुलीचे कुडाचे घर असून वर ताडपत्री टाकलेली आहे. उद्या खायला मिळेल की नाही, या परिस्थितीत ती जीवन जगत आहे. राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार प्राप्त मुलीची ही अवस्था आहे याबाबत तिच्याकडे विचारणा केली असता, तिने घरकुल आणि नोकरीची मागणी केली. स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रकल्प अधिका-यांशी चर्चा केल्यानंतर तिला आदिवासी आश्रमशाळेत तात्पुरत्या स्वरूपात रोजंदारीवर काम देण्यात आले. राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार प्राप्त हनी बरफ हिला आदिवासी विकास विभागाने विशेष बाब म्हणून वर्ग-४ अंतर्गत नोकरीमध्ये सामावून घेण्यात यावे असे समितीने सूचित केले असता प्रकल्प संचालकांनी खुलासा केला की, सन २०१६-१७ वर्षामध्ये शबरी आवास विकास योजनेकरिता काही निकष ठरवून देण्यात आले होते. त्यानुसार लाभार्थी एसीसी बाहेरील असावा. तसेच जमातीचा व उत्पन्नाचा दाखला घेऊन त्याला घरकुल मंजूर केले जात होते. सन २०१७-१८ मध्ये आदिवासी विकास विभागाने काढलेल्या नवीन शासन निर्णयानुसार जिल्ह्याकरिता ४६३ लाभाथ्यांची यादी देण्यात आली. तसेच त्यातील जे लाभार्थी घरकुलांच्या निकषानुसार पात्र आहेत त्यांची घरकुलांसाठी निवड करावी अशा प्रकारचे विभागाचे आदेश होते परंतु हनी बरफ या मुलीचे नाव त्या यादीत नव्हते. कु. हनी बरफ यांना विशेष बाब म्हणून घरकुल मंजूर करून ते प्रकरण कार्योत्तर मान्यतेसाठी पाठविलेले आहे. जिल्हा परिषदेचे घरकुलाचे उद्दिष्ट मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे त्या उद्दिष्टानुसार शिल्लक राहिलेली घरकुले मंजूर करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिका-यांनी घेतला आहे. त्यामुळे आता उपरोक्त दोन्ही निर्णय झालेले असल्याने या संदर्भातील प्रस्ताव सादर करण्यात येईल असे आयुक्त, आदिवासी विकास यांनी समितीस आश्वासित केले.

शिक्षकांची बिंदूनामावली व जात वैधता प्रमाणपत्राबाबत :—

समितीने, ठाणे जिल्हा परिषद कार्यालयातील शिक्षकांची पदे व बिंदुनामावलीच्या सद्यःस्थितीसंदर्भात विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विदित केले की, पूर्वी ठाणे जिल्ह्यात अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी २२ टक्के आरक्षण होते. आता ते प्रमाण ७ टक्क्यांवर आले आहे. शिक्षक संवर्गामध्ये

अनुसूचित जमाती प्रवर्गाची २९० पदे मंजूर असून सद्यःस्थितीत ३५७ शिक्षक कार्यरत आहेत. अनुशेषाची एकूण पदे २२ आहेत. यामध्ये ४ सरळसेवेची आणि १८ पदे पदोन्नतीची आहेत. प्रशासनाकडून समायोजनाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. जिल्हा परिषदेतील सर्व प्रवर्गाच्या बिंदुनामावल्या तयार आहेत. लघुलेखक (निम्नश्रेणी), कनिष्ठ सहायक (लेखा), आरोग्य सेवक (पु.) आणि विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) अशी सरळ सेवेची ४ पदे रिक्त आहेत. सदरहू पदे भरण्यासाठी राज्य सरकारच्या महापरीक्षा पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन परीक्षा होणार आहे. समितीने, सन २००२ मध्ये वस्तीशाळा शिक्षक म्हणून घेण्यात आलेल्या शिक्षकांपैकी ८५ शिक्षक अतिरिक्त ठरविण्यात आले आहेत. सदर शिक्षकांची नियमित स्वरूपात नियुक्ती करण्यात आली आहे काय अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) यांनी वस्तीशाळेतील शिक्षकांना शासन निर्णयानुसार शून्य बिंदुनामावलीनुसार सामावून घेण्यात आले आहे. एकूण ६०२ वस्तीशाळांवर ६११ शिक्षक नियुक्त होते. त्यापैकी प्रशिक्षित ४८१ आणि अप्रशिक्षित १३० होते. ही अविभाजित ठाणे जिल्ह्यातील वस्तुस्थिती होती. यापैकी ठाणे जिल्ह्यात ५८ प्राथमिक शिक्षक सध्या कार्यरत आहेत. आता जसजशी पदे रिक्त होतील तसतसे त्यांना शून्य बिंदुनामावलीवरून नियमित बिंदुनामावलीवर सामावून घेण्यात येईल. ते रुजू होऊन आता शिक्षक म्हणून काम करीत आहेत. परंतु आता जसजशी त्या त्या प्रवर्गाची पदे रिक्त होतील त्यानुसार त्या ठिकाणी त्यांचे समायोजन करण्याचे बाकी आहे. नवीन भरती करण्यापूर्वी या शिक्षकांना तेथे समावून घ्यावयाचे आहे.

यावर समितीने, राज्य शासनाने आरक्षण व पदोन्तीच्या बाबतीत निर्देश दिलेले आहेत. शासन निर्णयाच्या अधीन राहून अनुसूचित जमाती प्रवर्गाची सर्व पदे विहित मुदतीत भरण्यात यावीत, असे समितीने निदेशित केले.

समितीने, सन १९९५ नंतर सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचा-यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र अद्यापपर्यंत सादर केलेले नाही. याबाबत प्रशासनाने कोणती कारवाई केलेली आहे असा प्रश्न केला असता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी सांगितले की, सन १९९५ नंतरचे ३२८ कर्मचारी आहेत. ३२८ कर्मचा-यांपैकी ३१८ कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. ८ कर्मचा-यांची प्रकरणे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत आणि २ कर्मचा-यांचे जात प्रमाणपत्र दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी अवैध ठरविण्यात आलेले आहे.

समितीने, कर्मचा-यांच्या जात पडताळणी संदर्भात नोटीस देण्यात आली होती, त्यांच्याकडून जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे काय, नसल्यास, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली, तसेच सदर उमेदवारांकडून जात पडताळणी प्रमाणपत्र घेण्यास विलंब करणा-या अधिकारी/ कर्मचा-यांवर कारवाई करावी अशाप्रकारे समितीने दौ-याच्या वेळी सूचित केले होते त्यानुसार किती

अधिकारी/कर्मचा-यांवर कारवाई केली आहे, याबाबत खुलासा करण्यास सांगितले असता जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सांगितले की, ठाणे विभाग अंतर्गत अशी एकूण ३ प्रकरणे होती. ही तिन्ही प्रकरणे सन १९९७ व सन १९९८ मधील होती. या कर्मचा-यांचे सन २००६, २०११ मध्ये जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केले होते. प्रस्ताव सादर करण्यास विलंब केल्यामुळे तत्कालीन आस्थापना शाखेतील कर्मचारी आणि वैद्यकीय अधिकारी यांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत. या प्रकरणी एका कर्मचा-याची वेतनवाढ रोखण्यात आली आहे. तसेच श्रीमती सविता खडसे नावाची कर्मचारी या निर्णया विरोधात माननीय उच्च न्यायालयात गेल्या होत्या. माननीय उच्च न्यायालयाने त्यांच्या प्रकरणात स्थगिती आदेश दिला आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने ९ महिन्यांत अहवाल सादर करून कार्यवाही करावी. सदरहू प्रकरणे अमरावती जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. जातपडताळणीची प्रकरणे निकाली काढण्याबाबत आतापर्यंत सहा वेळा अमरावती जातपडताळणी समितीला स्मरणपत्रे दिलेली आहेत की, आपण त्यांना दिनांक २६ मार्च, २०१४ रोजी अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. त्यांनी सन २०१४ मध्ये अमरावतीला जातपडताळणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी पाठपुरावा केलेला आहे. त्यांनी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर लिहून दिले आहे की, माझे जातप्रमाणपत्र अवैध ठरल्यास मी कारवाईस पात्र राहीन. अमरावती जात पडताळणी समितीचे दिनांक ५ मार्च, २०१८ रोजीचे पत्र आहे की, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, यांचे अधिनियम, २००० अन्वये कामकाज चालते. सदर प्रकरणात अधिनियमातील कलम १२ नुसार चौकशीची कार्यवाही चालू आहे. सौ.विद्या सिताराम मुगूलकर यांचे प्रकरणी अंतिम निर्णय होताच आपणास कळविण्यात येईल, असे जात पडताळणी समितीचे पत्र आलेले आहे. त्यावेळचे जे कागदपत्रे आपल्याकडे आहेत त्यानुसार तिनही कर्मचा-यांनी बॉण्ड पेपरवर लिहून दिलेले आहे. यांची नियुक्ती सन १९९७ ची आहे. तर हा बॉण्ड दिनांक १ ऑक्टोबर २०१५ रोजी त्यांनी घेतलेला आहे.

समितीने, दिनांक १८ मे, २०१३ रोजीचा शासन निर्णयाची आपणांस माहिती असेलच कोणत्याही कायद्याच्या बाहेर जाऊन कृत्य केले याबाबतीत तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी. त्यांच्या अखत्यारित काम करणारे लिपिकांनी हे चुकीचे केले म्हणून त्यांच्यावरही कारवाई करून समितीला अहवाल सादर केला पाहिजे. मुख्य कार्यकारी अधिका-यांनी या बाबींची गंभीर दखल घ्यावी. शासनाच्या कायद्याला पर्यायी मार्ग शोधून शासनाच्या नियमांची पायमल्ली करून चुकीचा मार्ग स्वीकारला म्हणून मुख्य कार्यकारी अधिका-यांनी जिल्हा आरोग्य अधिका-यांविरुद्ध शासन स्तरावर कारवाई प्रस्तावित करावी आणि संबंधित लिपिकाविरूद्ध कारवाई करून मुख्य कार्यकारी अधिका-यांनी पंधरा दिवसात अहवाल सादर करावा.

समितीने, एएनएम तसेच अंगणवाडी कर्मचा-यांच्या पदांबाबत विचारले असता एकूण ५८७ मंजूर पदे होती, त्यातील ५१६ पदे भरलेली आहेत आणि ७४ पदे रिक्त आहेत तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १५ आरोग्य केंद्रा धील गट-अ ची २ पदे आणि गट- ब ची २ पदे अशी एकूण ४ डॉक्टारांची पदे रिक्त असल्याचे आरोग्य अधिका-यांनी सांगितले.

सन २०१६ साली समिती जिल्हापरिषदेत आली होती त्यावेळेस तेथे डॉक्टरांची कमतरता असल्याचे लक्षात आले होते. असे असतांना सुद्धा त्या संख्येनुसार औषधांची खरेदी ही वास्तवापेक्षा जास्त दिसत होती. आदिवासी भागातील लोकांचे आरोग्य व्यवस्थित व्हावे, यासाठी या पैशांचा व्यवस्थितपणे वापर होतो की नाही की फक्त कागदपत्रांचा वापर होतो याबाबत शासनाने त्यांना निर्देश दिले पाहिजेत. डॉक्टरांची कमतरता असून औषधांची खरेदी मात्र जास्त होती, या बाबी समितीला पटलेल्या नाहीत एकीकडे डॉक्टरांची संख्या कमी आहे. रुग्ण कमी आहेत आणि औषधांचे प्रमाण मात्र जास्त वाढत आहे. ही अतिशय गंभीर बाब समोर आली आहे. याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी आणि औषध विकत घेणारी जी संबंधित समिती आहे त्यांची चौकशी करून सुस्पष्ट अहवाल समितीला सादर करावा असे निदेशित केले असता सहसचिवांनी विदित केले की, ही तांत्रिक बाब आहे. सबंधित उप संचालकांना तशा सूचना देऊन त्यांना चौकशी करावयास सांगण्यात येईल.

समितीने, आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र किती आहेत, तसेच त्यांच्या स्वतःच्या इमारती किती आहेत, जीर्ण झालेल्या इमारती असल्यास त्यांच्या बांधकामासंदर्भामध्ये निधीची तरतूद करण्यात आली आहे काय अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी खालील-प्रमाणे माहिती दिली.

आदिवासी भागात १५ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत त्यापैकी १० प्राथमिक केंद्राना इमारती आहेत आणि ५ प्राथमिक केंद्राना इमारती नाहीत. कसारा, किन्हवली आणि वज्रेश्वरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम सुरू आहे. मोरवशीचे आरोग्य केंद्राबाबत निविदा प्रक्रीया आता पूर्ण झालेली आहे. टेंभा येथे जागेची अडचण आहे. कसारा येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम जवळपास पूर्ण झालेले आहे. आदिवासी भागात ९६ उपकेंद्रे असून त्यापैकी ८२ उपकेंद्रांच्या इमारती आहेत तर १४ उप केंद्रांना इमारती नाहीत. उप केंद्र बांधकामासाठी चार कोटी रुपये मिळाले आहेत. या निधीतून दुरुस्तीची कामे व दोन नवीन बांधकामे हाती घेतली आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र बांधायचे असेल तर साधारणतः साडेचार कोटी रुपये खर्च येतो आणि उप केंद्राची इमारत बांधण्यासाठी १ कोटी रुपये खर्च येतो. मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी पुढे नमूद केले की, सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेला निधी लगतच्या म्हणजे सन २०१६-२०१७ पर्यंतच्या आर्थिक वर्षापर्यंत खर्च करू शकतो. जर दोन वर्षांत निधी खर्च झाला नाही तर तो निधी शासन खाती जमा करणे बंधनकारक आहे. सदर निधी ४५, ६० व ९० दिवसांकरिता

बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवण्यात येतो. यावर मिळणा-या व्याजाचे पैसे शासन खाती जमा होत नाहीत. फक्त शासनाकडून मिळालेले पैसे परत करण्यात येतात. ते व्याज जिल्हापरिषदेच्या सेसमध्ये उत्पन्न म्हणून गणले जाते.

समितीने यावर, ३०५४ आणि ५०५४ लेखाशीर्षांतर्गत अनेक वेळा २०-२५ कोटी रुपयांची मागणी करण्यात येते. ब-याचदा असे दिसून आले आहे की, या कामांना उशीर होतो तर काही वेळा जाणूनबुजून कामे रेंगाळली जातात. जिल्हापरिषद हा निधी दोन वर्षांपर्यंत खर्च करू शकते. जिल्हा परिषदेस हा निधी आदिवासी विभागाकडून मिळतो. आदिवासी विभागाकडून मिळालेल्या रकमेवर जे व्याज घेण्यात येते तो निधी आदिवासी विभागाच्या कामांवर खर्च झाला पाहिजे असे समितीचे मत आहे. आदिवासी विभागाने दिलेला निधी खर्च झाला किंवा कसे याबाबत दर तीन महिन्यांनी आढावा घेण्यात यावा. आदिवासी विभागाचा निधी वेगवेगळ्या विभागांना वितरित करण्यात येतो. त्या निधीचा विनियोग योग्य रितीने होतो किंवा कसे याबाबत चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा. जिल्हापरिषदेला दोन वर्ष पैसे खर्च करायची मुभा आहे. जसे राज्य शासनाच्या सर्व विभागांना एक वर्षाच्या आत पैसे खर्च केले नाहीत तर ते पैसे परत राजकोषामध्ये जमा करावे लागतात. त्यांच्याकरिता जे पैसे दिलेले आहेत, ते वेळच्या वेळी खर्च करण्याची अट आहे. ही अट जिल्हा परिषदेस लागू करण्यास हरकत नाही. लाभार्थ्यांची यादी असल्याशिवाय पुढचे पैसे देण्यात येऊ नयेत, लाभार्थ्यांची निवड करण्याचा निकष आहे. मात्र असे निकष पूर्ण न करता सरसकट मागणी केली जाते. निधी मागण्यापूर्वी प्रक्रिया पूर्ण पार पाडणे अभिप्रेत आहे दोन वर्षे जिल्हापरिषदेला पैसे खर्च करण्याची मुभा गरजू लोकांपर्यंत पैसे पोहोचण्याकरिता दिली जाते असे निदर्शनास आणून दिले.

जिल्हा परिषदेत पेसा क्षेत्रातंर्गत भरावयाची शिक्षकांची पदे व जात वैधता प्रमाणपत्राबाबत :—

समितीने, ठाणे जिल्ह्यातील पेसा क्षेत्रात शिक्षकांची एकूण किती पदे रिक्त आहेत पेसा क्षेत्रातील रिक्त पदांची भरती पेसा कायद्यानुसार करण्यात येत आहे काय, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विदित केले की, ठाणे जिल्ह्यात पेसा क्षेत्रात शिक्षकांची एकूण २३४ पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषद हि रिक्त पेसा कायद्यानुसार स्थानिक उमेदवारांमधून भरती करील. मागासवर्ग कक्षाने तपासून दिलेल्या बिंदूनामावली नुसार रिक्त असलेली पदे भरती मोहीम हाती घेऊन भरती करण्यात येणार आहे. आढावा पूर्ण झाल्यानंतर जाहिरात देऊन भरती प्रक्रिया सुरू होईल. बिंदूनामावली नुसार जी पदे राज्यपाल महोदयांनी सन २०१५ मध्ये अधिसूचना निर्गमित करून स्थानिक आदिवासी उमेदवारांमधून ठराविक पदे भरण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. सामान्य प्रशासन विभागाने मार्च २०१५ मध्ये या संदर्भातील कार्यपद्धती कशी अंमलात आणावयाची याबाबत शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. पेसा क्षेत्रात ६ संवर्ग आहेत आणि ती केवळ अनुसूचित जमाती प्रवर्गातील स्थानिक उमेदवारांकरिता आहेत. वित्त विभागाने आपल्याला २३ संवर्गाची पदे भरण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्यानुसार भरती प्रक्रिया सुरू केलेली आहे.

समितीने, सन १९९६ ते २०१५ या कालावधीतील २४ कर्मचा-यांची जात प्रमाणपत्र पडताळणीची प्रकरणे विविध जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे प्रलंबित आहेत. या संदर्भात जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे काय तसेच, अद्याप जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे संबंधित कर्मचा-यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिका-यांनी सांगितले की, समितीने नोव्हेंबर, २०१६ मध्ये ठाणे जिल्हा परिषदेस भेट दिली होती. त्यावेळी एकूण २४ प्रकरणे होती. एप्रिल २०१८ मध्ये समायोजनाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यानुसार ठाणे जिल्हापरिषदेत अनुसूचित जमाती प्रवर्गाचे एकूण ५३९ कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी ५२४ कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले असून १२ कर्मचा-यांची प्रकरणे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. त्यापैकी नंदूरबार समितीकडे ४, ठाणे समितीकडे २, नाशिक समितीकडे १, अमरावती समितीकडे ३ व नागपूर समितीकडे २ प्रकरणे प्रलंबित आहेत. १२ कर्मचा-यांपैकी ४ कर्मचारी सन १९९५ पूर्वी आणि ८ कर्मचारी सन १९९५ नंतर सेवेत रुजू झालेले आहेत.

यावर समितीने, संबंधित कर्मचा-याने नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु, संबंधित कर्मचा-यांनी एवढी वर्षे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. त्यांच्यावर कारवाई करणे अपेक्षित आहे. सन २०१४ नंतर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कामकाज ऑन लाईन करण्यात आले आहे. नवीन प्रकरणे निकाली काढण्यासाठी ६ महिने किंवा १ वर्षाची कालमर्यादा निश्चित करून देण्यात आलेली आहे. जुन्या प्रकरणांमध्ये पुरावे शोधावे लागतात. तसेच, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या माध्यमातून दक्षता समिती नियुक्त केली जाते. त्या समितीकडे मनुष्यबळ कमी असल्यामुळे अडचणी येतात. त्यामुळे देखील विलंब होतो. या कारणामुळे त्यांना आदेश देता येत नाहीत.

महिला व बाल विकास विभाग :–

समितीने, सन २०१७-१८ मध्ये महिला व बाल विकासाकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली होती, त्यापैकी किती निधी खर्च झाला व किती निधी अखर्चित राहिला याबाबत विचारणा केली असता महिला व बालविकास अधिका-यांनी विदित केले की, सन २०१७-१८ मध्ये उपयोजना बाह्यक्षेत्रात महिला व बाल समितीकरिता २० लाख ६७ हजार रुपयांची तरतूद होती. उपयोजना क्षेत्रात ३४ लाख ७८ हजार रुपये होते. हा निधी अंगणवाड्यांच्या प्रशिक्षणाचे नियोजन करण्यासाठी दिलेला आहे अंगणवाडी बांधकामाकरिता ३३ लाख रुपये मंजूर होते. ५ अंगणवाड्यांना प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी दिलेली आहे. यामध्ये काही कामे नव्याने समाविष्ट केली जात आहेत. सन २०१७-१८ च्या निधीला मार्च २०१९ पर्यंत खर्च करण्याची मुदत आहे.

सन २०१६-१७ मधील ७ कामे होती व ती पूर्ण झाली आहेत. ही कामे १०० टक्के पूर्ण झाली आहेत. सन २०१६-१७ च्या अंगणवाडी बांधकामाचा काही निधी समर्पित करण्यात आलेला आहे. तसेच काही निधी शिल्लक आहे. सन २०१७-१८ मधील कामे पूर्ण झाली नसल्याने निधी अखर्चित आहे.

समितीने, जिल्हानिहाय सॅम व मॅम बालकांसाठी काय उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत व त्यासाठी किती निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे असा प्रश्न केला असता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी नमूद केले की, चालू वर्षाच्या माहे जून, २०१८ पासून व्ही.सी.डी.सी. सुरू करण्यात आलेली आहे. तेव्हापासून आतापर्यंत २१४ मुले होती. त्यापैकी ११३ मुलांचे श्रेणीवर्धन झालेले आहे. सद्यःस्थितीत १०१ मुले आहेत. तसेच अमृत आहार योजनेद्वारे केळी, अंडी, दूध याशिवाय जिल्हा परिषदेच्या निधीमधून अतिरिक्त आहार म्हणून मुलांसाठी अंडी आणि केळी दिली जात आहेत. अशा प्रकारे कुपोषणाचे प्रमाण कमी ठेवण्यासाठी जिल्हा परिषद यशस्वी झाली आहे.

जिल्हा परिषदेमार्फत राबवावयाच्या पाणीपुरवठा योजनाबाबत :—

समितीने, राष्ट्रीय पेयजल योजनेमधून मागील दोन वर्षांत किती कामे हाती घेतली आहेत व किती कामे पूर्ण करण्यात आली आहेत याची माहिती देण्यास सांगितली असता कार्यकारी अभियंत्यांनी विदित केले की, या योजनेतून एकूण ४८ कामे हाती घेतली आहेत. आर्थिक आणि भौतिकदृष्ट्या १८ कामे पूर्ण झालेली आहेत. १९ कामांची सर्व उपांगे पूर्ण झालेली आहेत. सदरहू कामे सन २०१४-१५ ते सन २०१७-१८ या वर्षातील आहेत. यापैकी काही योजना ह्या सन २०१४-१५ पासून प्रलंबित असलेल्या योजना आहेत. ठाणे जिल्ह्यामध्ये आणि विशेषतः भिवंडी आणि शहापूर तालुक्यांमध्ये जवळपास ६०० रखडलेल्या योजना होत्या. मागील दोन वर्षांमध्ये आमच्या विभागाने विशेष मोहिम राबवून प्रलंबित योजनांचे प्रमाण २०० पेक्षा कमी केलेले आहे. काही ठिकाणी समितीने अपहार केला तर काही ठिकाणी काम पूर्ण झाले परंतु त्याचे लेखापरिक्षण करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे ठाणे जिल्हा परिषदेने विशेष मोहिम राबवून जवळपास ४०० कामे पूर्ण केलेली आहेत. पाणीपुरवठा सुरू नसलेल्या ३९ योजना आहेत. सध्या या योजनांचे आहे त्या स्थितीमध्ये हस्तांतरण करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यानंतर उर्वरित कामांसाठी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येणार आहे. याबाबत संबंधित यंत्रणेला योग्य त्या सूचना करण्यात आलेल्या आहेत.

यावर राष्ट्रीय पेयजल योजनेवर सुरूवातीला जिल्हा परिषदेचे नियंत्रण नव्हते. त्यामुळे मागणी प्रमाणे निधी वर्ग करण्यात येत असे. या अनुषंगाने काही ठिकाणी एम.बी. रेकॉर्ड पूर्ण आहे. परंतु त्यानुसार प्रत्यक्षात काम दिसून येत नाही. सन २०१४ पासून काही गावे पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. त्यामुळे त्या गावांना तातडीने नवीन योजना घेऊन पिण्याचे पाणी उपलब्ध करून देता येईल काय, याबाबत कार्यवाही लवकरात लवकर करून घेण्यात यावी. कारण अनेक वर्षापासून गावे पाण्यापासून वंचित राहणे योग्य नाही असे समितीने निदर्शनास आणून दिले असता कार्यकारी अभियंत्यांनी ज्या गावांमध्ये

३२ ठिकाणी फौजदारी गुन्हे दाखल झालेले आहेत. त्या गावांमध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत काही योजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. परंतु त्याच योजनेला नवीन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे असे समितीस अवगत केले.

समितीने, शहापूर तालुक्यात दुष्काळ असल्याने तेथे पाणी पुरविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत याची माहिती देण्यास सांगितले असता कार्यकारी अभियंत्यांनी माहिती दिली की, शहापूर तालुका सद्यःस्थितीत दुष्काळी तालुका घोषित करण्यात आलेला नाही. तालुक्यातील ९७ गावे आणि २६० पाड्यांमध्ये दुष्काळाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यासाठी बाहुली धरणामधून गुरुत्वाकर्षण पद्धतीने पाणी खेचून आणण्याची एक योजना प्रस्तावित करण्यात आलेली होती. त्यावेळी राष्ट्रीय पेयजल योजनेमधून कोणत्याही योजना मंजूर होत नव्हत्या. त्यामुळे जिल्हा परिषदेने आणि स्टेम कंपनीने या योजना कार्यान्वीत करणेबाबत निर्णय घेतला. सदर निर्णयानंतर जिल्हा परिषदेने पाणी आरक्षणासाठी पाठपुरावा करून ४.६३ एम.एल.डी. पाणी आरक्षण मिळविले. परंतु सदरहू आरक्षण कमी असल्यामुळे शासनाकडे बैठका घेऊन तसेच कॅबिनेट कमिटीच्या उप समितीसोबतही बैठक घेऊन त्यानंतर वाढीव पाणी आरक्षण मिळाले.

समितीने, पेसा समित्यांच्या खर्चाचे अधिकार ग्रामपंचायत पातळीवर आहेत. परंतु त्यासाठी जनजागरण मोहीम राबविण्याची आवश्यकता आहे. विशेष म्हणजे त्यासाठी लेखापरिक्षण होणे आवश्यक आहे. पेसा समित्यांना पैसे खर्च करण्याचे अधिकार आहेत व त्यावर देखरेख ठेवण्याचे अधिकार उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. याबाबत किमान तालुका स्तरावर बैठका व्हाव्यात. पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायत सदस्य, पेसा समित्यांचे अध्यक्ष यांना त्याची आवश्यकता आहे. निवड केलेली कामे प्राधान्यक्रमानुसार आहेत की नाही हे पाहिले पाहिजे. यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, समिती सदस्य यांच्यासोबत प्रत्येक तालुकास्तरावर वर्षातून किमान दोन बैठका घ्याव्यात असे अभिप्राय व्यक्त केले.

अभिप्राय व शिफारशी :—

ठाणे जिल्हा परिषदेतील कृषी विभाग, लघुपाटबंधारे विभाग व ग्रामीण पाणीपुरवठा विभागातर्फे आदिवासीसाठी अनेक योजना राबविण्यात येतात. यामध्ये सार्वजनिक योजनांबरोबरच वैयक्तिक लाभाच्या योजनांचा समावेश असतो. त्यासाठी आदिवासी विकास विभागातर्फे दरवर्षी निधीची तरतूद करण्यात येते. तथापि, हा निधी जिल्हा परिषदेच्या संबंधीत यंत्रणाकडून वेळेवर खर्च करण्यात येत नाही. तसेच जो निधी खर्च करण्यात येतो तो ही अपूर्ण असतो म्हणजेच योजनांवर कमी खर्च करण्यात येतो. अनेक वर्ष होऊनही जिल्हा परिषदेकडून वेळेवर कामे पूर्ण केली जात नसल्याने योजनेचा पैसा जिल्हा परिषदेकडे खर्च न होता तसाच पडून राहतो. जिल्हा परिषदेच्या म्हणण्यानुसार जिल्हा परिषदेला दोन वर्ष पैसे खर्च करण्याची मुभा असली तरी जिल्हापरिषदेकडून करावयाची कामे विहित कालावधीत पूर्ण करून अदिवासी

विकास विभागातर्फे पुरविलेला निधी वेळच्या वेळी खर्च होणे अत्यंत निकडीचे आहे. पैसे खर्च करण्याबाबत, राज्याच्या इतर विभागांना जशी एक वर्षाच्या आत खर्च करण्याची अट आहे तशीच अट जिल्हा परिषदेला सुद्धा घालून द्यावी असे अभिप्राय समितीने व्यक्त केले.

(१) दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी ठाणे जिल्हा परिषदे संदर्भात झालेल्या साक्षीच्यावेळी जिल्हा परिषदेतील सन १९९५ पूर्वीची ४ प्रकरणे व सन १९९५ नंतरची ८ अशी अनुसूचित जमातीच्या एकूण १२ कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्याचे समितीस अवगत करण्यात आले होते. **जिल्हा परिषद कार्यालयातील उक्त प्रकरणे जवळ-जवळ २५ वर्षांपासून प्रलंबित आहेत. एवढ्या प्रदीर्घ कालावधी पासून जातपडताळणीची प्रकरणे प्रलंबित ठेवून अनुसूचित जमातीच्या जागेचा लाभ घेणे ही गंभीर बाब आहे. सदर आठ कर्मचा-यांकडून तात्काळ वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावीत व वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांना सेवेतून कमी करण्यात यावे तसेच सन १९९५ पूर्वीच्या ४ कर्मचा-यांना संरक्षण असले तरी त्यांना त्याच्या प्रवर्गाचे वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे आदेश देऊन बिंदू रिक्त करावेत. या रिक्त करावयाच्या ४ बिंदूवर अनुसूचित जमातीच्या जागा भराव्यात व त्याबाबत केलेल्या कार्यवाही माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

(२) ठाणे जिल्हा परिषदेमार्फत राष्ट्रीय पेयजल योजनेमधुन राबवावयाच्या जवळपास ६०० पाणीपुरवठा योजना सन २०१४-२०१५ पासून प्रलंबित होत्या. त्यापैकी जिल्हा परिषदेने विशेष मोहिम राबवून ४०० पाणीपुरवठा योजनाची कामे पूर्ण केली असून २०० पाणीपुरवठा योजनांची कामे प्रलंबित आहेत. यापैकी ३९ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित नसल्याचे समितीस निदर्शनास आले आहे. **याबाबत समितीची शासनास अशी शिफारस आहे की, ठाणे जिल्ह्यातील अपूर्ण असलेल्या सुमारे २०० पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करावीत तसेच कार्यान्वित नसलेल्या एकूण ३९ पाणीपुरवठा योजना लवकरात-लवकर सुरू करण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात व केलेल्या उपाययोजनाची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी.**

(३) ठाणे जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ग्रामपंचायतीमध्ये ज्या इमारती येतात, त्या इमारती जन सुविधा योजनेमार्फत पूर्ण करण्यात येतात. ठाणे जिल्ह्यातील अशा एकूण ६६० गावांपैकी ६३३ गावांना पेसा क्षेत्रात घोषित केले आहे. या सर्व ग्रामपंचायतीच्या इमारती जन सुविधा योजनेद्वारे पूर्ण झालेल्या आहेत. जन सुविधा योजनेत ग्रामपंचायतीचे विस्तारीकरणही मंजूर करता येते. त्याचप्रमाणे जन सुविधेच्या धर्तीवर ठक्कर बापा योजनेत काम घेता यावे, असा प्रस्ताव शासनाकडे पाठविला असल्याचे समितीच्या निदर्शनास आणून दिले. **यावर जिल्हा परिषदेमार्फत जन सुविधा योजनेच्या धर्त्तीवर ठक्कर बाप्पा योजनेची कामे राबविण्यासाठी शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव योग्य व नाविण्यपूर्ण असून शासनाकडे पाठविलेल्या या प्रस्तावाचा तातडीने पाठपुरावा करून प्रस्ताव मंजूर करून घेण्यात यावा व याबाबत केलेली कार्यवाही समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

(४) दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजी समितीने ठाणे जिल्हा परिषदेसंदर्भात घेतलेल्या साक्षीच्यावेळी ठाणे जिल्ह्यातील कु. हनी बरफ या आदिवासी मुलीने सन २०१४ मध्ये तिच्या बहिणीला वाघाच्या तावडीतून सोडविल्याने तत्कालीन पंतप्रधानाच्या हस्ते राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. त्यानंतरही सन २०१४ ते २०१७-२०१८ पर्यंत तिला घरकुल योजनेचा वा अन्य उपजिविकेचा लाभ देण्यात आला नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. एका आदिवासी राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार प्राप्त मुलीला अशा लाभापासून वंचित ठेवणे नैतिकतेला धरुन नाही. **सबब, राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार प्राप्त कु. हनी बरफ यांना विशेष बाब म्हणून घरकुल मंजूर करून कार्योत्तर मान्यतेसाठी शासनाकडे पाठवून कु. हनी बरफ हिला लवकरात-लवकर न्याय मिळवून द्यावा व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

(५) दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजी जिल्हा परिषदेतील जात वैधता पडताळणी समितीकडे एकूण १३ कर्मचा-यांची प्रकरणे प्रलंबित होती. यामधील ३ प्रकरणे सन १९९७ व १९९८ मधील होती या कर्मचा-यांचे सन २०११, २०१३ व २०१४ मध्ये जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केले होते. जात पडताळणीसाठी विलंबाने प्रस्ताव सादर केल्याने तसेच १०० रुपयांचे बॉन्ड लिहून घेतल्याने आस्थापना शाखेतील तत्कालीन कर्मचारी व वैद्यकिय अधिकारी यांना नोटीस देण्यात आली होती या तीन कर्मचा-यांमध्ये श्रीमती एस. पी. खडसे, श्रीमती व्ही. पी. शिंदे दोन्ही आरोग्य सेविका व श्रीमती अनिता राईकरवार, कनिष्ठ लेखा अधिकारी यांचा समावेश असून या तिन्ही कर्मचा-यांनी जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास कारवाईस पात्र राहू असे १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर लिहून दिल्याची धक्कादायक व गंभीर बाब समितीच्या निदर्शनास आली आहे. **जात प्रमाणपत्राबाबत कुठल्याही कर्मचा-यांकडून असा बॉन्ड पेपर लिहून घेणे किवा संबंधित कर्मचा-यांनी लिहून देणे हे कायद्याला धरुन नाही. हे कृत्य बेकायदेशीर असून कायद्याच्या बाहेर जाऊन ज्या तत्कालीन वैद्यकिय अधिका-यांनी हा बॉन्ड पेपर लिहून घेतला आहे त्यांच्यावर व ज्या कर्मचा-यांनी असे बॉन्ड पेपर लिहून दिले आहेत त्या कर्मचा-यांवरदेखील कठोर कारवाई करून केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यांत द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(६) समितीने, ठाणे जिल्हा परिषदेसंदर्भात दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजी घेतलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी ठाणे जिल्ह्यात सॅम व मॅम बालकांची संख्या २१४ असल्याचे निदर्शनास आले होते त्यापैकी ११३ मुलांचे श्रेणी वर्धन झाले असून सद्यस्थितीत १०१ मुले सॅम व मॅम मध्ये असल्याचे समितीस अवगत करण्यात आले. समितीने सन २०१६-मध्ये दिलेल्या भेटीच्यावेळी जिल्ह्यात सॅम व मॅमच्या बालकांची संख्या मोठया प्रमाणात होती. पण त्यानंतर या बालकांना वेळीच रुग्णालयात दाखल करून त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न जिल्हा परिषदेने केल्याचे दिसून येते. तसेच डॉ. ऐ.पी.जे. अब्दुल कलाम योजनेद्वारेही स्तनदा माताना पुरविण्यात येणा-या आहारासाठी २५ रुपये दिले

जातात. यामध्ये लाडू, अंडी व केळी यासह चौरस आहार देणे आवश्यक आहे. परंतू खर्चाचे प्रमाण वाढले असून त्यासाठी अनुदान वाढवून देण्याची गरज असल्याचे जिल्हा परिषदेकडून समितीच्या निदर्शनास आणून दिले. **याबाबत शासनास समितीची अशी शिफारस आहे की, जिल्हा परिषदेतर्फे पुरविण्यात येणारा अतिरिक्त आहार तसेच डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम योजनेद्वारे पुरविण्यात येणारी केळी, अंडी, दूध व इतर आहारासाठी लागणा-या अनुदानात वाढ करण्यात यावी. तसेच बालकांसाठी लागणा-या आहाराचा मुबलक प्रमाणात पुरवठा करून उक्त १०१ बालकांच्या श्रेणी वर्धनाबाबत उपाययोजना करून केलेल्या उपाययोजनांची माहिती समितीस तीन महिन्यांत कळविण्यात यावी.**

(७) जिल्हा परिषद कार्यालयातील शिक्षकांच्या पदांची सद्य:स्थितीसंदर्भात माहिती घेताना समितीच्या असे निदर्शनास आले की, अनुसूचित जमाती प्रवर्गातील सरळसेवेची ४ पदे तसेच पदोन्नतीची १८ पदे अशा २२ पदांचा अनुशेष असल्याचे निदर्शनास आले होते. **शिक्षक संवर्गातील सरळसेवा व पदोन्नतीच्या २२ पदांचा अनुशेष लवकरात लवकर पूर्ण करून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समिती तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(८) ठाणे जिल्हा परिषदेतील एकूण ६०२ वस्तीशाळांवर ६११ शिक्षक नियुक्त होते. त्यापैकी प्रशिक्षित ४८१ आणि अप्रशिक्षित १३० शिक्षक होते. यापैकी ठाणे जिल्ह्यात ५८ प्राथमिक शिक्षक सध्या कार्यरत असून जसजशी पदे रिक्त होतील तसतसे त्यांना शून्य बिंदुनामावलीवरून नियमित बिंदुनामावलीवर सामावून घेण्यात येईल असे समितीच्या निदर्शनास आले. **याबाबत समितीची अशी शिफारस आहे की, ठाणे जिल्ह्यात वस्ती शाळांमध्ये कार्यरत असलेल्या ५८ वस्ती शाळा शिक्षकांचे शुन्य बिंदूनामावलीवरून नियमित बिंदूनामावलीवर लवकरात लवकर समायोजन करून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी.**

दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., ठाणे

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १७ नोव्हेंबर २०१६ रोजी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस भेट देऊन खालील प्रमाणे माहिती घेतली :—

समितीने, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत मंजूर पदे किती आहेत व रिक्त पदे किती आहेत असा प्रश्न केला असता कार्यकारी अधिका-यांनी विदित केले की, अनुसूचित जमातीची एकूण ३० पदे सन २०१२ पासून रिक्त आहेत, ही पदे सेवानिवृत्तीमुळे, कर्मचा-यांची बडतर्फी व स्वेच्छानिवृत्ती घेतल्यामुळे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याबाबत सन २०११ मध्ये बँकेला परवानगी मिळाली होती. यात शासनाकडे पाठपुरावा करून १३५० पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्यावेळी परिक्षा व भरती प्रक्रिया एमकेसीएल व आयबीपीएस यांच्याकडून होत होती. त्यांच्याकडे पद भरतीसाठी पाठपुरावा करण्यात आला असून त्यांनी भरती प्रक्रियेबाबत असमर्थता दर्शविलेली असल्याने भरती प्रक्रिया थांबविली आहे

सह आयुक्त, जात प्रमाणपत्र तपासणी यांनी नमूद केले की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ठाणे या बँकेची ठाणे जात पडताळणी समितीकडे १६१ प्रकरणे होती त्यापैकी १५८ प्रकरणे वैध ठरली असून तीन प्रकरणे अवैध ठरली आहेत. यामध्ये श्री. किशोर वसंत भोईर यांचे प्रकरण सन २००९ मध्ये अवैध ठरले आहे. त्याचप्रमाणे श्री. रक्षित मोकाशी यांचे प्रकरण दिनांक ३० एप्रिल २००४ मध्ये अवैध ठरले आहे.

समितीने, जिल्हा मध्यवर्ती बँकेत कार्यरत असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील एकूण १२६ कर्मचा-यांकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आली आहेत काय, विचारणा केली असता बँकेच्या १२६ कर्मचा-यांपैकी १२३ कर्मचा-यांकडून जात वैधता प्रमाणपत्रे घेण्यात आली आहेत. तीन प्रकरणे प्रलंबित आहेत. श्री. आर.पी.गायकवाड यांनी कागदपत्रे सादर केली नाहीत. त्याबाबत त्यांना लेखी व तोंडी सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे श्री. प्रसाद मदन गोवारी व श्री. चंद्रकांत लखमा इंधन या दोन कर्मचा-यांची नियुक्ती दिनांक १६ जुलै २०१६ रोजी झाली असून श्री. प्रसाद मदन गोवारी यांचा प्रस्ताव दिनांक १६ जुलै २०१६ रोजी अनु.जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती ठाणेकडे सादर केला आहे. श्री. चंद्रकांत लखमा इंधन यांचा प्रस्ताव दिनांक २५ जुलै २०१६ रोजी अनु. जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती ठाणेकडे सादर करण्यात आला आहे. श्री. आर.पी. गायकवाड हे अपंग आहेत ते अनुसूचित जमातीचे नसल्याने त्यांना अपंग संवर्गात दर्शवून अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करण्यात येईल. रिक्त पदे भरण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. एसएलटीएफ यांच्याकडून बँकेला २२४ पदे भरण्यास दिनांक २८ ऑक्टोबर २०१६ रोजी परवानगी देण्यात आली आहे. बिंदूनामावलीची तपासणी करून भरतीची कार्यवाही करण्यात येईल असे समितीस विदित करण्यात आले.

सहायक आयुक्त (मावक) यांनी पुढे नमूद केले की, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील सन २०१५ मध्ये सरळसेवेच्या पदांची बिंदूनामावली तपासणी करण्यात आलेली आहे. पूर्वी अनुसूचित जमातीसाठी २२ टक्के पदे होती. आता दिनांक ९ जानेवारी २०१६ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीप्रवर्गासाठी ७ टक्के जागा आरक्षित आहेत, त्यानुसार तपासणी करण्यात आलेली नाही. आकृतीबंध बदलल्यामुळे बिंदूनामावली तपासणी आवश्यक आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी २२ टक्के आरक्षण पालघर जिल्ह्यासाठी ठेवण्यात आले आहे. यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडून मार्गदर्शन मागवून त्यानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येईल.

यावर समितीने, ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाले असले तरी बँकेचे विभाजन झालेले नाही त्यामुळे या ठिकाणी आरक्षण सात टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. त्यामुळे अनुसूचित जमातीसाठी २२ टक्के आरक्षण ठेवावे व या बँकेच्या नावात बदल करून ठाणे-पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असा नामकरणाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा असे निदेशित केले.

विभागीय सचिवांची साक्ष :—

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १७ नोव्हेंबर २०१६ रोजी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेस दिलेल्या भेटी संदर्भात दिनांक १ नोव्हेंबर २०१८ रोजी संबंधीत विभागीय सचिवांची साक्ष घेतली. यावेळेस समितीने, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत मंजूर पदांची संख्या त्यामध्ये अनुसूचित जमातीसाठी वर्ग १ ते ४ मध्ये किती राखीव पदे आहेत, रिक्त असलेल्या २४७ पदांपैकी अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी किती पदे राखीव होती, त्यापैकी अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांची पद भरती करण्यात आली आहे काय अशी विचारणा केली असता सहकार विभागाच्या प्रधान सचिवांनी विदित केले की, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये एकूण १३४४ पदे मंजूर असून त्यापैकी १०७८ कायम पदे व परिविक्षाधीन २४७ पदे अशी एकूण १३२५ पदे भरण्यात आली व १९ पदे रिक्त आहेत.

उक्त मुद्याबाबत सहकार आयुक्तांनी नमूद केले की, बँकेची २४७ पदांची नोकर भरती प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. परंतु उक्त प्रकरणी माननीय उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन दाखल करण्यात आले असून सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. बँकेमध्ये काही पदावरील उमेदवारांना पदोन्नती मिळाल्याने त्यांची रिक्त झालेली पदे भरण्यासंदर्भात सहकार आयुक्त कार्यालयास तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यासंदर्भात डीडीआर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली असून उक्त समितीचा उक्त अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य तो निर्णय घेण्यात येईल. तो घेताना उच्च न्यायालय प्रकरणी बाधा होऊ नये याची काळजी घ्यावी लागणार आहे.

समितीने, यावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ग्रामीण भागातील लोकांसाठी काम करीत असून ग्रामीण भागात बँकेच्या शाखा कार्यरत आहेत. परंतु तेथे कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने ग्रामीण भागातील लोकांची गैरसोय होत आहे. उक्त प्रकरणी न्यायालयाचा निर्णय येण्यास काही कालावधी लागणार आहे. काही उमेदवार प्रतिक्षा यादीमध्ये आहेत. या प्रतिक्षा यादीत आदिवासी उमेदवार सुद्धा असून ते ग्रामीण भागातील आहेत. एमकेसीएलच्या माध्यमातून भरती केल्यानंतर उमेदवार त्यासंदर्भात न्यायालयामध्ये गेले असतील. न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून नियुक्तीचे पत्र देण्यात यावे, असे सूचित केले असता आयुक्तांनी विदित केले की, उक्त प्रकरणी तक्रारींच्या संदर्भात एक समिती नेमली आहे, उक्त समितीने चौकशी अहवाल सादर केल्यानंतर सदरहू पदे भरण्यासाठी परवानगी द्यावी किंवा नाही, याबाबत निर्णय घेण्यात येईल तसेच विधी व न्याय विभागाचा सल्लाही घेण्यात येईल. न्यायालयामध्ये दाखल केलेल्या प्रकरणी स्थगिती देण्यात आलेली नाही. बँकेने ५२ कर्मचा-यांना पदोन्नती दिली असून त्यांची पदे रिक्त झाली आहेत ती भरण्यासाठी सहकार आयुक्त यांचेकडे परवानगी मागितलेली आहे. चौकशी अहवालाच्या अनुषंगाने त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर कायदेशीर बाबी तपासून पुढील निर्णय घेण्यासाठी तीन आठवड्यांची मुदत देण्यात यावी. आवश्यकता भासली तर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने सरकारी वकिलांचे अभिप्राय घ्यावे लागणार आहेत.

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमधील तीन उमेदवारांची जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले होते. तीन उमेदवारांची अनुसूचित जमाती प्रवर्गातून निवड केली होती. त्यानंतर त्यांना मूळ प्रवर्गात सामावून घेण्यात आले होते. त्यांना बँकेतून कमी का करण्यात आले नाही याची कारणे समितीने विचारली असता जिल्हा उपनिबंधकांनी विदित केले की, श्री. गायकवाड यांच्याकडे आवश्यक ती कागदपत्रे नसल्यामुळे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. श्री. प्रसाद गोवारी यांच्याकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. श्री. चंद्रकांत इंधन यांच्याकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. बँकेकडून ६ उमेदवारांबाबत माहिती प्राप्त झालेली आहे. श्री. रक्षित मोकाशी यांची नियुक्ती दिनांक १९ डिसेंबर २०१२ आणि श्री. गायकवाड यांची नियुक्ती दिनांक १ जून २००१ रोजी झालेली आहे.

समितीने, ठाणे जिल्ह्यातील काही संस्था या शेतीशी निगडित आहेत. बँकेकडे कर्जाची प्रकरणे सोसायट्यांच्या माध्यमातून येत असतात. आदिवासी विभागात अनेक सोसायट्या आहेत. किती आदिवासी बांधवांचा कर्जमाफीमध्ये समावेश झालेला आहे, याबाबतची नोंद आपल्याकडे आहे काय अशी विचारणा केली असता ठाणे जिल्ह्यात ६४ कोटी रुपयांची कर्जमाफी मिळालेली आहे. शासनाने आदिवासी विभागासाठी १ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिलेली आहे. ठाणे जिल्ह्यात ३५ आदिवासी विकास संस्था आहेत. त्यांना १०० टक्के कर्जमाफीचा लाभ मिळालेला आहे असे उपनिबंधकांनी अवगत केले.

समितीने, यावर आदिवासी भागात अनेक बांधव कर्जमाफीच्या निकषात बसले आहेत. याबाबतची आकडेवारी गोळा करण्यात यावी. किती आदिवासी बांधवांची कर्जमाफी निकषात बसलेली आहे आणि किती रक्कमेची आहे याबाबतची माहिती १ महिन्याच्या आत देण्यास सांगितली असता प्रधान सचिवांनी आश्वासित केले की, अनुसूचित जमाती मधील कर्जमाफी दिलेल्या लोकांची माहिती १५ दिवसांच्या आत समितीला दिली जाईल.

यानंतर समितीने, सन १९९५ पूर्वीची नियुक्ती असेल तर त्यांना संरक्षण आहे. अशा उमेदवारांचा त्यांच्या त्यांच्या मूळ प्रवर्गात समावेश होतो. परंतु, सन १९९५ नंतर नियुक्ती झालेली असेल तर त्यांना संरक्षण नाही आहे. श्री. मोकाशी आणि श्री. गायकवाड यांच्या विरोधात दिनांक १८ मे २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करून त्यासंदर्भातील अहवाल समितीला १० दिवसाच्या आत जिल्हा उपनिबंधकांनी सादर करावा, असे निदेशित केले.

अभिप्राय व शिफारशी :

अनुसूचित जमाती संवर्गातील अनुशेष :

(१) समितीने, दिनांक १७ नोव्हेंबर २०१६ रोजी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस भेट दिली होती. सदर भेटीच्या वेळी अनुसूचित जमातीची एकूण ३० पदे सन २०१२ पासून रिक्त आहेत. ही पदे सेवानिवृत्तीमुळे, कर्मचा-यांची बडतर्फी व स्वेच्छानिवृत्ती घेतल्यामुळे रिक्त झालेली असल्याचे सदर रिक्त

पदे भरण्याबाबत सन २०११ मध्ये बँकेला परवानगी मिळाली होती. त्या वेळी परिक्षा व भरती प्रक्रिया एमकेसीएल व आयबीपीएस यांच्याकडून होत होती. तसेच समितीने दिनांक १ नोव्हेंबर २०१८ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये एकूण १३४४ पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी १०७८ कायम पदे व परिविक्षाधीन २४७ पदे अशी एकूण १३२५ पदे भरण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ग्रामीण भागातील लोकांसाठी काम करीत असून ग्रामीण भागात बँकेच्या शाखा कार्यरत आहेत. परंतु तेथे कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने ग्रामीण भागातील लोकांची गैरसोय होत आहे. सदर प्रकरणी न्यायालयाचा निर्णय येण्यास काही कालावधी लागणार आहे. काही उमेदवार प्रतिक्षा यादीमध्ये आहेत. या प्रतिक्षा यादीत आदिवासी उमेदवारसुद्धा असून ते ग्रामीण भागातील आहेत. सन २०१२ पासून अनुसूचित जमातीची ३० पदे रिक्त आहेत ही पदे भरण्यासाठी जिल्हा उपनिबंधक यांच्या अध्यक्षतेखालील समितीने लवकरात लवकर शासनास अहवाल सादर करावा तसेच सदर अहवालाच्या अनुषंगाने कायदेशीर सल्ला घेऊन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

बिंदूनामावली :

(२) समितीच्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या भेटीच्या वेळी सहायक आयुक्त (मावक) यांनी नमूद केले की, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील सन २०१५ मध्ये सरळसेवेच्या पदांची बिंदूनामावली तपासणी करण्यात आलेली आहे. पूर्वी अनुसूचित जमातीसाठी २२ टक्के पदे होती. आता दिनांक ९ जानेवारी २०१६ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ७ टक्के जागा आरक्षित आहेत. त्यानुसार तपासणी करण्यात आलेली नाही. आकृतीबंध बदलल्यामुळे बिंदूनामावली तपासणी आवश्यक आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी २२ टक्के आरक्षण पालघर जिल्ह्यासाठी ठेवण्यात आले आहे. या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडून मार्गदर्शन मागवून घेण्यात येणार आहे व त्यानुसार सर्व संबंधिताना कळविण्यात येणार आहे.

ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाले असले तरी बँकेचे विभाजन झालेले नाही. त्यामुळे या ठिकाणी आरक्षण ७ टक्क्यापर्यंत खाली आणण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे बँकेचे विभाजन होईपर्यंत पुर्वीप्रमाणेच २२ टक्के आरक्षण ठेवण्यात यावे व या बँकेच्या नावात बदल करून " ठाणे-पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक " असा नामकरणाचा प्रस्ताव शासनाकडे लवकरात लवकर सादर करून याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

जातपडताळणी :–

३) समितीने दिनांक १७ नोव्हेंबर २०१६ रोजी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला भेट दिली होती त्यावेळी सह आयुक्त जात प्रमाणपत्र तपासणी यानी नमूद केले की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ठाणे या बँकेची जातपडताळणी समितीकडे १६१ प्रकरणे होती. त्यापैकी १५८ प्रकरणे वैध ठरली असून तीन प्रकरणे अवैध ठरली आहेत. यापैकी श्री. रक्षित मोकाशी यांचे प्रकरण दिनांक ३० एप्रिल २००४ मध्ये अवैध ठरले आहे. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविलेल्या श्री. रक्षित मोकाशी व श्री. आर. पी. गायकवाड या कर्मचा-यांना दिनांक ६ नोव्हेंबर २०१८ रोजी सेवेतून बडतर्फ केले असले तरी त्यांच्यावर बँक प्रशासनाने वेळीच कारवाई करणे आवश्यक होते. तथापि, बँकेने त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी विलंब केल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अतः श्री. रक्षित मोकाशी आणि श्री. आर. पी. गायकवाड यांनी शासनाची फसवणूक केल्याने त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांनी आतापर्यंत घेतलेले आर्थिक लाभ, त्यांना बँकेने दिलेले वेतन व इतर मोबदल्याची रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यांत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

ठाणे महानगरपालिका

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १७ ते २० नोव्हेंबर २०१६ या कालावधीत केलेल्या दौ-याच्या वेळी दिनांक १७ नोव्हेंबर २०१६ रोजी ठाणे महानगरपालिकेस भेट दिली होती.

समितीने, ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर ठाणे महानगरपालिकेत अनुसूचित जमाती प्रवर्गाची तांत्रिक व अतांत्रिक संवर्गात सरळसेवेची एकूण मंजूर पदांपैकी टक्केवारीनुसार किती पदे राखीव ठेवली आहेत अशी विचारणा केली असता अतिरिक्त आयुक्तांनी विदित केले की, दिनांक १९ जानेवारी २०१६ रोजी आरक्षणाबद्दलचा शासन निर्णय काढलेला आहे. सन २०१४ मध्ये ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्ह्याची निर्मिती झाली. त्यानंतर अनुसूचित जमातीसाठी ठाणे जिल्ह्यातील आरक्षण २२ टक्क्यावरून ७ टक्क्यापर्यंत कमी झालेले आहे. सुधारित आरक्षणानुसार आकडेवारी विहीत केलेली आहे. पूर्वी २२ टक्के आरक्षण होते, परंतु आता ते आरक्षण ७ टक्क्यावर आल्याने प्रत्येक ठिकाणी अनुसूचित जमातीच्या संवर्गातील संख्या अधिक असल्याचे सांगितले यावर समितीने, वर्ग-३ आणि वर्ग-४ पदांची बिंदूनामावली तपासणीस विलंब लागण्याची कारणे काय आहेत असा प्रश्न केला असता अतिरिक्त आयुक्तांनी विदित केले की, बिंदूनामावली सहायक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष यांच्याकडून दर तीन वर्षांनी करणे आवश्यक आहे. सन २०१३ मध्ये तपासणी करण्यात आली होती तसेच पुढील तपासणी सन २०१६ मध्ये होणार आहे. सन २०१४ मध्ये ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यामुळे माहे जानेवारी, २०१६ मध्ये शासनाने अनुसूचित जमातीच्या आरक्षणामध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरू केली यामुळे विलंब

झाला. समितीने सूचना केल्याप्रमाणे सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याकडून बिंदूनामावली तपासणी करून घेण्यात येईल. सहायक आयुक्त (मावक) यांनी पुढे असे नमूद केले की, दिनांक १९ जानेवारी २०१६ रोजी शासनाने शासन निर्णय काढला असून त्यामध्ये आरक्षणाची टक्केवारी ठरवून दिलेली आहे. त्यानंतर ठाणे आणि पालघर जिल्ह्याला कळविण्यात आले आहे. सर्वांचे काम प्रगतिपथावर आहे. ठाणे महानगरपालिकेमधील शिक्षण विभागाचे काम सुरू आहे.

समितीने, ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-३ व ४ मधील राखीव पदावरील बिंदू-नामावली नोंदवही सन १९८९ पासून ठेवण्यात आलेली आहे. तसेच सदर बिंदूनामावली नोंदवही जून २०१३ मध्ये सहायक आयुक्त मागासवर्ग कोकण विभाग यांच्याकडून तपासण्यात आलेली आहे.

समितीने, महानगरपालिकेत सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ मध्ये संवर्गनिहाय वर्ग-३ मध्ये जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे काय व किती कर्मचा-यांकडून प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे तसेच जातपडताळणी समिती, ठाणे यांनी ठाणे महानगरपालिकेमधील अनुसूचित जमातीच्या ३१ कर्मचा-यांची प्रमाणपत्र अवैध ठरविली आहेत. याबाबत माहिती देण्यास सांगितले असता अतिरिक्त आयुक्तांनी माहिती दिली की, भरती प्रक्रिया आता पूर्ण झाली असून त्यांना सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याबाबत सांगितले आहे. याबाबत दिनांक १८ मे २०१३ च्या शासननिर्णयानुसार कार्यवाही केली जाईल. सन २०१५-२०१६ मध्ये नियुक्त केलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यास अवधी दिलेला आहे त्यांना सेवेत येऊन सहा महिने पूर्ण झालेले नाहीत.

समितीने, दिनांक २१ ऑक्टोबर २००१ नंतर महानगरपालिकेत वर्ग-३ मध्ये १८२ कर्मचारी व वर्ग-४ मध्ये १६८ कर्मचा-यांना नियुक्ती देण्यात आली आहे. सेवेत नियुक्ती देण्यापूर्वी कर्मचा-यांकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे काय, नसल्यास, यास जबाबदार कोण आहे याबाबत विचारणा केली असता अतिरिक्त आयुक्तांनी विदित केले की, वर्ग-३ मधील १८२ कर्मचा-यांपैकी १७४ कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाली आहेत. ८ कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्रे प्राप्त झाली नाहीत, या ८ पैकी ४ प्रकरणे न्यायालयात आहेत, एक प्रकरण अवैध ठरविण्यात आले आहे, एक प्रकरण रद्द करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वर्ग-४ मधील १६८ कर्मचा-यांपैकी १४६ कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्रे सादर केली असून २२ कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्रे अप्राप्त आहेत. त्यापैकी १७ कर्मचा-यांची कागदपत्रे प्राप्त झाली असून १७ पैकी १५ कर्मचा-यांना ६ महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला आहे. दोन कर्मचा-यांना सेवेतून कमी करण्यासाठी अंतिम नोटीस देण्यात आली आहे. सन २००१ च्या शासन निर्णयानुसार ७८ कर्मचा-यांना संरक्षण प्राप्त झाले आहे, सन १९९५ नंतरच्या १३ कर्मचा-यांपैकी १२ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत, न्यायालयाने जो निकाल दिलेला आहे मुंबई उच्च न्यायालयात ३८/४४ श्री. मिलिंद शिरसाठ यांच्या प्रकरणाबाबत दिनांक ११ मे २०११ रोजी आदेश दिले आहेत. त्याबाबत जात

प्रमाणपत्र पडताळणी समितीने याबाबत निर्णय घ्यावा असे कळविले असल्याने सदर प्रकरण त्यानंतर जात वैधता प्रमाणपत्र समितीकडे पडताळणीसाठी सादर करण्यात आले आहे. या प्रकरणाबाबत समितीने ६ महिन्यांत निर्णय घ्यावयाचा आहे.

जात पडताळणी समितीने एखादे प्रकरण अवैध ठरविल्यावर अनेक प्रकरणात न्यायालयाकडून संबंधित प्रकरणांमध्ये संरक्षण मिळते. तसेच वेगवेगळे आदेश येतात. त्यामुळे संबंधित कर्मचा-यांना तात्पुरते संरक्षण मिळते असे सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे यांनी निदर्शनास आणून दिले. यावर, मा. न्यायालयाने दिनांक ११ मे २०११ रोजी निकाल दिलेला आहे. कोर्टाने एक किंवा दोन वर्षे मुदत दिली असेल, त्यानंतर पुढील कार्यवाही करणे अपेक्षित आहे. एकंदरीत ९ पैकी आठ प्रकरणात सेवा संरक्षणाचे मा. न्यायालयाचे आदेश आहेत. खरे तर अवैध प्रकरणामध्ये ठरलेल्या प्रकरणातील कर्मचा-यांना काढून टाकण्याची कारवाई करणे अपेक्षित आहे, असे समितीने मत व्यक्त केले.

समितीने, ठाणे शहरातील कोपरीमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांचे वसतिगृह असून महानगरपालिकेने तेथील दोन गुंठे जागा दिलेली आहे, परंतु त्यांचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत आदिवासी विकास विभागाची दोन गुंठे जमीन देण्याची प्रक्रिया रखडलेली आहे असा मुद्दा उपस्थित केला असता अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी विदित केले की, महानगरपालिकेने त्या दोन गुंठे जागेसाठी २.५० कोटी रुपयांची मागणी शासनाकडे केलेली आहे. त्यांच्याकडून निधी आल्यानंतर तो महानगरपालिकेला देण्यात येणार आहे. याबाबत अतिरिक्त महानगरपालिकेच्या आयुक्तांनी नमूद केले की, ठाणे महानगरपालिका आर्थिक बाबतीत सक्षम आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गाचा विचार करून कर्जरुपाने त्यांना मदत केली तर आदिवासी बांधवांच्या मुलांना त्याचा फायदा होऊ शकेल. महानगरपालिकेच्या आयुक्तांना २५ लाख रुपयांपर्यंत खर्च करण्याचे अधिकार आहेत, यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा स्थायी समिती तसेच महासभेपुढे आणला जाईल.

समितीने, वर्ग-३ आणि वर्ग-४ मध्ये मंजूर पदे किती आणि त्यात अनुसूचित जमातीची किती पदे राखीव आहेत असा प्रश्न केला असता शिक्षण विभागात पर्यवेक्षक, मुख्याध्यापक, गट शिक्षणाधिकारी, उप शिक्षक असे संवर्ग आहेत. मुख्याध्यापकांचा एकूण ४ पदांचा तसेच उप शिक्षकांचा एकूण ५२ पदांचा अनुशेष असून यात ऊर्दू शिक्षकांचा १८ पदांचा अनुशेष आहे. यासंदर्भात मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात याचिका क्रमांक ३६८१/२०००, दिनांक २६ ऑक्टोबर २००० रोजी दाखल झाली होती. अनुसूचित जमातीमध्ये ऊर्दू शिक्षक मिळत नाहीत त्यामुळे ऊर्दू माध्यमांसाठीचे अनुसूचित जमातीसाठी विहित केलेले आरक्षण समर्थनीय नसल्यामुळे १०० बिंदूनामावली मध्ये अनुसूचित जमातीसाठीचे आरक्षण खुल्या प्रवर्गासाठी राहील, अशा प्रकारचा वापर करण्यात यावा. ऊर्दू शिक्षकांची पदे भरण्यासंबंधी मा.

उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी शिक्षण परिषदेमार्फत केली जाईल.

समितीने, ठाणे महानगरपालिकेतील शिक्षण विभागाच्या बिंदूनामावलीबाबत विचारणा केली असता अतिरिक्त आयुक्तांनी अवगत केले की, महानगरपालिकेचे शिक्षण मंडळ सन २०१४ मध्ये बरखास्त केल्यानंतर बिंदूनामावली तयार करण्यास मागासवर्ग कक्षाकडे पत्रव्यवहार सुरू झाला. यावर, सहायक आयुक्तांनी निदर्शनास आणले की, शिक्षण विभागातील वर्ग -१ आणि वर्ग-२ ची तपासणी सुरू असून यामध्ये खूप तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. यापूर्वी २२ टक्के आरक्षणाप्रमाणे शिक्षण मंडळाने पदे भरलेली आहेत आता ७ टक्के प्रमाणे पदे भरायची आहेत. दिनांक १९ जानेवारी २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ७ टक्के प्रमाणे अनुसूचित जमातींवर अन्याय होणार आहे. महापालिकेच्या परिवहन विभाग व शिक्षण विभागासंदर्भात तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

याबाबत अतिरिक्त आयुक्तांनी, शिक्षण मंडळाचे सन २०११ मध्ये २३५ पदांचे आरक्षण होते. प्रत्यक्षात ४७ पदे भरली असून १६६ पदांचा अनुशेष शिल्लक असल्याचे अवगत केले. उक्त प्रकरणावर समितीने ठाणे जिल्ह्यात पूर्वी २२ टक्के आरक्षण लागू होते, परंतु या जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर आता ठाणे जिल्ह्यात सात टक्के आरक्षण लागू केलेले आहे. पूर्वी ज्या विभागांनी २२ टक्के प्रमाणे अनुसूचित जमातीचा अनुशेष न भरल्यामुळे होते ते भरले नाही यासंदर्भात जबाबदारी निश्चित करावी असे निदेशित केले.

समितीने, शिक्षण विभागात सन १९९५ पूर्वी सेवेत रुजू झालेल्या काही कर्मचा-यांना संरक्षण असले तरी शासन निर्णयान्वये जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार किती कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही अशी विचारणा केली असता अतिरिक्त आयुक्तांनी विदित केले की, शिक्षण विभागातील श्रीमती रेखा वसंत भामरे या ठाकूर जातीच्या असून त्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. त्यांनी उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्रमांक ५७८८/१४ दाखल केलेली आहे. यामध्ये विभागाने कोणतीही कारवाई करू नये असे मा. उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत.

समितीने, सन २००२-२००३ पासून काही प्रकरणे प्रलंबित आहेत. तसेच सन २०११ ते २०१४ पर्यंतची काही प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत विचारण केली असता दिनांक १६ मे २०११ रोजी जात पडताळणी समितीकडे प्रकरणे पाठविलेली आहेत. श्री. दत्तात्रय महाले यांच्या जात पडताळणीबाबत दिनांक २२ मार्च २००५ रोजी प्रस्ताव नाशिक जात पडताळणी समितीकडे पाठविलेला आहे. संबंधित कर्मचा-यांना दिनांक २२ जून २०१६ रोजी स्मरणपत्र दिलेले आहे. या सर्व प्रकरणांमध्ये आम्ही वारंवार पाठपुरावा केलेला आहे. आता पुन्हा त्यांना अंतिम नोटीस देण्यात येईल.

सहायक आयुक्त (मावक) यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, बिंदूनामावली तपासण्याची

मागणी करण्यात आली त्यावेळी त्यांना वेळ ठरवून देण्यात आली होती. सन २००८ नंतर पालिकेतर्फे बिंदूनामावली तपासणीची मागणी करण्यात आली नाही. आता तारीख देण्यात आली आहे. दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ नुसार शासनाकडे अहवाल सादर करून आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. तीन वर्षानंतर नियमित बिंदूनामावली तपासणी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ज्यावेळी मंजूर पदसंख्येत वाढ किंवा घट होते अशा वेळी सुद्धा अनुशेष भरताना बिंदूनामावली तपासणी करणे आवश्यक आहे. मंजूर पद संख्येत कोणताही बदल झाला नसेल तरीही नियमित दर तीन वर्षांनी बिंदूनामावली तपासणी करणे आवश्यक आहे.

यावर समितीने, सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष यांनी जी माहिती दिली ती अत्यंत उपयुक्त आहे, दर तीन वर्षानी बिंदूनामावली तपासणी करणे अपरिहार्य तर आहेच परंतु ज्यावेळी मंजूर पद संख्येत घट किंवा वाढ होते त्यावेळी सुद्धा बिंदूनामावली तपासणी करणे आवश्यक आहे.

ठाणे महानगरपालिकेने आरक्षित असलेल्या अनुसूचित जमातीसाठी कोणत्या योजना राबविल्या आहेत, याबाबतची माहिती समितीने विचारली असता अतिरिक्त आयुक्तांनी महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या पाच टक्के रक्कम मागासवर्गीयांच्या वार्डातील कामे करण्यासाठी राखीव ठेवली जाते. महानगरपालिकेच्या उत्पन्नामधून वेतनाची रक्कम वजा जाता निव्वळ उत्पन्नाच्या ५ टक्के रक्कम मागासवर्गीयांसाठीच्या कल्याणावर खर्च करावा अशी कायद्यामध्ये तरतूद आहे. मागील दोन वर्षांमध्ये सन २०१४-२०१५ मध्ये महानगरपालिकेचे महसुली उत्पन्न १४०७ कोटी रुपये आहे, त्यामधून शासनाचे अनुदान वजा करून निव्वळ १२४२ कोटी रुपये होतात. यामधून आस्थापना खर्च ७१३ कोटी रुपये वजा केले तर ५२९ कोटी रुपये शिल्लक राहतात. त्यावर ५ टक्के प्रमाणे २६ कोटी रुपये मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी खर्च होणे अपेक्षित आहे. तथापि, सन २०१४-२०१५ मध्ये २६ कोटी रुपये, सन २०१५-२०१६ मध्ये २९ कोटी रुपये, सन २०१६-२०१७ मध्ये ३४ कोटी रुपये पेक्षा जास्तीची रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी खर्च करीत आहोत. यात शौचालय बांधणे, रस्ता बांधणे, पाणी पुरवठ्याची सोय उपलब्ध करून देणे, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, बचत गटांना वैयक्तिक आणि सामूहिक मदत केली जाते. त्यासोबतच इतर सोई सुविधांची कामे केली जातात. सन २०१४-२०१५ मध्ये २६ कोटी रुपयांची तरतूद करणे आवश्यक असताना ६९ कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. सन २०१५-२०१६ मध्ये २९ कोटी रुपयांची आवश्यकता असताना ७९ कोटी रुपये दिले आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विकासासाठी जो निधी खर्च करावयाचा होता, त्यापेक्षा जास्तीचा निधी दिलेला असल्याची माहिती दिली.

विभागीय सचिवांची साक्ष :—

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी ठाणे महानगरपालिके संदर्भात झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली होती.

उक्त साक्षीच्यावेळी समितीने ठाणे महानगरपालिकेमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गाची तांत्रिक व अतांत्रिक संवर्गाची वर्ग-३ व वर्ग-४ ची किती पदे भरण्यात आली आहेत, किती पदे रिक्त आहेत व रिक्त पदे कधी भरण्यात येतील, याबाबत विचारणा केली असता अतिरिक्त आयुक्तांनी विदित केले की, अनुसूचित जमाती प्रवर्गाची वर्ग-१ ते ४ ची गेल्या तीन वर्षांमध्ये एकूण १४५ पदे भरण्यात आली आहेत. शासनाने मेगा भरतीची प्रक्रिया सुरू केली असून ठाणे महापालिकेतील अनुशेषाची पदे लवकरात लवकर भरली जातील. ठाणे महापालिकेमध्ये एकूण ९७१० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ११५५ पदांवर अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचारी सध्या कार्यरत आहेत. वर्ग-१ ते ४ मध्ये तांत्रिक सरळसेवेची एकूण रिक्त पदे ४५, अतांत्रिक सरळसेवेची १९, तांत्रिक पदोन्नतीची ११ व अतांत्रिक पदोन्नतीची २७ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे ३-४ वर्षांपासूनची आहेत. रिक्त पदांच्या संदर्भातील जाहिरात लवकरच देण्यात येईल. ठाणे महानगरपालिकेमध्ये अनुसूचित जमातीतील अधिकारी, कर्मचारी यांची ११५५ पदे कार्यरत आहेत. अनुसूचित जमातीची तांत्रिकमध्ये सरळसेवेची वर्ग १ ची ७ पदे आहेत, ५ पदे भरली आहेत, वर्ग २ चे १ पद आहे, ते पद भरले असून अतांत्रिकमध्ये सरळसेवेची ७ पदे आहेत, त्यापैकी २ पदे भरली आहेत, वर्ग २ मध्ये २ पदे आहेत, त्यापैकी १ पद भरले आहे. पदोन्नतीमध्ये तांत्रिकची ३ पदे आहेत, यावर समितीने गेल्या तीन-चार वर्षापासून रिक्त जागा का ठेवण्यात आल्या असा प्रश्न केला असता प्राध्यापकांच्या पदांसाठी ४ वेळा जाहिरात दिली होती. तथापि, अनुसूचित जमातीचे उमेदवार मिळाले नसल्याने जागा रिक्त आहेत असे सांगितले. त्यापैकी २ पदे भरली आहेत.

समितीने ठाणे महानगरपालिकेतील जात पडताळणी तसेच बिंदूनामावलीबाबत विचारणा केली असता अतिरीक्त आयुक्तांनी समितीस खालील माहिती दिली. समितीने सन २०१६ मध्ये भेटीच्या वेळी जात वैधता व बिंदूनामावली तपासून घेणेबाबत सूचित केले होते. त्यानंतर १३० संवर्गाची बिंदूनामावली तपासण्यासाठी पाठविली होती, त्यापैकी ७८ संवर्गांची बिंदुनामावली तपासून आली आहे. तर ४२ संवर्गांचे काम सुरू आहे. सन २०१४-१५ व सन २०१५-१६ च्या दरम्यान वर्ग ३ च्या ९६ कर्मचा-यांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत, त्यातील ६६ जणांचे जात वैधता प्रमाणपत्र मिळाले आहे. श्री देवांग मोतले, वाहनचालक व श्री. सचिन बुधवल, भांडार लिपिक या २ कर्मचा-यांची नियुक्ती रद्द केल्या होत्या परंतु त्यांची न्यायालयाच्या आदेशानुसार पुर्नर्नियुक्ती केली आहे. जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे श्री. दीपक भामरे यांना कामावरुन कमी केले आहे, वर्ग ३ व ४ मधील ८८८ जणांची जात वैधता प्रमाणपत्र मिळालेली आहेत. जात वैधता न झालेली वर्ग ३ ची ९ पदे आहेत आणि वर्ग ४ ची २२ पदे आहेत. वर्ग १ व २ ची जात वैधता प्रमाणपत्र आलेली आहेत.

समितीने, जात वैधता प्रमाणपत्र राहिलेल्यांच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली आहे असा प्रश्न केला असता अतिरिक्त आयुक्तांनी नमूद केले की, ज्यांनी जात वैधता प्रमाणपत्र दिलेले नाही, त्या १२ जणांना

दिनांक १८ मार्च, २०१७ रोजी कमी केले होते. मात्र ते उच्च न्यायालयात गेल्यामुळे ८ जणांना पुन्हा घ्यावे लागले. उच्च न्यायालयाचे असे आदेश आहेत की, जात पडताळणी समितीने त्यांची फेरतपासणी करून निर्णय द्यावा, तोपर्यंत त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात येऊ नये. त्यामध्ये मुदत घालून दिलेली नाही. ही प्रकरणे औरंगाबाद व नंदूरबार जात पडताळणी समितीकडे पाठविली आहेत. औरंगाबादला श्री. सुनील तायडे, आरक्षक यांचे प्रकरण आहे. बिंदूनामावली किती वर्षापासून अद्यायावत झालेल्या नाहीत असा प्रश्न केला असता सन २०१३ मध्ये महापालिकेने नामावली तपासून घेतली होती त्यानंतर समिती येण्यापूर्वी सन २०१६ मध्ये विभाजनाचा शासन निर्णय जानेवारी, २०१६ मध्ये आला आहे. विभाजनाप्रमाणे बिंदूनामावली सादर करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार बिंदूनामावली अद्ययावत करण्याचे प्रकरण सादर केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने बिंदूनामावली तपासणी सद्यःस्थितीत करता येत नाही असे जात पडताळणी समितीने कळविण्याचे अतिरिक्त आयुक्तांनी सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :—

ठाणे महानगरपालिकेतील वर्ग-३ मधील ९ कर्मचारी आणि वर्ग-४ मधील २२ कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केली नसल्याचे समितीस आढळून आले आहे. **वर्ग-३ व वर्ग-४ मधील एकूण ३१ कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी प्रशासनाने पाठपुरावा करावा तसचे जे कर्मचारी वेळेत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

मिरा भाईंदर महानगरपालिका

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १७ ते २० नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत केलेल्या दौ-याच्यावेळी दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिके संदर्भात बैठक घेतली होती.

समितीने, मिरा-भाईंदर महानगरपालिकेत सन १९९५ पूर्वीचे व सन १९९५ नंतरचे किती कर्मचारी आहेत. सन १९९५ नंतरच्या कर्मचा-यांच्या बिंदूनामावलीबाबत माहिती विचारली असता उप आयुक्तांनी विदित केले की, वर्ग-३ चे सन १९९५ पूर्वीचे ३ कर्मचारी असून सन १९९५ नंतरचे ७० कर्मचारी आहेत. सन १९९५ नंतरचे एक प्रकरण जातपडताळणी समितीकडे कागदपत्रे सादर करण्यासाठी कर्मचा-यांस नोटीस दिलेली आहे. यावर समितीने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी असे सूचित केले. सन १९९५ नंतरचे वर्ग-३ चे ७० कर्मचारी असून त्यांची जातपडताळणी केलेली आहे. वर्ग-४ चे ५२ कर्मचारी आहेत. सन २०१२-२०१३ ते सन २०१५-२०१६ पर्यंत ठाणे जिल्ह्यात २२ टक्के आरक्षण लागू होते. त्यानंतर ७ टक्के आरक्षण लागू झाले तेव्हा त्यातील काही पदे अतिरिक्त झालेली आहेत. तत्कालीन लिपिक संवर्गातील २२ पदे अतिरिक्त आहेत.

सहायक आयुक्त (मावक) यांनी खुलासा केला की, एकूण १९९ पदे मंजूर आहेत त्यामध्ये सरळसेवेने ९९ पदे भरलेली असून त्यातील ७ पदे अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. माहे मार्च, २०१६ मध्ये तपासणी झाली त्यावेळी २२ पदे अतिरिक्त असल्याचे आढळून आले होते तसेच पदोन्नतीची १०० पदे आहेत. त्यातील ७ पदे अनुसूचित जमातीसाठी असून त्यातील पदोन्नतीची ५ पदे कार्यरत आहेत. पालिकेने आकृतीबंधानुसार मंजूर पदे असे गृहीत धरले आहे. मंजूर पदे असे न म्हणता आकृतीबंधानुसार एकूण पदे व त्यावरील सरळसेवा व पदोन्नतीचे एकूण प्रमाण असे करावे.

समितीने, वर्ग-३ व वर्ग-४ मधील ७ कर्मचा-यांची जात पडताळणी केलेली नाही. याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता एका कर्मचा-याचे प्रकरण सन २०१३ मध्ये सादर केलेले आहे. उर्वरीत कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र अद्याप दिलेले नाही. सन १९९५ पूर्वीचे ५ उमेदवार व सन १९९५ नंतरचे २ उमेदवार यांची जात वैधता अद्याप झालेली नाही.

समितीने आदिवासी मुलांच्या वसतिगृहासाठी महानगरपालिकेकडून आदिवासी विकास विभागाला जागा उपलब्ध करून दिली आहे काय असे विचारले असता अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी नमूद केले की, याबाबत निविदा काढून बांधकाम करून देण्याबाबत सांगितले होते. यासाठी ५ टक्के निधी खर्च करण्यास सांगितले होते. वास्तविक बांधकामाच्या किंमतीपेक्षा जमिनीची किंमत जास्त आहे, त्यामुळे त्रुटी काढण्यात आल्या होत्या. परंतु आता शासनाकडून दीड महिन्यापूर्वी पत्र प्राप्त झाल्यामुळे आपण हे बांधकाम करु शकतो.

विभागीय सचिवांची साक्ष :—

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिकेस दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली होती. यावेळी समितीने, अनुसूचित जमातीच्या तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील वर्ग तीन व चारच्या पदांबाबत विचारणा केली असता आयुक्तांनी विदित केले की, मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये वर्ग-३ च्या आस्थापनेवर ७३० पदे मंजूर असून त्यापैंकी ४७६ पदे भरण्यात आलेली आहेत. वर्ग-४ मध्ये १५८१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ९३६ पदे भरण्यात आलेली आहेत. वर्ग-३ मध्ये अनुसूचित जमातीसाठी आरक्षणानुसार ३२ पदे आवश्यक होती.परंतु प्रत्यक्षात ७१ पदे भरण्यात आलेले आहेत. वर्ग-४ मध्ये ४६ पदे होती. प्रत्यक्षात ६२ पदे भरण्यात आलेली आहेत. सात कर्मचा-यांच्या जात वैधता प्रमाणपत्राचा प्रश्न प्रलंबित होता. त्यामध्ये एक कर्मचारी मयत झालेला आहे. उर्वरित दोन प्रकरणांमधील कर्मचा-यांना विशेष मागासप्रवर्गाचे प्रमाणपत्र मिळालेले आहे.

समितीने, सन १९९५ पूर्वीचे कर्मचारी आणि सन १९९५ नंतरचे कर्मचारी यांच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबतची सविस्तर माहिती समितीला देण्यास सांगितले असता आयुक्तांनी विदित केले की, सन १९९५ पूर्वीचे वर्ग -३ चे दोन कर्मचारी आणि वर्ग-४ चे १८ कर्मचारी आहेत. तसेच सन १९९५ नंतरचे वर्ग-३ चे ७४ आणि वर्ग-४ चे ४५ कर्मचारी आहेत. अशा प्रकारे एकूण १४१ कर्मचारी आहेत. अशा प्रकारे १९९५ पूर्वीचे २० कर्मचारी आणि सन १९९५ नंतरचे ११९ कर्मचारी आहेत. त्यापैकी सात कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक होते. वर्ग-३ मध्ये एका कर्मचा-याने विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्यांचा बिंदू रिक्त करून त्यांना विशेष मागास प्रवर्गात सामावून घेण्यात येत आहे. दुसरे श्री.रविंद्र पाटील नावाचे कर्मचारी होते. त्यांच्याकडेही विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र आहे. त्यामुळे त्यांचाही बिंदू रिक्त करण्यात येईल. श्री. माधव बोरसे यांनी जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे. श्री. अनिल मेंटल हे देखील गैरहजर होते आणि त्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांना देखील बडतर्फ करण्यात आलेले आहे. तसेच श्री.अनिल फातरे हे मयत झालेले आहेत. तसेच एक कर्मचारी दैनिक वेतनावर कार्यरत होता. त्या कर्मचा-याला सेवेमध्ये सामावून घेण्यात आलेले होते. त्या कर्मचा-याला अनुसूचित जमाती प्रवर्गात पदोन्नती दिली होती. त्यामुळे त्या कर्मचा-याला आता पदावनत करण्यात येत आहे. त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरहू बिंदू खुला करण्यात येत आहे. लवकरच त्या कर्मचा-यास खालच्या पदावर आणून त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात येईल.

अभिप्राय व शिफारशी :—

(१) समितीने, दिनांक १७ नोव्हेंबर २०१६ रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिकेस दिलेल्या भेटीच्यावेळी आदिवासी मुलांच्या वसतिगृहासाठी महानगरपालिकेकडून जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू असल्याचे समितीस आढळून आले होते. सदर वसतिगृहांसाठी लागणा-या जागेचे संपादन करण्याच्या प्रक्रियेस महानगरपालिका तसेच आदिवासी विकास विभाग यांच्याकडून बराच विलंब झाला आहे. **सबब, आदिवासी मुलांच्या वसतिगृहांसाठी जागा संपादनाची प्रक्रिया लवकरात-लवकर करून वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम सुरू करावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(२) मिरा-भाईदर महानगरपालिकेतील वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये काही विशेष मागासवर्ग व इतर वर्गाच्या कर्मचा-यांनी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र सादर करून अनुसूचित जमातीच्या बिंदूवर नेमणूक करून घेतली होती. यामध्ये श्री. रविंद्र पाटील, श्री. अनिल मेंटल तसेच इतर कर्मचा-यांचा समावेश आहे. **उक्त कर्मचा-यांचा बिंदू रिक्त करून त्या जागेवर पात्र अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

नवी मुंबई महानगरपालिका

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १७ ते २० नोव्हेंबर २०१६ या कालावधीत केलेल्या दौ-याच्यावेळी दिनांक १८ नोव्हेंबर २०१६ रोजी नवी मुंबई महानगरपालिके संदर्भात बैठक घेतली होती.

समितीने, नवी मुंबई महानगरपालिकेत तांत्रिक पदाची वर्ग-३ मध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील सरळसेवेने ३३ पदे व पदोन्नतीची १४ पदे केव्हापासून रिक्त आहेत, रिक्त पदे भरण्याबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती देण्यास सांगितले असता आयुक्तांनी विदित केले की, तांत्रिक व अतांत्रिक पदांचा वर्ग-३ मध्ये ७४ सरळसेवेच्या पदांचा, व १४ पदोन्नतीच्या पदांचा असा ८८ पदांचा अनुशेष आहे. यामधील अधिकांश पदे तांत्रिक स्वरुपाची होती. त्यांची तांत्रिक अर्हता प्राप्त न होणे हे अनुशेष राहण्याचे एक कारण आहे. त्यानंतर एप्रिल २०१६ मध्ये आरोग्य विभागात १०८५ शासनमान्य पदे मंजूर झालेली आहेत. सन २०१६ मध्ये अग्निशमन विभागाकडील ४१९ पदे मंजूर झालेली आहेत. यापैकी दोन विभागात वर्ग-३ ची ८२३ व ४१६ अशी १२३९ पदे आहेत. यावर ७ टक्केप्रमाणे आरक्षण ८७ पदे येतात. समितीला माहिती सादर केल्याप्रमाणे गट-क ची ८८ पदांपैकी ८७ पदे या वर्षी एप्रिल-मे महिन्यांत मंजूर झालेली आहेत. त्यामुळे अनुशेष आहे. वर्ग-३ मधील पदोन्नतीच्या १४ पदाकरिता अनुसूचित जमातीच्या संवर्गामध्ये उमेदवार उपलब्ध नाहीत, वर्ग-३ मधील सरळ सेवेची ७४ पदे, व पदोन्नतीची १४ पदे रिक्त आहेत. सरळसेवेची पदे ब-याच वर्षांपासून रिक्त आहेत.

यावर समितीने, जाहिरात देऊनही उमेदवार मिळत नाही अशी कोणती पदे आहेत अशी विचारणा केली असता आयुक्तांनी विदित केले की, जानेवारी २०१२ मध्ये मागासवर्गीयांची भरती करण्याकरिता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये अनुसूचित जमातीकरिता ११६ पदे होती. त्यातून ५५ उमेदवार प्राप्त झाले असून त्यांना नेमणुका दिलेल्या आहेत. ऑगस्ट २०१२ मध्ये अनुशेष व खुल्या प्रवर्गातील पदे भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली. यामध्ये अनुसूचित जमातीसाठी ३ पदे राखीव होती पण यातून एकही उमेदवार प्राप्त झाला नाही. दिनांक १४ जानेवारी, २०१२ ची जाहिरात २२ संवर्गातील ११६ पदांसाठी वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली होती. यामध्ये स्टाफ नर्स ४८, उप लेखापाल १, क्ष-किरण तंत्रज्ञ १, सीएसएसडी १, रक्तपेढी तंत्रज्ञ १, डायलिसीस तंत्रज्ञ १, मिश्रक औषध निर्माता ३, वरिष्ठ लिपिक निरीक्षक २, हौझीलरी नर्स मिडवाईफ ७, अनुरेखक १, समय लेखक १, वाहन चालक १७, प्लंबर ३, उद्यान सहायक १, व्रणोपचारक १, नोटीस बजावणी १, वॉचमन १, शिपाई १२, आया १, वार्डवॉय ३, माळी बहुउद्देशीय सेवक ८, अशी एकूण ११६ पदांसाठी जाहिरात देण्यात आली होती. यातून ५५ अनुसूचित जमातीचे उमेदवार प्राप्त झाले. यानंतर मार्च २०१४ मध्ये उर्वरित १३ संवर्गाकरिता १०९ पदांकरिता जाहिरात देण्यात आली.

उक्त भरती संदर्भात मागील दोन वर्षात जाहिरात प्रसिद्धीबरोबर प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांच्याकडून पात्र उमेदवारांची यादी मागविण्यात आली नव्हती. प्रकल्प कार्यालयाकडून यादी मागविणे अपेक्षित आहे. मागणीनुसार गुणवत्ताधारक पात्र उमेदवारांची यादी प्रकल्प कार्यालयाकडून पाठविली जाते, असे समितीने निदर्शनास आणले.

समितीने, वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातून तांत्रिक पदे १०७ व अतांत्रिक पदे ७२ भरण्यात आली आहेत. सदर कर्मचा-यांना सेवेत नियुक्ती देण्यापूर्वी त्यांच्याकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आली आहेत काय अशी विचारणा केली असता आयुक्तांनी विदित केले की, सन १९९५ पूर्वीच्या २६७ कर्मचा-यांपैकी २२७ कर्मचा-यांच्या जात वैधता प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात आली आहे. तीन कर्मचा-यांच्या जात वैधता प्रमाणपत्राचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे, दिनांक २७ जून, २०१६ रोजी त्यांना सेवेत सामावून घेण्यात आले असून १० कर्मचा-यांची प्रकरणे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत.

सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे यांनी पुढे स्पष्ट केले की, ठाणे समितीकडे एकूण ११७ प्रकरणे होती, त्यापैकी १११ प्रकरणे वैध असून ५ प्रकरणे अवैध आहेत. एक प्रकरण निकाली काढण्यात आले आहे. आता आणखी सात प्रकरणांची कार्यवाही सुरू आहे. त्यापैकी ठाणे समितीकडे तीन प्रकरणे प्रलंबित आहेत. यामध्ये (१) श्रीमती योजना एकनाथ वैती यांचे जात प्रमाणपत्र सन २०१३ रोजी अवैध ठरविले आहे. (२) श्रीमती आशा अबू शिरसाठ-कोळी यांचे जातीचे

प्रमाणपत्र सन २००७ मध्ये अवैध ठरविले आहे. (३) श्री. महेंद्र पांडुरंग मुकादम यांचे जात प्रमाणपत्र सन २००८ मध्ये अवैध ठरविले आहे. (४) श्री. संदीप लक्ष्मण शिंदे (५) श्री. दिपक लक्ष्मण शिंदे ही दोन प्रकरणे पुन्हा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करावीत असे न्यायालयाने आदेश दिले आहेत.

समितीने, नवी मुंबई महानगरपालिकेतील सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीत अनुसूचित जमाती प्रवर्गातील वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये सेवेत नियुक्त झालेले एकूण किती कर्मचारी असून त्यांच्याकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आली आहेत काय, अजून किती कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्रे येणे बाकी आहे अशी विचारणा केली असता आयुक्तांनी विदित केले की, सन २०१२-१३ या वर्षात सरळसेवेने ५ व पदोन्नतीने तीन पदे भरण्यात आली होती. अशी एकूण ८ पदे भरण्यात आली होती. त्यानंतर वर्ग-४ ची २ पदे भरण्यात आली होती. सन २०१३-१४ मध्ये वर्ग-३ ची ५१ पदे व वर्ग-४ ची ४९ पदे सरळसेवेने भरण्यात आली. सन २०१४-१५ मध्ये वर्ग-३ ची दोन पदे सरळसेवेने व पदोन्नतीने ८ पदे भरण्यात आली होती. वर्ग-४ चे एक पद सरळसेवेने भरण्यात आले. सन २०१५-१६ मध्ये वर्ग-३ चे एक पद पदोन्नतीने भरण्यात आले. त्यानंतर सन २०१६-१७ मध्ये वर्ग -३ ची दोन पदे सरळसेवेने भरण्यात आली. अशा प्रकारे वर्ग-३ व वर्ग-४ ची एकूण ११२ पदे मागील चार वर्षात भरण्यात आली आहेत.

समितीने, अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेल्या दोन प्रभागामध्ये मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी किती रक्कम खर्च केली आहे तसेच कोणकोणत्या योजना, सुविधा देण्यात आल्या आहेत असा प्रश्न केला असता अतिरिक्त आयुक्तांनी माहिती देताना सांगितले की, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सन २००९ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार अनुसूचित जमातीची लोकसंख्या ३०१६ होती. महिला बचत गटांसाठी अनुदान दिलेले आहे. इयत्ता पहिली ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिलेली आहे. आंतरजातीय विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान दिलेले आहे. तसेच बेरोजगार युवकांना व्यवसाय प्रशिक्षण, दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण, सायकल वाटप इत्यादी योजना राबविलेल्या आहेत शहर अभियंता यांनी पुढे नमूद केले की, वार्ड ८५ मध्ये सन २०१२-२०१३ मध्ये एकूण ३३ कामे केली असून त्यासाठी ४८९.२२ लाख रुपये, सन २०१३-२०१४ मध्ये ५० कामे केली असून त्यासाठी ४२७.३० लाख रुपये, तर सन २०१४-२०१५ मध्ये १८ कामांसाठी ११३ लाख रुपये खर्च केलेले आहेत. याशिवाय स्वच्छतागृहे, रस्त्यांची दुरुस्ती, दिवाबत्तीची सोय, शाळांची दुरुस्ती अशा प्रकारची कामे केलेली आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये ५१ लाख रुपयांची ४ कामे केलेली आहेत, तर सन २०१६-२०१७ मध्ये वार्ड क्रमांक २६ मध्ये १२८.९५ लाख रुपये विविध कामांसाठी खर्च केलेले आहेत. तसेच अनुसूचित जमातींसाठी हाती घ्यावयाच्या योजनाकरिता चालू आर्थिक वर्षासाठी तरतूद केलेली असून काही कामे निविदास्तरावर तसेच काही प्रशासकीय मान्यतास्तरावर आहेत.

विभागीय सचिवांची साक्ष :—

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी नवी मुंबई महानगरपालिके-संदर्भात झालेल्या बैठकीच्या दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली होती.

सदर साक्षीच्यावेळी समितीने नवी मुंबई महापालिकेत अनुसूचित जमातीच्या तांत्रिक व अतांत्रिक अशा सरळसेवेच्या ७४ पदांचा अनुशेष होता. याबाबत शासनाकडे मंजुरीकरिता पाठविलेल्या प्रस्तावास मंजुरी मिळूनही भरती प्रक्रिया राबविण्यात आली नाही. या बाबत खुलासा करण्यास सांगितले असता आयुक्तांनी विदित केले की, नवी मुंबई महापालिकेत मूळ पदे ३२७९ होती. त्यानंतर दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी नवीन आकृतीबंधाला मंजुरी मिळाली असून नवीन ६५६ पदांना मंजुरी देण्यात आली. त्यानुसार एकूण ३,९३५ पदे मंजूर आहेत. अग्निशमन व आरोग्य विभागातील ४४८ पदांची परीक्षा झाली असून आरोग्य विभागात ३३ पदे, अग्निशमन विभागात १९ पदे अशी एकूण ५२ पदांचा निकाल एक महिन्यांत प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. सदर ५२ पदे सन २०१२ पासून रिक्त आहेत. सन २०१४ मध्ये भरती झाली होती. त्यावेळी आकृतीबंध मंजूर नव्हता. जात वैधता प्रमाणपत्राबाबत समितीने भेट दिली होती त्यावेळी महापालिकेत एकूण २३३ अनुसूचित जमातीच्या कर्मचां-यापैकी १४ कर्मचा-यांकडे जात वैधता प्रमाणपत्र नव्हते. त्या १४ कर्मचा-यांना सेवा समाप्तीची नोटीस दिली असून त्या पैकी दोघांनी वैधता प्रमाणपत्र सादर केलेले असून त्यांना नियमित सेवेत घेतले आहे. उर्वरित दोन कर्मचारी सन १९९५ पूर्वीचे होते, त्यापैकी एका कर्मचा-याला पदावनत केले असून दुस-या कर्मचा-याने राजीनामा दिलेला आहे. तसेच ४ कर्मचारी कोर्टात गेले असून त्यांना उच्च न्यायालयाने जैसे थे आदेश दिलेला आहे. श्रीमती वैशाली कोळी यांचे प्रकरण ठाणे जात पडताळणी समितीकडे व श्री. आंग्रे यांचे प्रकरण कोकण विभाग जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे.

समितीने, श्रीमती योजना वैती, श्रीमती आशा शिरसाट, श्री. महेंद्र मुकादम यांचे प्रकरण न्यायप्रविष्ट होते, याबाबत सद्य:स्थिती काय आहे अशी विचारणा केली असता आयुक्तांनी अवगत केले की, जात पडताळणी समितीने अपात्र ठरविल्यानंतर त्यांनी न्यायालयाकडून जैसै थे आदेश घेतला आहे. यामध्ये कालावधी नमूद केलेला नाही. श्री. विशाल सुर्यवंशी प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे.श्रीमती वैशाली कोळी यांचे प्रकरण सन २०१७ पासून ठाणे जातपडताळणी समितीकडे प्रलंबित आहे. तसेच दिनांक २७ जून २०१६ रोजी नियुक्त झालेल्या कर्मचा-यांने जातपडताळणी प्रमाणपत्र सादर केले नसल्यास त्यांच्यावर दिनांक १८ मे २०१३ च्या शासन निर्णयानुसार कारवाई करावी असे समितीने निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :–

(१) समितीने, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेसंदर्भात घेतलेल्या साक्षीच्यावेळी अनुसूचित जमाती प्रवर्गाचा सरळसेवेचा ७४ पदांचा अनुशेष महानगरपालिकेच्या आकृतीबंधाला मंजुरी नसल्याने पूर्ण करता आला नाही. असे समितीस अवगत करण्यात आले होते. यामध्ये विशेषतः आरोग्य विभागातील ३३ पदे व अग्नीशमन विभागातील १९ अशी ५२ पदे सन २०१२ पासून रिक्त असल्याचे समितीस आढळून आले आहे. **महानगरपालिकेचा आकृतीबंध मंजूर नव्हता तरी एवढ्या मोठ्या पदांचा सन २०१२ पासून अनुशेष ठेवणे निश्चितच योग्य नाही. सबब, उक्त अनुशेष लवकरात लवकर पूर्ण करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी शासनास समितीची शिफारस आहे.**

(२) **नवी-मुंबई महानगरपालिकेतील जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेले श्रीमती वैशाली कोळी व श्री. आग्रे यांचे जात वैधता प्रमाणपत्र तसेच श्रीमती योजना वैती, श्रीमती आशा शिरसाठ व श्री. महेंद्र मुकादम या तीन कर्मचा-यांची न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणाचा विशेष वकील नेमून पाठपुरावा करून सदर प्रकरणे लवकरात लवकर निकालात काढावीत व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(३) समितीने दिलेल्या नवी-मुंबई महानगरपालिकेच्या भेटीच्यावेळी समितीस अनुसूचित जमाती प्रवर्गातील वेगवेगळ्या संवर्गातील ११६ पदे रिक्त असल्याचे आढळून आले होते. सदर पदे भरण्यासाठी सन २०१२ तसेच २०१४ मध्ये वेगवेगळ्या वृत्तपत्रांत जाहिराती देण्यात आल्या होत्या तरी सुद्धा अनुसूचित जमातीचे उमेदवार मिळाले नसल्याचे समितीस सांगण्यात आले आहे. **याबाबत समितीची शासनास अशी शिफारस आहे की, भविष्यात भरती करताना फक्त वृत्तपत्रातील जाहिरातीवर अवलंबून न राहता आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची यादी मागविण्यात यावी व त्यानुसार यापुढील भरतीची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी.**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस भेट दिली होती. सदर भेटीच्या वेळी समितीने, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत सरळसेवेने वर्ग-३ व वर्ग- ४ मध्ये संवर्गनिहाय राबविण्यात येणा-या भरती प्रक्रियेच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती देण्यास सांगितले असता आयुक्तांनी विदित केले की, दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ठाणे जिल्ह्यात अनुसूचित जमातीसाठी २२ टक्के असलेले आरक्षण होते, परंतु जिल्ह्यातील विभाजन झाल्यानंतर टक्क्यापर्यंत आले आहे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत ७ टक्के आरक्षणाप्रमाणे १२२ पदे आहेत. यामध्ये वर्ग- ३ मधील ९ आणि वर्ग- ४ मधील ६ कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बाकी आहे.

समितीने, महानगरपालिका शिक्षण विभागात संवर्गनिहाय एकूण मंजूर पदे किती आहेत, असा प्रश्न केला असता शिक्षणाधिका-यांनी नमूद केले की, शिक्षण विभागात एकूण १८१ पदे आहेत, त्यांपैकी १२६ पदे भरण्यात आली आहेत. यामध्ये ३२ पदे जास्त भरण्यात आली आहेत. सहा कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. यामध्ये सन २०१५ पुर्वीची प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. यापैकी श्री. गावीत यांचा नियुक्तींचा दिनांक २७ जानेवारी, १९८८, श्री.पांडुरंग बाबुराव वेडे, यांचा नियुक्तीचा दिनांक २० जून, १९९२, श्री.मलकस, यांचा नियुक्तीचा दिनांक २३ डिसेंबर, १९८३, श्रीमती मंगला नारायण मोटे, नियुक्तीचा दिनांक २० जुलै, १९८४ श्री.मंगल रमेश नंदनवार, नियुक्तीचा दिनांक १८ ऑक्टोबर, १९८४, श्री.सदाशिव दळवी, नियुक्तीचा दिनांक ५ जुलै, १९९६ या कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्र प्रलंबित आहेत.

विभागीय सचिवांची साक्ष :

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली होती.

समितीने, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील वर्ग-३ मधील ९ आणि वर्ग-४ मधील ६ कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्राची पूर्तता झालेली आहे काय, सदरहू कर्मचारी सेवेमध्ये केव्हा नियुक्त झालेले आहेत. तसेच १९९५ पुर्वीच्या ८१ कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी अद्यापपर्यंत न होण्याची कारणे काय आहेत, त्यांना त्यांच्या मूळ प्रवर्गात सामावून अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करण्यात आलेला आहे काय अशी विचारणा केली असता आयुक्तांनी सांगितले की, एकूण सात कर्मचा-यांच्या जात वैधतेचा प्रश्न होता. त्यामध्ये सन १९९५ पुर्वीचे तीन कर्मचारी होते व सन १९९५ नंतरचे चार कर्मचारी होते. त्यांपैकी दोन कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे. उर्वरित दोन कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यामुळे त्यांना दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी सेवा समाप्तीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

समितीने, महानगरपालिकेत अनुसूचित जमाती प्रवर्गातून पदोन्नतीने वर्ग-३ व वर्ग-४ मधील २३ पदे केव्हापासून रिक्त आहेत, सदरहू पदे रिक्त राहण्याची कारणे विचारली असता आयुक्तांनी सरळसेवेमध्ये वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये रिक्त पदे नाहीत. केवळ वर्ग-१ मध्ये एक पद आणि वर्ग-२ मध्ये सहा पदे रिक्त आहेत तसेच पदोन्नतीमध्ये एकूण १८ पदे रिक्त असल्याचे सांगितले

समितीने,कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील टिटवाळा व इतर भाग अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. त्यासाठी पाच टक्के निधी राखीव ठेवला जात असतो. त्यामधून त्या ठिकाणी कोणत्या

प्रकारची कामे करण्यात आलेली आहेत , याची माहिती समितीला देण्यास सांगितले असता आयुक्तांनी विदित केले की, पाच टक्क्यांमधील सन २०१७-१८ मध्ये ३.५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. तसेच सन २०१८-१९ मध्ये ५० लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आलेला आहे. या खर्चातून रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन, गटार, झोपडपट्टीमधील पायवाटा, आर.सी.सी. जलनिःसारण या प्रकारच्या नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या प्रभागांमधून सामान्यतः तीन महत्त्वाच्या मागण्या येतात. त्यामध्ये रस्ते, पाणी व ड्रेनेज लाईनचा समावेश असतो.

समितीने, मुलींच्या वसतिगृहासाठी आदिवासी विकास विभागाने महानगरपालिकेकडे जागेची मागणी केली आहे काय तसेच वसतिगृहाच्या शासनाच्या इमारती किती आहेत, याबाबत प्रकल्प अधिका-यांनी अवगत करण्यास सांगितले असता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांनी विदित केले की, मुलांच्या वसतिगृहासाठी जागेची मागणी केलेली आहे. मुलींच्या वसतिगृहासाठी जमिनीची मागणी केलेली नाही. कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रामध्ये स्वतःची जागा आहे. सध्या तेथे ७५ मुलांचे वसतिगृह आहे, परंतु त्यामध्ये १५० मुलांना सामावून घेतले आहे.

समितीने यावर, ज्या वसतिगृहामध्ये ७५ मुलांची क्षमता आहे, तेथे अतिरिक्त ७५ मुले ठेवून त्यांना कोंबड्यांप्रमाणे डांबून ठेवले जात आहे. असे समितीने निदेशित केले असता कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे जागेची मागणी करण्यात येईल

समितीने, महापालिकेच्या शिक्षण विभागात शिक्षकांची पदे कधीपासून रिक्त आहेत व ती न भरण्याची कारणे काय आहेत, तसेच १२ कर्मचा-यांच्या प्रलंबित जात वैधता प्रमाणपत्राबाबत पालिकेत सद्यस्थिती विचारली असता आयुक्तांनी स्पष्ट केले की, सद्यस्थितीत ४७ पदे रिक्त असून त्यांपैकी १४ पदे समायोजनाने भरली जातील. जात वैधतेचे श्री. पांडुरंग बबन देठे यांचे एकच प्रकरण प्रलंबित आहेत. या कर्मचा-याने प्रमाणपत्र सादर केलेले नाही. ते सन १९९५ पूर्वी सेवेमध्ये आलेले आहेत. तसेच एका कर्मचा-याने स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे.

समितीने,महापालिकेच्या परिवहन विभागातील १८ कर्मचा-यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले नाही. सदर १८ कर्मचारी सेवेमध्ये कधी रुजू झाले, याबाबत माहिती विचारली असता आयुक्तांनी विदित केले की, १८ कर्मचा-यांपैकी एका कर्मचा-याचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. एका कर्मचा-याचे निधन झाले आहे, तर एका कर्मचा-याने राजीनामा दिला आहे, एक प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे व १३ कर्मचा-यांची प्रकरणे विविध जात वैधता पडताळणी समित्यांकडे प्रलंबित आहेत. सन १९९९ ते २००२ दरम्यान हे कर्मचारी सेवेमध्ये आलेले आहेत. याबाबत महानगरपालिकेकडून जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीस वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे.

कल्याण- डोंबिवली महानगरपालिका परिवहन व्यवस्थापकांनी यावर खुलासा केला की, सद्यस्थितीत १३ कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्रे प्राप्त नाहीत. सन १९९९ ते २००२ दरम्यान या कर्मचा-यांची नियुक्ती झालेली आहे. यासंदर्भात सन २०१३, सन २०१६ व जुलै, २०१८ मध्ये त्या-त्या जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे पत्रव्यवहार केलेला आहे. सादर केलेल्या प्रमाणपत्रांबाबत काहीही निर्णय न आल्यामुळे संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना वारंवार स्मरणपत्रे दिली आहेत.

समितीने, यावर दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार, अनुसूचित जमाती प्रवर्गावर नियुक्त झालेल्या कर्मचा-याने जर सहा महिन्यांच्या आत प्रमाणपत्र दिले नाही तर त्या दिवसापासून सेवामुक्त करण्याचा उल्लेख असतानाही या कर्मचा-यांच्या नियुक्तीपत्रामध्ये सदर बाब का नमूद करण्यात आली नाही, आपण ज्या पदावर कार्यरत आहात तेथील व्यक्तीचे ते कर्तव्य आहे. नियुक्ती प्राधिका-यांच्या दोन जबाबदा-या असतात. अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचा-याची नियुक्ती केल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची जेवढी जबाबदारी संबंधित कर्मचा-याची आहे तेवढीच जबाबदारी प्रशासन या नात्याने शासनाच्या निर्णयाच्या अधिन राहून प्रमाणपत्र सादर न करणा-या कर्मचा-यावर कारवाई करण्याची आपली आहे. अवैध प्रमाणपत्रांच्या आधारे गैर-आदिवासींनी नोकरीचा फायदा घेतला असल्यास त्यांच्यावर कारवाई करून एक महिन्याच्या आत तसा अहवाल समितीस सादर करावा.

अभिप्राय व शिफारशी :

समितीने, दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार, अनुसूचित जमाती प्रवर्गावर नियुक्त झालेल्या कर्मचा-याने जर सहा महिन्यांच्या आत प्रमाणपत्र दिले नाही तर त्या दिवसापासून सेवामुक्त करण्याचा या निर्णयामध्ये उल्लेख असतानाही या कर्मचा-यांच्या नियुक्तीपत्रामध्ये संबंधित आस्थापनाकडून सदर बाब नमूद करण्यात येत नाही. अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचा-याची नियुक्ती केल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची जेवढी जबाबदारी संबंधित कर्मचा-याची आहे तेवढीच जबाबदारी प्रशासन या नात्याने शासनाच्या निर्णयाच्या अधिन राहून प्रमाणपत्र सादर न करणा-या कर्मचा-यावर कारवाई करण्याची संबंधित प्रशासनाची जबाबदारी आहे. अवैध प्रमाणपत्रांच्या आधारे गैर-आदिवासींनी नोकरीचा फायदा घेतला असल्यास त्यांच्यावर वेळीच कारवाई होणे अपेक्षित आहे. राज्यातील बहुतेक आस्थापना या शासन निर्णयांचे उल्लंघन करीत असल्याचे वारंवार निदर्शनास येत आहे. प्रशासनाच्या या वृत्तीस आळा घालण्यासाठी शासनाने योग्य त्या उपाययोजना आखाव्यात असे समितीने अभिप्राय व्यक्त केले.

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील सरळसेवेतील वर्ग-१ मधील १ पद आणि वर्ग-२ मधील ६ पदे तसेच पदोन्नतीमध्ये एकूण १८ पदे रिक्त असल्याचे समितीने दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी घेतलेल्या विभागीय सचिवांची साक्षीच्यावेळी निदर्शनास आले आहे. **सबब, सरळसेवेची वर्ग-१ व २**

मधील ७ पदे व पदोन्नतीची १८ पदे तात्काळ भरून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी शासनास समितीची शिफारस आहे.

(२) समितीने, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी घेतलेल्या साक्षीच्या वेळी कल्याण-डोंबिवली महापालिकाक्षेत्रामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या वसतिगृहांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त मुलांना ठेवले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. आदिवासी विकास विभागाने जागेची मागणी केल्यास कल्याण-डोंबिवली महानगरपालिका जागा देण्यास तयार आहे. परंतू प्रकल्पाकडून मागणीच केली जात नाही. प्रकल्प अधिकारी कार्यालयांतर्गत असलेल्या वसतिगृहांमध्ये केवळ दोन इमारती शासनाच्या आहेत. इतर सर्व इमारती भाड्याच्या आहेत. भाड्याच्या इमारतींमध्ये वसतिगृहे चालविण्यापेक्षा वसतिगृहांसाठी जागेची मागणी करून त्या ठिकाणी अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींसाठी आवश्यक असलेल्या वसतिगृहाची इमारत बांधण्याबाबत प्रकल्प कार्यालयाने कार्यवाही करावी, ज्या वसतिगृहांमध्ये ७५ विद्यार्थ्यांची क्षमता आहे. तेथे अतिरिक्त ७५ अशा एकूण १५० मुलांना एकत्रित ठेवणे सुरक्षा आणि सुविधांच्या दृष्टीने अयोग्य आहे. यासाठी स्वतंत्र वसतिगृहांच्या इमारतीची अत्यंत आवश्यकता आहे. **सबब, शासनाने याप्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी दुस-या स्वतंत्र वसतिगृहाची इमारत बांधण्यासाठी कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

(३) कल्याण-डोबिंवली महानगरपालिकेच्या परिवहन विभागातील सन १९९९ ते २००० या कालावधीत नियुक्त झालेल्या १३ कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. **कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील अशी जात वैधता न करता वीस-वीस वर्षे कर्मचा-यांना कार्यरत ठेवणे गंभीर बाब आहे. अतः उक्त १३ प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांस सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे**

भिवंडी-निजामपूर महानगरपालिका

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीने भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेस दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी भेट देऊन कार्यालयातील संबंधित अधिका-यांबरोबर बैठक घेऊन चर्चा केली.

समितीने, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेत माहे सप्टेंबर, २०१६ अखेर संवर्गनिहाय अनुसूचित जमाती प्रवर्गातून सरळसेवेने वर्ग-३ मध्ये एकूण १५४ पदे व वर्ग-४ मध्ये एकूण ११६ पदे भरण्यात आली आहेत. तसेच पदोन्नतीने वर्ग-३ मध्ये एकूण १२ पदे भरण्यात आली आहेत. अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांना सेवेत नियुक्ती देण्यापूर्वी त्यांच्याकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे काय, अशी विचारणा केली असता आयुक्तांनी विदित केले की, भरती प्रक्रियेनंतर जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेतलेली आहेत. वर्ग-३ मधील १६६ कर्मचा-यांपैकी १५४ कर्मचा-यांची जात वैधता पूर्ण केलेली आहे.

तसेच ११ कर्मचा-यांची वैधता अद्याप प्रलंबित आहे व एक कर्मचा-याचा प्रस्ताव अद्याप सादर केलेला नाही. सन १९९५ पूर्वीचे ३१ कर्मचारी कार्यरत आहेत. यांपैकी १९ जणांची जात वैधता पूर्ण झालेली आहे. तर ४ कर्मचा-यांची प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत व ८ कर्मचा-यांनी अद्याप प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

समितीने सन १९९५ पुर्वीच्या १२ कर्मचा-यांची बिंदूरिक्त करण्याबाबत विचारणा केली असता अनुसूचित जमातीचा बिंदू १५ दिवसांत रिक्त करण्यात येईल असे आयुक्तांनी समितीस आश्वासित केले.

सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे यांनी नमूद केले की, सन २०११ मधील एक प्रकरण आमच्या समितीकडे प्रलंबित आहे, ३ प्रकरणे अवैध ठरविण्यात आली आहेत. सन २०१२ मध्ये नियुक्ती दिलेल्या कर्मचा-यांनी सन २०१२ मध्ये समितीकडे प्रकरण सादर केले आहे. नाशिक कमिटीकडे दोन प्रकरणे आहेत, नागपूर समितीकडे एक प्रकरण व औरंगाबाद समितीकडे १ प्रकरण सादर करण्यात आले आहे. श्री. अनिल गौरव कुंवर, श्री. चेतन जयवंत चोनकर, श्री. अरुण लक्ष्मण लोखंडे यांना अवैध ठरविण्यात आले आहे.

यावर समितीने, नियमित नियुक्ती असताना जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्यात आली नाही. आता सन २०१६ वर्ष सुरू आहे, संबंधित कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसताना आपण फक्त नोटीस देत आहात. दिनांक १८ मे २०१३ च्या शासन निर्णयानुसार नियुक्ती झाल्यापासून ६ महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, या कालावधीत जात वैधता सादर केली नाही तर त्यांना एक महिन्याची नोटीस देऊन पुढील कारवाई करणे अपेक्षित आहे.

समितीने, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेत एकूण किती कर्मचारी आहेत, त्यामध्ये अनुसूचित जमातीचे किती कर्मचारी आहेत असे विचारले असता, आयुक्तांनी विदित केले की, भिवंडी महानगरपालिकेत एकूण मंजूर पदे ४,३६१ असून त्यांपैकी ३,७४१ पदे भरण्यात आलेली आहेत. वर्ग-१ ते वर्ग-४ मधील ६२० पदे रिक्त आहेत. सन २०१३ पासून भरती झालेली नसल्याने सदर पदे रिक्त आहेत. एकूण मंजूर पदांपैकी ३२९ पदांना आरक्षण आहे, आरक्षणाची ७० पदे भरण्यात आलेली आहेत. सात पदांचा अनुशेष आहे, तसेच पदोन्नतीची २४१ पदे आहेत, त्यांपैकी १९ पदांना आरक्षण आहे व त्यांपैकी १२ पदे भरलेली असून ८ पदांचा अनुशेष आहे.

समितीने, ठाणे जिल्हा विभाजनापूर्वी अनुसूचित जमातीची २२ टक्के आरक्षणाप्रमाणे पदे भरली आहेत काय, असा प्रश्न केला असता आयुक्तांनी सांगितले की, वर्ग-३ आणि वर्ग-४ ची सरळसेवेने २७० पदे भरलेली आहेत. प्रत्येक संवर्गात १० पेक्षा जास्त कर्मचारी आहेत. सरळसेवेने भरलेल्या पदांमध्ये २२ टक्के आरक्षणाप्रमाणे ७६ पदे अनुसूचित जमातीची आहेत. पदे भरताना ७५ टक्के पदे सरळसेवेने आणि

२५ टक्के पदे पदोन्नतीने भरली जातात. त्यानंतर सहायक आयुक्तांनी (मावक) नमूद केले की, सन २०१५ मध्ये सरळसेवेचे ३९ संवर्ग होते. दिनांक २३ एप्रिल,२०१५ रोजी बिंदूनामावलीची तपासणी केलेली आहे. पदोन्नतीच्या या ११ संवर्गात ७ पदांचा अनुशेष होता आणि सरळसेवेमध्ये २२ टक्के आरक्षणाप्रमाणे ४७ पदांचा अनुशेष होता. बिंदूनामावलीची तपासणी करून देताना सदर अनुशेष दिलेला आहे. ही ४७ पदे आता ते भरू शकणार नाहीत. कारण जिल्हा विभाजनानंतर ७ टक्के आरक्षण लागू झाल्यामुळे अनुशेष कमी होणार आहे. ही २२ टक्के पदे वेळीच पूर्ण भरलेली नाहीत. असे सांगितले असता ठाणे जिल्हा विभाजनापूर्वीच २२ टक्के आरक्षण पूर्ण करावयास पाहिजे होते असे समितीने मत मांडले.

समितीने, श्री.सुनील राहू झळके यांची सेवा ज्येष्ठता यादीची नस्ती गहाळ झालेली आहे चुकीची पदोन्नती दिल्यामुळे शासनाचे अवर सचिव, नगरविकास विभाग यांनी सन २०१४ मध्ये, प्रकरण क्रमांक ७२, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ मध्ये तक्रारीची चौकशी करून, सद्यस्थितीची पदोन्नती रद्द करून संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी आणि अंतिमतः अन्याय झालेल्यांना नुकसान भरपाईचे आदेश देण्यात आले आहेत असे लक्षात आणून दिले असता उपायुक्तांनी विदित केले की, शासनाकडून चौकशीचा अहवाल आठ दिवसापूर्वी आलेला आहे. त्यामध्ये शासनाने सांगितले आहे की, जे अधिकारी दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई चालू करावी. या प्रकरणात शासकीय अधिकारी असतील तर त्यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा आणि महानगरपालिकेचे अधिकारी असतील तर त्यांची महानगरपालिकेच्या स्तरावर चौकशी चालू ठेवावी.

समितीने, मागासवर्गीय वार्डमध्ये ५ टक्के खर्च होणे अपेक्षित असताना तो खर्च का झाला नाही असा प्रश्न केला असता मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी नमूद केले की, महसुली उत्पन्नातून खर्च वजा जाता शिल्लक असलेल्या रकमेतून ५ टक्के खर्च केला जातो. आम्ही याबाबत दिनांक ३ जुलै १९९२ च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करीत आहोत. परंतु मागील ५-६ वर्षात निधीअभावी अडचणी आल्या आहेत. मागील तीन वर्षात इतर वार्डात जेवढा खर्च व्हायला पाहिजे तो झालेला नाही. तसेच मागास वार्डामध्येही ५ टक्के खर्च झाला नाही. खर्च कोठे करायचा व किती करायचा हे दोन्ही विषय वेगळे आहेत.

समितीने, यानंतर शिक्षण विभागाने महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळांची माहिती देण्यास सांगितले असता प्राथमिक शिक्षण विभाग प्रमुखांनी विदित केले की, विविध माध्यमाच्या एकूण ९९ शाळा आहेत. यामध्ये ९९८ शिक्षकांची पदे मंजूर असून त्यापैकी ८६७ कार्यरत आहेत. यामध्ये अनुसूचित जमातीचे ४० शिक्षक आहेत. सर्व बिगतवारी उपलब्ध आहे. जिल्हा विभाजनानंतर अनुसूचित जमातीच्या आरक्षणाप्रमाणे काही पदे अतिरिक्त दिसत आहेत, उपायुक्तांनी नमूद केले की, भिवंडी शहराची लोकसंख्या ७१९६७२ इतकी आहे, यामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या ८१७८ आहे यामध्ये ३४६६ पुरुष व ३६६२ महिला आहेत.

समितीने, अनुसूचित जमातीची लोकसंख्या जास्त असल्यामुळे त्या प्रमाणात तरतूद करणे आवश्यक आहे. अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे जे प्रभाग आहेत त्या प्रभागात महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या ५ टक्के रक्कम खर्च होणे अपेक्षित आहे.

विभागीय सचिवांची साक्ष :—

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेस दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली होती.

समितीने, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेत एकूण मंजूर पदे किती आहेत, त्यापैकी अनुसूचित जमातीसाठी किती पदे राखीव ठेवण्यात आलेली आहेत, राखीव पदांपैकी किती पदे भरण्यात आलेली आहेत आणि किती पदे रिक्त आहेत, याबाबतची सविस्तर माहिती देण्यास सांगितले असता आयुक्तांनी विदित केले की, महानगरपालिकेमध्ये एकूण ३५४ पदे आहेत. त्यापैकी २६७ पदे भरण्यात आलेली आहेत. सध्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ३५ टक्क्यांपेक्षा अधिक असल्यामुळे रिक्त पदे भरण्यासाठी परवानगी नाही. महानगरपालिकेमध्ये सन २०११-१२ मध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. तेव्हापासून ही पदे रिक्त आहेत. भरण्यात आलेल्या २६७ पदांपैकी २५३ पदांवरील कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे. १४ कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. त्यामधील सन १९९५ पूर्वीचे चार कर्मचारी आहेत आणि सन १९९५ नंतरचे दहा कर्मचारी आहेत. सन १९९५ पूर्वीच्या कर्मचा-यांना यासंदर्भात नोटीस देण्यात आलेल्या आहेत. त्यांचे बिंदू समायोजनासाठी प्रलंबित ठेवण्यात आलेले आहेत. कारण सेवा प्रवेश नियमावली आणि महानगरपालिकेचा आकृतीबंध आता राज्य शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. तो आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर बिंदूनामावली तयार करून चार कर्मचा-यांची बिंदूनामावलीचा वापर करण्यात येईल. दोन कर्मचा-यांना काढून टाकण्यात आले होते. पण त्यांनतर त्यांनी न्यायालयाकडून स्थगिती घेतलेली आहे. एक व्यक्ती मयत झालेला आहे. उर्वरित सात व्यक्तींचे प्रमाणपत्र जात वैधता समितीकडे प्रलंबित आहेत. त्यामध्ये औरंगाबाद-१, नंदुरबार -२, नागपूर-२, नाशिक- ४, ठाणे-४ या जात वैधता समितीकडे सदरहू प्रकरणे प्रलंबित आहेत. यापैकी श्री. बाळाराम मडवी आणि श्रीमती मंदा भामरे यांची प्रकरणे ठाणे जात वैधता समितीकडे प्रलंबित आहेत. श्रीमती मंदा भामरे या महिला कर्मचारी दिनांक ०५ जून, २००७ रोजी नियुक्त झालेल्या आहेत.

यावर समितीने, दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयास अधीन राहून सदरहू महिला कर्मचा-यांवर योग्य ती कारवाई करून समितीला अहवाल सादर करण्यात यावा असे निदेशित केले.

समितीने, श्री. अनिल कुवर, श्री. केतन चोलकर व श्री. अरुण लोखंडे यांचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आलेले आहे. परंतु त्यांच्यावर अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात

आलेली नाही अशी विचारणा केली असता आयुक्तांनी विदित केले की, श्री. चेतन चोलकर, श्री. अनिल गोरख कुंवर वाहनचालक या दोन कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आलेले होते. त्यांना दोघांना सेवेतून कमी करण्यात आलेले आहे. श्री. लोखंडे यांनी कोकण विभागाकडून दिनांक ३१ मार्च, २००८ रोजीचे वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे. सन २०१६ ला समितीने भेट दिल्यानंतर अनुसूचित जमाती कल्याण समितीने असे निदेश दिले होते की, सदरहू प्रमाणपत्र पुन:तपासणीसाठी पाठविण्यात यावे. त्यामुळे ते प्रमाणपत्र पुन्हा तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहे. त्याबाबतचा अहवाल अप्राप्त आहे. तसेच श्री. संतोष पवार या कर्मचा-याला सेवेमधून कमी करण्यात आलेले आहे.

समितीने, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेमध्ये एक विभाग अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. त्या विभागात पाच टक्के राखीव निधीमधून कोणती कामे करण्यात आलेली आहेत याची माहिती देण्यास सांगितले असता महानगरपालिकेच्या पाच टक्के राखीव निधी मधून रस्त्यांवरील विद्युत लाईट बसविण्यासाठी २० लक्ष रुपयांची कामे करण्यात आलेली आहेत. तसेच पाणी पुरवठा विभागाच्या माध्यमातून १६.७३ लक्ष रुपयांची कामे करण्यात आली असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

अभिप्राय व शिफारशी :—

(१) अनुसूचित जमाती कल्याण समितीने भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेस दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी भेट दिली होती. त्यावेळी महानगरपालिकेतील सन १९९५ पूर्वीच्या १२ कर्मचा-यांचे बिंदू रिक्त करण्याची प्रक्रिया १५ दिवसात करण्यात येईल असे समितीस आश्वासित करण्यात आले आहे. तथापि, सदरहू अनुसूचित जमातीचे बिंदू रिक्त करण्याची कार्यवाही अजून झालेली नाही. **सबब, सन १९९५ पूर्वीच्या १२ कर्मचा-यांचे बिंदू तात्काळ रिक्त करून पात्र अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(२) एकत्रित ठाणे जिल्हा विभाजनापूर्वी या जिल्ह्यात अनुसूचित जमातीसाठी २२ टक्क्यांचे आरक्षण विहित करण्यात आले होते. सन २०१४ मध्ये ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्ह्याची निर्मिती झाली. त्यानंतर ठाणे जिल्ह्यात २२ ऐवजी ७ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. तथापि, सन २०१४ पूर्वी सरळसेवेची २२ टक्के प्रमाणे ४७ व पदोन्नतीच्या ७ पदांचा अनुशेष होता. सहायक आयुक्त (मावक) यांच्या मतानुसार ही पदे आता महानगरपालिकेस भरता येणार नाहीत. कारण आता ७ टक्के आरक्षण लागू झाले असल्याने अडचण निर्माण झाली आहे. **सबब, ठाणे जिल्हा विभाजनापूर्वी २२ टक्क्यानुसार अनुशेष पूर्ण न करणा-या तत्कालीन अधिका-यांविरुद्ध कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावा अशी शासनास समितीची शिफारस आहे.**

(३) समितीने, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी भिवंडी महानगरपालिकेसंदर्भात घेतलेल्या साक्षीच्यावेळी सन १९९५ पूर्वीचे ४ व सन १९९५ नंतरचे १० कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्याचे आढळून आले होते. **याबाबत ज्या जातपडताळणी समितीकडे जातवैधतेची प्रकरणे प्रलंबित आहेत त्या समितीकडे पाठपुरावा करण्याच्या सूचना संबंधित कर्मचा-यांना देऊन त्यांच्याकडून लवकरात-लवकर जात वैधता प्रमाणपत्र घ्यावेत अन्यथा दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये संबंधित कर्मचा-यांवर कारवाई करून केलेल्या कारवाईची माहिती तीन महिन्यांत करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत)

पहिली बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
(३) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(४) श्री. पांडूरंग बरोरा, वि.स.स.
(५) श्री. आनंद ठाकुर, वि.प.स.
(६) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
श्री. आनंद रहाटे, कक्ष अधिकारी.

विभागीय प्रतिनिधी :

जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

(१) श्री. महेंद्र पी. कल्याणकर, जिल्हाधिकारी, ठाणे
(२) श्री. प्रवीण शिंदे, अपर जिल्हाधिकारी, ठाणे
(३) श्रीमती वंदना सुर्यवंशी, निवासी उपजिल्हाधिकारी.

जिल्हा परिषद, ठाणे

(१) श्री. किशोर राजे निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे
(२) श्री. रविंद्र पाटील, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे
(३) श्री. भगवान घाडगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(४) श्री. अशोक पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी.

जिल्हा मध्यवर्ती बँक, ठाणे

(१) श्री. भगीरथ ना. भोईर, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्रीमती प्रमिला न. पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. दिलीप उढाण, जिल्हा उपनिबंधक, ठाणे.

ठाणे महानगरपालिका

(१) श्री. सुनील चव्हाण, अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, ठाणे

(२) श्री. अशोक कुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त

(३) श्री. संजय निपाणे, उपायुक्त

(४) श्री. सुधीर राऊत, परिवहन व्यवस्थापक.

मिरा-भाईंदर महानगरपालिका

(१) श्री. विजयकुमार म्हसाळ, उपायुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका

(२) श्री. दिपक दि. पुजारी, उपायुक्त मनपा, मिरा-भाईंदर महानगरपालिका.

आदिवासी विकास, ठाणे

(१) श्री. मिलिंद गवादे, अपर आयुक्त

(२) श्री. किरण माळी, उपायुक्त

(३) श्री. एस.टी. भालेकर, सह आयुक्त, अ.ज.प्र.त.समिती, ठाणे

(४) श्रीमती. वर्षा लड्डा उटवाल, सहाय्यक आयुक्त (मावक) कोकण विभाग

(५) श्री. लोमेश सलामे, एकात्मिक आदिवासी विकास, प्रकल्प अधिकारी, शहापूर.

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, ठाणे, जिल्हा मध्यवती बँक, ठाणे महानगरपालिका व मिरा-भाईंदर महानगरपालिका या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचां-याच्या जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

दुसरी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते..

उपस्थिती :

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
(३) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(४) श्री. पांडूरंग बरोरा, वि.स.स.
(५) श्री. आनंद ठाकुर, वि.प.स.
(६) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
श्री. आनंद रहाटे, कक्ष अधिकारी.

विभागीय प्रतिनिधी :

नवी-मुंबई महानगरपालिका

(१) श्री. तुकाराम मुंढे, आयुक्त,
(२) श्री. अंकुश चव्हाण, अतिरिक्त आयुक्त,
(३) श्री. रमेश चव्हाण, अतिरिक्त आयुक्त.

भिवंडी-निजामपूर महानगरपालिका

(१) डॉ. योगेश म्हसे, आयुक्त,
(२) श्री. विनोद शिंगटे, उपायुक्त.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका

(१) श्री. ई. रविंद्रन, आयुक्त,
(२) श्री. संजय घरत, अतिरिक्त आयुक्त

आदिवासी विकास, ठाणे

(१) श्री. मिलिंद गवादे, अपर आयुक्त

(२) श्री. किरण माळी, उपायुक्त

(३) श्री. एस.टी. भालेकर, सह आयुक्त, अ.ज.प्र.त. समिती, ठाणे

(४) श्रीमती. वर्षा लड्डा उटवाल, सहाय्यक आयुक्त (मावक) कोकण विभाग

(५) श्री. लोमेश सलामे, एकात्मिक आदिवासी विकास, प्रकल्प अधिकारी, शहापूर.

उक्त बैठकीत समितीने नवी-मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व भिवंडी-निजामपूर महानगरपालिका तसेच अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचा-यांच्या जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

तिसरी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(३) श्री. संतोष टारफे, वि.स.स.
(४) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(५) श्री. पांडूरंग बरोरा, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव
(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती).

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्रीमती आभा शुक्ला, प्रधान सचिव, सहकार विभाग
(२) श्री. राजेश नार्वेकर, जिल्हाधिकारी, ठाणे
(३) श्री. संतोष भोगळे, सह सचिव, महसूल विभाग
(४) श्री. विवेक भिमनवार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे
(५) श्री. अरुण चव्हाण, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, ठाणे
(६) श्रीमती रुपाली सातपुते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे
(७) श्री. सतीश सोनी, आयुक्त सहकार विभाग
(८) श्री. तुषार मठकर, सहा. आयुक्त (मावक)
(९) श्री. अरुणकुमार जाधव, प्रकल्प अधिकारी, शहापूर.

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, ठाणे व जिल्हा मध्यवर्ती बँक या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांची जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित विभागीय सचिवांबरोबर चर्चा केली.

चौथी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :–

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(३) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.
(४) श्री. अमित घोडा, वि.स.स.
(५) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(६) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव
(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. शिवाजी दौंड, सचिव, सामान्य प्रशासन विभाग
(२) श्री. विवेक भीमनवार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे
(३) डॉ. रुपाली सातपुते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे
(४) श्री. समीर उनाळे, अतिरिक्त आयुक्त, ठाणे महानगरपालिका
(५) श्री. बालाजी खतगावकर, आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका
(६) डॉ. रामास्वामी एम, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका
(७) श्री. गोविंद बोडके, आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका
(८) श्री. म. न. हिरे, आयुक्त, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका
(९) श्री. सि. ता. भालेकर, आयुक्त अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे
(१०) श्री. ए. के. जाधव, प्रकल्प अधिकारी, शहापूर.

उक्त बैठकीत समितीने जिल्हा परिषद, ठाणे महानगरपालिका, ठाणे, नवी-मुंबई महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व भिवंडी-निजामपूर महानगरपालिका या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांची जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित विभागीय सचिवांबरोबर चर्चा केली.

पाचवी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ११ जून २०१९ रोजी येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :–

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(३) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(४) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.)

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(३) श्री. जयवंत राणे, अवर सचिव (समिती)

(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

समितीने या बैठकीत प्रारूप अहवालावर विचार केला व तो आवश्यक त्या सुधारणासह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई